म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रकाश
सं. क्र. १९८८
REFBK-0017225

अ.क्र. ४४०१६
१७/११/५७
३९८

४४०१६
३९८
१७/११/५७

आपली शेजारी राष्ट्रे...२

# पूर्वदर्शन

क्र. १५२२९

लेखक
वि. शं. पारगांवकर

REFBK-0017225
REFBK-0017225

सुबोध प्रकाशन, पुणे २.

प्रकाशक :
सौ. सुलोचना पारगांवकर
१४४ शुक्रवार पेठ,
सुबोध प्रकाशन पुणे २.

© वि. शं पारगांवकर

प्रथम आवृत्ती
सप्टेंबर १९६७

मूल्य चार रुपये

मुद्रक :
ग. वा. बेहेरे
रविराज मुद्रणालय
६३४ बुधवार पेठ, पुणे २.

ब्रह्मदेश

सयाम

फिलिपिन्स

मलाया




भारताचा शेजारी : ब्रह्मदेश

ठाणे. स्थलप्रत

# १. ब्रह्मदेश

ब्रह्मदेशाचा काही भाग पूर्वीपासूनच ब्रिटिशांच्या ताब्यात होता. परंतु पुढे अनेक दृष्टींनी ब्रिटिशांना ब्रह्मदेशातील या तुटपुंज्या प्रदेशावरच संतुष्ट राहणे अशक्य झाले. त्याचे एक प्रमुख कारण असे होते की ब्रिटिशांची फ्रेंचाशी, वसाहतवादाच्या संदर्भात असलेली चढाओढ वाढू लागलेली होती आणि दुसरे कारण असे की, चीनमध्ये अमेरिकेची सत्ता वाढण्याची भीति निर्माण झालेली होती. सत्तेचा समतोल राखण्याच्या दृष्टीने ब्रिटिशांपुढे, ब्रह्मदेशाच्या बाबतीत ही एक नवीच भीति निर्माण झालेली होती. परंतु यामध्ये आणखीही एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती ही, की केवळ सत्तेचा समतोल हाच एकमेव प्रश्न तेव्हा ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या समोर नव्हता. तर आपल्या स्वतःच्या देशाचं पोषण होण्याच्या दृष्टीने भारताप्रमाणेच

ब्रह्मदेशाचे देखील संपूर्ण स्वामित्व त्यांच्या हातात असणे आवश्यक होते.

या सर्व गोष्टींचा विचार करून नोव्हेंबर १८८५ मध्ये ब्रिटिशांनी ब्रह्मदेशातील उरलेला विभाग आपल्या अंकित असलेल्या भागाशी जोडून घेतला.

त्यापूर्वी त्यांनी मंडालेमध्ये आपल्या फौजेला धाडून थिबा राजा आणि महाराणीला अटक केली. त्या दोघांची तेथून उचलबांगडी झाली आणि ब्रह्मदेशाच्या बाहेर हिंदुस्थानात त्यांची रवानगी करण्यात आली. त्याच दिवशी ब्रह्मदेश संपूर्णतया ब्रिटिशांचा मुलूख बनला !

ब्रह्मदेश हा अशा रीतीने गिळंकृत करणे कदाचित् अंगलट येईल याची धूर्त ब्रिटिशांना कल्पना होती. तेव्हा राजा-राणीची उचलबांगडी केल्यानंतर लगेच त्यांनी ब्रह्मी नागरिकांना विश्वासात घेण्याच्या दृष्टीने एक फर्मान काढले. त्यात त्यांनी या जुलमी राजाविरुद्ध खूप प्रचार केला आणि सुबत्ता, सुराज्य आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने मोठमोठाल्या, आकर्षक योजना जाहीर केल्या. 'आम्ही तुम्हाला अत्यंत प्रामाणिक आणि उत्तम सरकार देऊ.' असेही आश्वासन लोकांना देण्यात आले.

परंतु मंडालेमध्ये या योजनांचे आणि हातचलाखीचे फारसे स्वागत झाले नाही.

लोकांमध्ये असंतोष पसरला आणि ब्रह्मदेशाची नेटिव्ह फौज जरी फार प्रबळ नसली तरी तिने आपला प्रतिकार थांबविला नाही. ती फौज विस्कळित झाली. छोट्या छोट्या तुकड्यांमध्ये त्या फौजेने आपले रूपांतर करून घेतले. खेड्यापाड्यात तिने आपला प्रवेश करून घेतला आणि गोरिल्ला पद्धतीने लढा देण्याचे आपले सूत्र चालूच ठेवले.

एव्हाना थिबा राजाला, राणीला आणि त्याच्या घराण्यातील काही प्रमुख व्यक्तींना ब्रह्मदेशाबाहेर नेलेले नव्हते. त्यांना नेण्याची वेळ आली तेव्हा लोकांमध्ये एकच हाहा:कार उडाला. प्रमुख शहरा-

तून, रस्त्यारस्त्यातून लोक हजारोंच्या संख्येने जमा झाले. रागावलेले, संतापलेले, चिडलेले त्यांचे चेहरे आपल्या राजाविषयीची स्वामिनिष्ठा आणि ब्रिटिशांविषयीचा संताप व्यक्त करीत होते. ज्या बोटीतून राजा-राणीला नेले जाणार होते तेथपर्यंत लोकांची एकच रीघ लागली. ब्रिटिशांनी हे संकट ओळखले आणि प्रयाणाचा मार्ग बदलला. ब्रिटिश मुत्सद्देगिरीने, राजकारणनिपुणतेने या संकटावर मात केली. दि. ३ डिसेंबर १८८५ रोजी थिबा राजा आणि महाराणीला आपली मायभूमि अंतरली. राजा आपल्या सिंहासनाला मुकला, प्रजा राजाला मुकली, भूमि अक्षरशः पोरकी झाली.

मंडालेचा ताबा घेतल्यानंतरच्या काही महिन्यात ब्रिटिशांनी उत्तर ब्रह्मदेशाच्या शासनाविषयी विधायक पावले टाकण्यास सुरुवात केली. प्रथम त्यांनी हा राज्यकारभार राजाच्याच नावाने चालू ठेवावा किंवा कसे या मुद्द्यावर बराच विचार केला. त्यासाठी, आपल्या हातचे बाहुले बनून राहील असा एखादा राजपुत्र मिळविण्याची ब्रिटिशांनी खूप खटपट केली. परंतु त्यामध्ये त्यांना यश आले नाही. कारण एक तर असा राजपुत्र मिळणे कठीण काम होते आणि दुसरे म्हणजे जरी असा एखादा राजपुत्र मिळाला तरी या बाहुल्यावर लोकांचा विश्वास बसणे कठीण होते. म्हणजे स्थिर राज्यकारभाराच्या दृष्टीने ही जोखिम पत्करणे त्यांना प्रशस्त वाटले नाही. दुसरा मार्ग म्हणजे पूर्वीच्या राजाच्या मंत्रीमंडळामार्फतच राज्यकारभार हाकणे. परंतु थिबाच्या हकालपट्टीनंतर त्यांचे मंत्रीमंडळ अद्ययावत राहिलेले नव्हते. किन्उन्मिगी यु गाँग (*Kinwunmingyi U Gaung*) हा थिबाचा पंतप्रधान होता. राजा परागंदा झाल्यानंतर त्याच्या पंतप्रधानाने आपले एक शिष्टमंडळ घेऊन युरोपात प्रयाण केलेले होते. त्याला स्वतःला आपण ब्रिटिशांविरुद्ध युरोपात काही यशस्वी कारवाई करू शकू याविषयी मुळीच विश्वास नव्हता. परंतु राजघराण्यातील दबावामुळे त्याला तसे करणे भाग पडलेले होते.

ब्रिटिशांपुढे नुकत्याच काबीज केलेल्या उत्तर ब्रह्मदेशाचा एकच प्रश्न होता, तो म्हणजे थिबा राजाने फ्रान्सशी आणि युरोपातील

आणखी काही देशांशी काही तह केलेले होते. या तहान्वये फक्त फ्रान्सने राजाला भरीव मदत देण्याचे आश्वासन दिलेले होते, बाकीच्यांनी केवळ आपल्या मैत्रीचे प्रदर्शन केलेले होते. त्यामुळे कारभारविषयक निश्चित कोणते धोरण आखावे याविषयी ब्रिटिशांना नक्की मार्ग ठरविणे थोडेसे अवघड काम होऊन बसलेले होते. मग या बाबतीत लंडन येथील राणीच्या कायदेविषयक अधिकाऱ्यांना विचारणा करण्यात आली. त्यांनी १८ डिसेंबर १८८५ ला आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये म्हटले होते की, 'राणीला उत्तर ब्रह्मदेश येथील राज्यकारभारविषयक सर्व अधिकार प्राप्त झालेले आहेत. आणि राणी ज्यावेळी आपल्या या अधिकारांचा वापर करील तेव्हा या प्रांतातील पूर्वीच्या राजाने अथवा त्याच्या पूर्वजाने निरनिराळ्या देशांशी केलेले करारमदार आणि तहनामे रद्द समजले जातील. राणीच्या सरकारने निरनिराळ्या देशांना ही वस्तुस्थिती कळवून टाकावी आणि पूर्वीचे सर्व तह आणि करारमदार रद्द झाल्याची घोषणा करावी. आता नव्याने ब्रह्मदेशाचा जो मुलूख ब्रिटनने आपल्या पूर्वीच्या मुलुखाला जोडलेला आहे त्या सर्व मुलुखाचा राज्यकारभार करण्याचा अधिकार राणीच्या सरकारला प्राप्त झालेला आहे. या अधिकाराची अम्मलबजावणी राणीचे सरकार, हिंदुस्थानातील व्हाइसरॉयमार्फत किंवा व्हाइसरॉयने नेमलेल्या अधिकाऱ्यामार्फत बजावू शकेल. कारण उत्तर ब्रह्मदेश आता ब्रिटिशांनी जिंकून आपल्या पूर्वीच्या मुलुखाला जोडलेला आहे. या प्रांतातील लष्करी कारवाई ही केवळ काही काळ थिबा राजाचे अधिकार गोठविण्यासाठी केलेली नसून त्या मुलुखावर सर्वाधिकार देणारी सत्ता प्रस्थापित करण्यासाठी ब्रिटिशांनी लष्करी हालचालीने विजय संपादन केलेला आहे!' हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड डफरीन यांनी या विजयाची घोषणा १ जानेवारी १८८६ रोजी केली ती अशी :

'राणीच्या फर्मानानुसार आम्ही जाहीर करू इच्छितो की थिबा राजाच्या अधिकारामध्ये, ब्रह्मदेशाचे पूर्वीचे असलेले प्रांत आता त्याच्या अधिकारातून मुक्त झालेले आहेत. आणि हे प्रांत आता

राणीच्या मुलुखाला जोडण्यात आलेले आहेत. त्यांचा राज्यकारभार राणीच्या इच्छेनुसार हिंदुस्थानच्या व्हाइसरॉय किंवा गव्हर्नर जनरल मार्फत वेळोवेळी जे अधिकारी नियुक्त केले जातील त्यांच्यातर्फे केला जाईल.'

अशा रीतीने ब्रह्मदेश हा संपूर्णपणे ब्रिटिशांच्या अधिपत्त्याखाली आला आणि हिंदुस्थानचे एक उपांग म्हणून त्याला जोडला गेला. परंतु तेव्हा इंग्रजांना कळले नव्हते की ब्रह्मदेश म्हणजे काही हिंदुस्थान नव्हता. यासाठीदेखील अर्धे शतक उलटावे लागले.

जवळ जवळ संपूर्णतया पारतंत्र्याचा काळ म्हणजे ३५–४० वर्षे ब्रह्मदेशाला ब्रिटिशांच्या संपूर्ण सत्तेखाली काढावा लागला. त्यानंतरच्या शासनात त्याला काही प्रमाणात स्वयंशासनाची सत्ता देण्यात आली. हा काळ १९२० ते १९३० चा होता. हिंदुस्थानलादेखील याच काळात शासनविषयक सुधारणा बहाल करण्यात आलेल्या होत्या. १९३५ च्या ब्रह्मदेशच्या सरकारी कायद्यानुसार त्या देशाला हिंदुस्थानपासून अलग करण्यात आले होते. असे जरी असले तरी प्रत्यक्षपणे हिंदुस्थानपासून ब्रह्मदेशाला वेगळे करण्यात आले ते १९३७ साली. आणि तेव्हापासूनच त्याला एक उदार राज्यघटनाही बहाल करण्यात आली. या राज्यघटनेनुसार ब्रह्मी लोकांना सरकारमध्ये बरेच अधिकार मिळाले होते. पण तरीही अनेक बाबतीत ती अजून राणीने नियुक्त केलेल्या गव्हर्नरच्याच हातात होती. बहुतेक महत्त्वाचे म्हणजे संरक्षण, परराष्ट्रीय संबंध, अर्थविषयक धोरण आणि सर्वश्रेष्ठ नागरी सेवकांची नियुक्ति हे अधिकार ब्रिटिशांनीच राखून ठेवलेले होते.

ब्रिटिशांच्या राज्याचा एकमेव फायदा म्हणजे त्यांनी राजकीय आणि आर्थिक व्यवहाराची अशी घडी बसविलेली होती की तीमुळे देशाला संपन्न करणारी सर्व साधने उपलब्ध व्हावीत आणि त्यांपासून ब्रह्मदेशालाच नव्हे तर जगाच्या बाजारपेठांनाही फायदा व्हावा. या योजनेतील मोठ्यात मोठी गोष्ट म्हणून सांगता येईल ती अशी की दक्षिण ब्रह्मदेशातील जवळ जवळ एक कोटी एकर दलदलीची आणि

जंगलांनी वेढलेली जमीन त्यांनी सुधारली, वहीत केली. आणि उत्पन्नासाठी जास्तीत जास्त योग्य बनविली. हा सर्व भाग, उत्पन्नासाठी योग्य बनविलेला जगातील मोठ्यात मोठ्या भागांपैकी एक समजला जातो. जगातील सर्वांत जास्त भात येथे पिकते. तसेच येथे ब्रिटिशांनी तेल, खनिज, जंगल, दळणवळण आणि परस्परसंबंध सुधारण्याच्या दृष्टीने क्रांतिकारी सुधारणा केल्या.

सर्वसाधारण जीवनमान आणि शिक्षणाच्या दृष्टीने आशियातील इतर देशाशी सहज तुलना व्हावी इतकी प्रगति तेथे ब्रिटिशांनी घडवून आणली होती.

परंतु ब्रह्मदेशाच्या राजकीय कथेचा हा काही शेवटचा भाग नाही. उलट ही कुठल्याही देशाच्या पारतंत्र्याच्या कथेची सुरुवात म्हणावी लागेल ! या सुधारणांमुळे ब्रह्मदेशामधील शहरात आणि खेड्यात एक सुसंगत नाते निर्माण होण्याऐवजी त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध तुटत गेले. त्यामध्ये एक अविश्वासाची आणि अज्ञानाची दरी पसरत गेली. एक तर शहरातून उद्योधंद्यांची निर्मिति होत गेली. त्यासाठी प्रचंड प्रमाणावर कामगारवर्गाची गरज भासू लागली. काही कामगार खेड्यातून शहरात यासाठी आले आणि या निर्यातीचा खेड्याच्या जीवनावर परिणाम झाला. परंतु खरी दुःखांतिका यापुढेच आहे. ती अशी की कामगार म्हणून जसे लोक ब्रह्मदेशाच्या खेड्यातून शहरात येऊ लागले तसेच ते हिंदुस्थानातूनही येऊ लागले. आणि हिंदुस्थानातून आलेले कामगार कमी मजुरीवर काम पत्करू लागले, तसे खुद्द ब्रह्मदेशचे नागरिक त्यामुळे वेकार राहू लागले. आणि याचा ब्रह्मदेशाच्या राष्ट्रीय जीवनावर वाईट परिणाम झाला.

जी गोष्ट कामगारांच्या जीवनात झाली तीच गोष्ट वरच्या वर्गातील लोकांमध्येही होऊ लागली. कारण शिक्षणाच्या बाबतीत, इंग्रजी शिक्षणाचा हिंदुस्थानी लोकांनी लवकर अंगीकार केला आणि ब्रह्मी लोक मागे राहिले. त्याचा परिणाम असा झाला की, बौद्धिक आणि महत्त्वाच्या कारभारविषयक जागावरही ब्रह्मी लोकांचे हात

पोहोचत नव्हते. त्यामुळेही ब्रह्मी लोकांच्या जीवनात एक प्रकारची निराशा पसरली होती.

दुसरी गोष्ट शेतीच्या बाबतीत अशीच घडत होती. मोठमोठ्या जमिनी मक्तेदारीने दिल्या गेलेल्या होत्या, त्याबाबतीतही विलक्षण चढाओढ होती. जागतिक चढाओढ देखील ब्रह्मी लोकांच्या जीवनात निराशा आणण्यास कारणीभूत झालेली होती. एक तर तेव्हा जागतिक मंदीचा फटका अनेक देशांना बसलेला होता, त्यातही आतील चढाओढही विफलता वाढवीत होती. हिंदुस्थानातील लोकांचे जीवनमान अगदी साधारण होते. त्यामुळे ब्रह्मदेशातील जमिनीत त्यांना अगदी कमी वेतनावर काम करणे परवडत असे. साहजिकच याही क्षेत्रात त्यांचा भरणा वाढला होता.

साहजिकच याचा फार विपरित परिणाम ब्रह्मी लोकांच्या राष्ट्रीय जीवनावर झाला. त्यांच्यात असंतोष वाढत चालला. कारण एकीकडे ब्रिटिशांकडून आणि दुसरीकडून हिंदुस्थानी लोकांकडून त्यांच्या विकासात अडथळे येत होते. शेती, उद्योगधंदे, आणि नोकरीविषयक सर्वच प्रांतात त्यांची कुचंबणा होत होती. असंतोष वाढत होता. आणि शेवटी १९३७ मध्ये हा असंतोष पराकोटीला पोहोचला. त्यांच्यामध्ये राष्ट्रवादाचा उदय झाला. आणि तो प्रखर झाला. ब्रह्मदेशामध्ये जे राजकीय पक्ष होते त्या सर्वांनी एकत्र येऊन सर्व गोष्टींचे ब्रह्मीकरणाची मागणी केली. विशेषतः सिव्हिल सर्व्हिस, लष्कर, व्यापार आणि शेती. त्या सर्वांमध्ये प्रमुख मागणी होती ती म्हणजे ब्रह्मदेशात हिंदुस्थानी लोकांच्या आयातीवर निर्बंध घालणे. ब्रह्मी लोक स्वतःला बुद्धधर्मीय मानीत होते. ब्रह्मदेशातील हा एकमेव सर्वश्रेष्ठ धर्म होता.

हा सारा असंतोष व्यक्त करण्यासाठी त्यांनी आपल्या देशबांधवांना अंतर्गत प्रेरणा देणारा एखादा राष्ट्रीय मार्ग अवलंबण्याऐवजी मदतीसाठी त्यांनी दुसऱ्या देशाकडे हात पसरले. १९३९ साली नुकतेच दुसरे महायुद्ध सुरू झाले होते आणि ब्रिटनच्या स्वतःच्या घरावरच हे संकट चालून आलेले असल्यामुळे त्याची सारी शक्ति आणि

लक्ष तिकडेच केंद्रित होणे अगदी साहजिक होते. त्याच वेळी जपान, आग्नेय आशियावर आपली पकड बसविण्याच्या पवित्र्यात उभा होता. अशा वेळी अनेक ब्रह्मी नेते जपानकडे वळले आणि त्यांनी आपल्या मुक्तीसाठी जपानची मदत मागितली !

१९३९ ते १९४१ या काळात शेतीमधून उपस्थित होणाऱ्या भांडणाच्या पारिपत्त्यासाठी अनेक कायदे केले गेले. त्यातील अनेक कायदे निरुपयोगी ठरले आणि कित्येक कायद्यांची अंमलबजावणी करणे कठीण होऊन बसले. फक्त सरकारी नोकऱ्यांमध्ये ब्रह्मी लोकांना स्थान मिळण्याच्या चळवळीमध्ये बरीच प्रगति झाली आणि दुसरी प्रगति झाली ती संरक्षणसेवेमध्ये ब्रह्मी लोकांना स्थान देण्यात आले.

मध्यंतरीच्या काळात ब्रह्मी लोकांच्या जीवनातच नवीन नवीन शक्तींचा उदय होऊ लागलेला होता. या साऱ्या शक्ती राजकीय स्वातंत्र्याच्या प्रेरणेतून उदय पावल्या होत्या. आणि ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्यासाठी भुकेल्या होत्या. १९३० सालामध्ये कित्येक दंगे आणि राजकीय लढे लढले गेले होते. हे लढे विशेषत: रंगूनमध्ये लढले गेले होते आणि त्यामध्ये कामगार आणि विद्यार्थी वर्गाने प्रामुख्याने भाग घेतलेला होता. कामगार आणि शेतकरी वर्ग यांच्या संघटनेतून या लढ्यांनी जन्म घेतलेला होता. मुळात जरी संघटना हिंदुस्थानी आणि ब्रह्मी लोकांच्या वैरावर जन्म पावली असली तरी पुढे पुढे या संघटनेमध्ये ते वैराचे वातावरण राहिले नाही. आणि मुख्य लढ्याची सूत्रे तिने हाती घेतली. देशाची अर्थव्यवस्था परक्याच्या हातात असणे आणि साम्राज्यशाही वर्चस्वाखाली जीवन दडपले जाणे, शिवाय बहुसंख्य श्रमजीवी वर्गाची जीवनात ससेहोलपट होणे याचा जो एक परिणाम अपेक्षित होता तोच परिणाम तेव्हाच्या ब्रह्मदेशाच्या राजकीय चळवळीमध्ये दिसून येऊ लागला होता. तो परिणाम म्हणजे बहुसंख्य कामगार आणि रंगून विद्यापीठातील विद्यार्थी मार्क्सच्या वाङमयाकडे आकृष्ट झाले. आणि यातूनच एक संघटना निर्माण झाली. तिचे नांव *Dobama Asiayone*

म्हणजे *( We Burmans Association )* असे होते आणि तिचा उदय १९३५ साली झाला होता.

थोड्याच काळात या चळवळीने इतका जोर पकडला की त्यांच्या कार्यक्रमांमुळे सर्वसामान्य ब्रह्मी लोकांच्या जीवनात नव-चैतन्याचे वारे खेळू लागले. या सभेने सर्वप्रथम ब्रह्मदेशाच्या संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. आणि हे स्वातंत्र्य ताबडतोब अंमलात आले पाहिजे अशी घोषणा केली. त्यांनी अत्यंत कडक आणि परिणाम-कारक आर्थिक कार्यक्रम हाती घेतला. मोठमोठ्या शहरामधून त्यांनी हरताळ पाळण्यास आणि या हरताळांचे लोण अत्यंत यशस्वी रीतीने खेड्यात नेऊन पोहोचविण्यात यश मिळविले. याचा नेहमी अनुभवास आहे तोच परिणाम झाला. तो म्हणजे या सभेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने पकडले गेले आणि त्यांची रवानगी तुरुंगात झाली.

हे सारे विशेष जोरात घडून येत होते ते युरोपात दुसरे महा-युद्ध भडकण्याच्या काळापूर्वी! या संघटनेला दुसरेही एक लोकप्रिय नाव प्राप्त झालेले होते. *Thakins* या नावाने ही संघटना ओळखली जात होती. या थाकिन्स संघटनेची विशेषतः दोन भागात विभागणी झालेली होती. म्हणजे या संघटनेला दोन पंख होते असे म्हटले तरी चालेल. एक समाजवाद आणि दुसरा साम्यवाद. समाजवादी विचार-सरणीचा अध्वर्यू म्हणून ओळखला जाणारा आँग सान *( Aung San )* हा रंगून विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा एक अत्यंत प्रभावी नेता होता, थाकिन मिया *( Thakin Mya )* हा शेतकऱ्यांच्या संघटनेचा यशस्वी नेता होता. आणि थकिन नू *( Thakin Nu )* हा बुद्ध तत्त्वज्ञानावर नितांत विश्वास असणारा नेता होता. प्रमुख कम्युनिस्ट कार्यकर्त्यां-मध्ये थकिन सो *( Thakin So )* हा अत्यंत प्रभावी कार्यकर्ता होता. तसेच थान टुन आणि थेयन पी हे दोघे भारतीय कम्युनिस्ट पार्टीकडून इकडे आलेले होते. काही करारावर जरी हे कार्यकर्ते भारतीय कम्युनिस्ट पार्टीकडून इकडे आणले गेले असले तरी बाहेरच्या जगाशी त्यांचे काही विशेष संबंध नव्हते.

या थकिन संघटनेचे बहुतेक सर्व कार्यकर्ते अगदी तरुण होते.

युरोपात दुसरे महायुद्ध भडकले. ब्रिटिशांची ब्रह्मदेशावरची पकड ढिली पडली. आग्नेय आशियात जपानने आपला प्रभाव वाढविण्याचा उद्योग सुरू केला. तेव्हा या थकिन्स संघटनेला राजकारणात आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी चळवळ करण्यासाठी दिशा मिळाली. यासाठी त्यांनी आपल्या काही जुन्या, राजकारणात मुरलेल्या बांधवांचा सल्ला घेतला. हे जुने राजकारणी लोक ब्रिटिशांच्या राजकारणात खेळलेले होते आणि अनुभवात मुरलेले होते. ब्रिटिशांचा लष्करी कमकुवतपणा कुठे आहे हे या लोकांना माहीत होते, तसेच राजकारणाच्या दृष्टीने आज कोणकोणते आणि कसे पवित्रे टाकावे याची त्यांना कल्पना होती.

याच काळात पूर्वेकडून जपानने युरोपीय साम्राज्यशाहीला आव्हान दिले होते आणि जणू काही या साम्राज्यशाहीच्या पकडीतून आपण आग्नेय आशियाला वाचवीत आहो हा आभास निर्माण करण्यात तरी जपानने यश मिळविले होते. या यशाने भाळून जाऊन थकिन्स संघटनेने जपानशी आपले ईप्सित साध्य करण्यासाठी हातमिळवणी केली. या संघटनेने हा करार १९३९ साल संपताना आणि १९४० च्या सुरुवातीला केला.

अर्थात् ब्रिटिशांना या सर्व गोष्टींची चाहूल लागलीच होती. त्याचे पर्यवसान म्हणून अनेक कार्यकर्ते पकडले गेले आणि त्यांची रवानगी तुरुंगात केली गेली. या धरपकडीच्या मत्रातून आँग सान निसटला आणि १९४० साली त्याने गुप्त मार्गाने जपानमध्ये प्रवेश मिळविला. जपानमध्ये त्याला आणखी तीन कार्यकर्ते येऊन मिळाले. या तीस जणांनी मग तेथे लष्करी आणि राजकीय शिक्षण घेतले आणि जपानच्या आक्रमक फौजांबरोबर त्यांनी ब्रह्मदेशामध्ये प्रवेश केला. नंतर आँग सान हा '*Burma Independence Army*' चा प्रमुख बनला. त्याच्या बरोबरचे तीस लोकही ब्रह्मदेशात त्याच्यासहच आलेले होते. पुढे ब्रह्मदेशात या लोकांना 'तीस वीर, '*Thirty Heroes*' या भूषणास्पद नावाने ओळखले जाऊ लागले.

१९४२ च्या जानेवारीमध्ये पंतप्रधान उ सौ (*U. Saw*)

यांना ब्रिटिशांनी अटक केली. उ सॉ नुकतेच लंडनहून परत आले होते. तिथे त्यांना ब्रिटिशाकडून काही सवलती मिळविण्यात अपयश आले होते. जपान्यांबरोबर त्यांनी बंडखोरीचा पत्रव्यवहार केला असा त्यांच्यावर आरोप ठेवला गेला होता. जपान्यांच्या आक्रमणानंतर खरे तर ब्रिटिशांना येथे तसा कोणी सहाय्यक उरलेला नव्हता. जपान्यांनी जेव्हा आक्रमण केले तेव्हा ब्रिटिशांनी आपल्या लष्कराच्या कोणत्याही हालचाली केल्या नव्हत्या, इतकेच नव्हे तर मायभूमीला आक्रमणापासून वाचविण्याच्या कामी कोणत्याही भावनात्मक ऐक्य साधण्याच्या कार्यक्रमाला हात घातला नव्हता. ब्रिटिशांचे हे कृत्य बहुसंख्य ब्रह्मी लोकांच्या भावनांचा उद्रेक करणारेच ठरले. त्यांना जपान्यांपेक्षा यावेळी ब्रिटिशांच्या वर्तनाचीच अधिक चीड आली. उलट 'बर्मा स्वातंत्र्य सेनेने' जपान्यांच्या बाजूने आपले सर्व बळ एकवटले आणि ब्रिटिशांना ही टक्कर कपाळावर झेलणे अत्यंत कठीण कर्म होऊन बसले. १९४२ साली दोस्तांना तेथून माघार घ्यावी लागली.

जपानने १९४२ मध्ये ब्रह्मदेशामध्ये एका तात्पुरत्या सरकारची स्थापना केली. त्या सरकारचे प्रमुख डॉ. बा. माव *(Dr. Ba Maw)* यांची पंतप्रधान म्हणून नियुक्ति करण्यात आली. भारतापासून ब्रह्मदेश वेगळा करण्यात आल्यानंतर बा माव हा तेथील पहिला पंतप्रधान झाला. मात्र बा माव सरकारला अधिकार मात्र अत्यंत मर्यादित दिलेले होते. नंतर १ ऑगस्ट १९४३ रोजी जपानने ब्रह्मदेशच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. त्या स्वतंत्र ब्रह्मदेशचे प्रमुख म्हणून बा माव यांचीच नियुक्ति करण्यात आली. त्यांचे मंत्रिमंडळ बहुतांशाने थकिन्स संघटनेतील प्रमुख व्यक्तींचेच बनले होते. आणि ब्रह्मदेशचे लष्कर म्हणून 'बर्मा नॅशनल आर्मी' या नावाने एकत्र झाले. त्याचे प्रमुख म्हणून आँग सान यांची नेमणूक करण्यात आली. कम्युनिस्ट नेता थान टुन, सोशॅलिस्ट नेता थकिन मिया, *'Thakin Mya'* आणि थकिन नू या प्रमुख व्यक्ती बा माव मंत्रिमंडळात समाविष्ट झाल्या.

जरी एका अर्थाने हे मंत्रिमंडळ नकली होते, तरी त्यामधून व्यक्त होणाऱ्या स्वातंत्र्याला देखील बराच अर्थ होता. कारण मंत्रि-मंडळातले हे नेते तसे आपापल्या अधिकारांचा फायदा घेऊन परि-णामकारक राज्यकारभार करीत होते. आपल्या अनुभवाचा पुरेपूर फायदा जनतेला मिळावा यासाठी धडपडत होते. शिवाय राष्ट्रीय सेनेच्या मदतीने देशात स्वास्थ्य नांदावे याचीही काळजी घेत होते.

परंतु चारपाच लाख भारतीय लोक ब्रह्मदेश सोडून गेल्या-मुळे त्यांनी मागे ठेवलेले उद्योगधंदे कोलमडले, तसेच युद्ध जोरात सुरू असल्यामुळे बाजाराला कमालीची मंदी आलेली होती. पैशाचा तुटवडा आणि वस्तूंचाही तुटवडा झालेला होता. ब्रह्मदेशामध्ये विशेषत: कापडाचा तुटवडा फार जाणवत होता. तशातच ब्रिटनला आणि दोस्तांना विजय मिळण्याची चिन्हे दिसू लागली आणि त्यामुळे जपान्यांशी सत्तासमतोलाच्या दृष्टीने संबंध निश्चित करणे अत्यंत अवघड काम होऊन बसले.

ब्रह्मदेशामधील मोठमोठ्या राजकीय विचारवंतांच्या लक्षात आले की यापुढे जपानशी संबंध ठेवणे म्हणजे भविष्यकाळात राजकीय गोंधळाचा धोंडा राष्ट्राच्या पायावर पाडून घेण्यासारखे आहे. युद्धकाळातील नंतरच्या काळात राजकीय व्यक्तींनी ब्रह्मदेशाचे राजकारण दुहेरी, दुटप्पी वृत्तीने खेळण्यास सुरुवात केली. एकीकडे चोरून त्या दोस्तांना मदत करीत होत्या आणि दुसरीकडे जपान-नियुक्त सरकारलाही सहकार्य देत होत्या.

१९४३ च्या शेवटी थान टुन आणि त्याच्या बरोबरच्या लोकांनी एक भूमिगत चळवळ उभारली. या चळवळीला शेवटी आँग सानही येऊन मिळाले. या चळवळीचे कार्य जपान विरोधी शक्तीची उभारणी करणे हे होते. मार्च १९४५ मध्ये राष्ट्रीय सेनेने आँग सानच्या नेतृत्वाखाली बंड उभारले. आणि प्रतिकार-चळवळीत ही सेना सामील झाली. या सेनेला ब्रिटिशांकडून आणखी शस्त्रास्त्रांची मदत मिळाली आणि या सेनेने गोरिल्ला पद्धतीचा लढा देऊन दक्षिण ब्रह्मदेश पुन्हा हस्तगत करण्याच्या कामी ब्रिटिशांना मदत केली !

१९४४ मध्येच ऑंग सान आणि थान टुन यांच्या नेतृत्वाखाली फॅसिझमविरोधी एक प्रचंड संघटना स्थापन झालेली होतीच. त्या संघटनेचे नाव ' *Anti–Fascist People's Freedom League* ' असे होते. या संघटनेमध्ये सर्व पार्टीचे लोक होते. विद्यार्थी, सोशॅलिस्ट, कम्युनिस्ट, शेतकरी आणि कारखानदार या सान्यांचे प्रतिनिधि तिच्यात होते.

वास्तविक ब्रह्मदेशाने आतापर्यंत अनंत प्राणघातक हल्ल्यांना तोंड दिले होते. दोन अत्यंत भेदक लष्करी कारवायांना त्याने तोंड दिले होते. ब्रिटिशांच्या माघारीच्या वेळेची भीषण रणधुमाळी आणि नंतर १९४२ मधील प्रचंड बॉंबहल्ले यामुळे ब्रह्मदेशाचे जीवन अत्यंत छिन्नविच्छिन्न झालेले होते.

या बॉंब हल्ल्यात ब्रह्मदेशाची दोन तृतीयांश उत्पादक शक्ति नष्ट झाली होती. मोठमोठाली शहरे जायबंदी झालेली होती, दळणवळणाची साधने नादुरुस्त झालेली होती. आणि ब्रह्मदेशाचे मोठ्यात मोठे उत्पन्नाचे साधन म्हणजे भातशेती, त्या भातशेतीखाली असलेली लाखो एकर जमीन आता पीक काढण्यास योग्य राहिली नव्हती. देशात उद्‌भवलेल्या या दारुण परिस्थितीमुळे लुटारू वृत्ती वाढली होती. सरकारवरची आणि न्यायदानावरची लोकांची श्रद्धा मावळली होती आणि कायदे मोडण्याची प्रवृत्ती बळावत चालली होती. तसेच प्रतिकार-चळवळीच्या वेळी ज्या लोकांनी सशस्त्र चळवळी केल्या होत्या. त्या लोकांना आणि त्यांच्याजवळील शस्त्रास्त्रांना आळा घालणे महाकठीण कर्म होऊन बसले होते !

ही विस्कळित झालेली घडी नव्याने बसविणे आणि जनतेचा विश्वास संपादन करणे तितकेसे सोपे काम नव्हते. लोकांना आता नव्यानेच अस्तित्वात आलेली संघटना *( A. F. P. F. L. ) Anti–Fascist People's Freedom League* हवी होती. लोकांना तिच्यातील चेतनेचे, प्रेरणेचे आणि कर्तबगारीचे दर्शन घडलेले होते. तिच्यात असलेल्या नेतृत्वावर लोकांची श्रद्धा होती.

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर ब्रिटनने पार्लमेंटमध्ये ब्रह्मदेशाविषयी आपला राजकीय दृष्टिकोन काय आहे याचे स्पष्टीकरण केले होते. ( १ जून १९४५ ) त्यामध्ये त्याने ब्रह्मदेशचे स्वसत्ताक राज्य वैचारिक दृष्टीने मान्य केलेले होते, परंतु देशाची आर्थिक आणि सामाजिक घडी जोपर्यंत समाधानकारक बसणार नाही तोपर्यंत ही स्वायत्तता कुचकामी ठरेल असे त्याचे म्हणणे होते. डिसेंबर १९४२ मध्ये तेथील गव्हर्नरला तीन वर्षांसाठी जे शासनविषयक अधिकार दिले गेले होते, ती मुदत ब्रिटनने आणखी ९ डिसेंबर १९४८ पर्यंत वाढवून घेतली.

आपले स्वातंत्र्याचे ध्येय साध्य करण्यासाठी ब्रह्मी लोकांपुढे ब्रिटिशांनी एक कार्यक्रम ठेवला होता. त्यासाठी ब्रह्मदेशात एक नव्या घटनासमितीची निर्मिती करण्याचे त्याने ठरविले होते. या घटनासमितीचे सभासद ब्रह्मी जनतेचे पूर्ण प्रातिनिधित्व मिळविलेले नागरिक आणि निरनिराळ्या राजकीय, सामाजिक पक्षांचे सभासद अशा सर्वांनी मिळून घटनासमितीत कार्य करायला हवे होते. त्यानंतर ब्रह्मदेशाने ब्रिटिशांशी राजकीय सद्भावना व्यक्त केली पाहिजे आणि मग त्यांना स्वातंत्र्य दिले जाईल, तेहि ब्रिटिश कॉमनवेल्थच्या अंतर्गत स्वातंत्र्य असेल !

हे झाले मुख्य ब्रह्मदेशच्या प्रदेशांबाबत. ब्रह्मदेशाला लागून इतर ज्या छोट्या छोट्या वसाहती होत्या त्यांच्या स्वातंत्र्याबद्दल यात काही उल्लेख नव्हता. फक्त एवढीच एक ओळ होती ती म्हणजे अशा वसाहतींना जेव्हा वाटेल तेव्हा त्यांनी ब्रह्मदेशमध्ये विलीन होण्यास ब्रिटिशांची हरकत असणार नाही. मात्र तोपर्यंत त्या वसाहतीवर गव्हर्नरची सत्ता राहील !

अर्थात् *A. F. P. F. L* संघटनेच्या दृष्टिकोणात हे ब्रिटिशांनी पुढे केलेले स्वातंत्र्याचे स्वप्न बसत नव्हते. त्यांना निर्विवाद स्वातंत्र्य हवे होते. 'जर तर'चे स्वातंत्र्य नको होते. शिवाय त्या स्वातंत्र्यदानाची तारीख कुठे तरी भविष्य काळात अध्यारत धरलेली नको होती, तर ती स्पष्ट आणि ठाम हवी होती.

हे मतभेद आणि धुसफूस कायमच राहिली. ऑक्टोबर १९४५ मध्ये नवे गव्हर्नर सर रीजिनल डॉर्मन-स्मिथ आले. त्यांच्या कारकीर्दीत लष्करी सरकार जाऊन त्याचे जागी मुलकी सरकार आले होते.. त्यांच्या मंत्रिमंडळाच्या स्थापनेच्या वेळी *A. F. P. F. L.* च्या कार्यकर्त्यांनी सरकारात आपल्याला प्रभावी प्रातिनिधिकत्व मिळावे म्हणून गव्हर्नरशी बोलणी केली. विशेषत: गृहखाते आपल्या पक्षाच्या उमेदवाराला मिळावे आणि सल्लागार–मंडळातील एक जागा *Thein Pe* थियेन पी या कम्युनिस्ट कार्यकर्त्याला मिळावी अशी अट घातली.

या मुद्द्यावरच वाटाघाटी फिस्कटल्या. १ नोव्हेंबर १९४५ रोजी गव्हर्नरने आपल्या मंत्रीमंडळाची स्थापना केली. त्यामध्ये त्यांनी दोन ब्रिटन्स, दोन (*Myochit*) मियॉचिट पार्टीचे आणि (*Karen*) प्रतिनिधींची निवड केली. आणखी पाच प्रतिनिधी युद्धपूर्वकाळातील कॉन्झर्वेटिव्ह होते. अर्थात या बनावामुळे *A. F. P. F. L.* चे कार्यकर्ते नाराज होणे अगदी साहजिकच होते. सरकारबाहेर राहिलेल्या या लोकांनी मग लगेच आपला विधायक, स्वातंत्र्य चळवळीचा कार्यक्रम ठरवून टाकला. राजकीय, आर्थिक, उत्पादनविषयक असंतोषाचा फायदा घेणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट होते. या प्रकारच्या सर्व घटनांनी त्यांच्यामधल्या कम्युनिस्ट पक्षाला अर्थातच चांगले बळ मिळाले.

सरकारची प्रत्येक योजना जनतेमध्ये असंतोष पसरवीत होती. त्यामुळे राष्ट्राच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत होता. उद्योगधंद्यामधील वातावरण निराश झालेले होते. सर्व क्षेत्रातील सर्व प्रकारचा असंतोष आतून धुमसत होता आणि यातूनच संपूर्ण स्वातंत्र्याचा मार्ग काढावयाचा होता. त्याच काळात जानेवारी १९४६ साली *A. F. P. F. L.* ची 'संपूर्ण बर्मा कॉंग्रेस' भरली. तिने पहिलाच ठराव संपूर्ण स्वातंत्र्याचा पास केला. ब्रिटिश कॉमनवेल्थमध्ये न राहण्याचा इतकेच नव्हे तर ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वातंत्र्याचा तिने धिक्कार केला.

इंग्लंडमधील लेबर पार्टीच्या सरकारची त्यावेळची भारतविषयक जी शिष्टाई होती तिचादेखील ब्रह्मदेशच्या राजकीय चळवळीला तसा बराच फायदा झाला. भारताप्रमाणेच एक योजना ब्रह्मदेशच्या स्वातंत्र्यासाठी देखील ठरविली जावी अशा विचाराचे तेव्हाचे बरेच ब्रिटिश कार्यकर्ते होते. जून १९४६ मध्ये ब्रिटिश सरकारने जाहीर केले की एप्रिल १९४७ मध्ये ब्रह्मदेशमध्ये सार्वत्रिक निवडणुका घेतल्या जातील. या निवडणुकान्वये ब्रह्मदेशची एक घटनासमिति स्थापन केली जाईल आणि ती समिति संपूर्ण स्वातंत्र्याच्या दृष्टीने आपली घटना बनवील. ५ ऑगस्ट रोजी मेजर–जनरल ह्यूबर्ट इ. रान्स यांची ब्रह्मदेशचा गव्हर्नर म्हणून नियुक्ति झाली. जनरल रान्स यांनी यापूर्वी रंगून येथे नागरी प्रशासक म्हणून काम केले होते. तेथेच त्यांचा ऑंग सान यांच्याशी संबंध आलेला होता. ब्रिटिश सरकारने यावेळी येथे मध्यस्थी करणाऱ्याची भूमिका घेतली.

मध्यंतरीच्या काळात *A. F. P. F. L.* संघटनेत फूट पडण्यास सुरुवात झालेली होती. त्याचे कारण मियॉचिट पार्टीचे लोक शासनात गेल्यामुळे त्यांच्यात आणि या संघटनेत फूट पडली. आणि आणखी काही संघटना नव्याने अस्तित्वात आल्या.

ब्रिटिश सरकारशी वाटाघाटी करण्याच्या बाबतीत ऑंग सान यांना अपयश आले. त्याचे कारण कम्युनिस्ट पार्टीशी काही बाबतीत त्यांचे मतभेद झाले होते. कम्युनिस्टांचे म्हणणे असे होते की ऑंग–सान यांना हरताळाची चळवळ देशव्यापी आणि लोकप्रिय करण्यात अपयश आलेले आहे. तसेच साम्राज्यवाद्यांकडून ब्रह्मदेशच्या स्वातंत्र्याचे उदक लाचारी वृत्तीने आपल्या हातावर सोडवून घेणे हा देशाचा अपमान आहे. थियेन पी याने सरकारच्या कार्यकारी मंडळाचा राजीनामा दिला. त्याचे कारण देतांना तो म्हणाला, 'ऑंग सान याने ब्रिटिशांच्या लबाडीपुढे आपले मस्तक नमविले आहे !' याचा परिणाम असा झाला की *A. F. P. F. L.* संघटनेने एक ठराव करून आपल्यातून कम्युनिस्टांना बाहेर काढले !

लीगचे पाठबळ कायम ठेवायचे म्हटले तर आँग सान कुठल्याही परिस्थितीत ‘स्वातंत्र्याच्या चळवळीत’ नेमस्तपणा आणू शकत नव्हते. तशी त्यांची कितीही इच्छा असली तरी या संघटनेमध्ये कम्युनिस्टांची देखील चेतना होती आणि शिवाय आँग सान यांनी राजकारणांत प्रवेश केला तेव्हा त्यांनीच जनतेला अंतर्बाह्य पेटविण्यासाठी जी जी भावनात्मक आवाहने केली होती, त्यांचीही बीजे लीगमध्ये मुरलेली होती ! नोव्हेंबरच्या मध्यावर *A. F. P. F. L.* ने पुन्हा ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. तिच्यात तिने अशी अट घातली होती की, ३१ जानेवारी १९४८ पर्यंत देश स्वतंत्र झालाच पाहिजे आणि घटनासमितीच्या निवडणुका १९४७ मध्ये झाल्या पाहिजेत. आणि मध्यतरीच्या काळात ब्रिटिश सरकारने आपले कार्यकारी मंडळ ३१ जानेवारी १९४७ ला राष्ट्रीय सरकारमध्ये विलीन केले पाहिजे.

आता हे उघडे नागडे सत्य होते. आणि लंडन येथील ब्रिटिश सरकारला ब्रह्मदेशमध्ये स्वातंत्र्याबाबत चालढकल करणे अशक्यप्राय वाटू लागले होते. ब्रह्मदेशाला जुलूमजबरदस्तीने आपल्या साम्राज्यामध्ये अडकवून ठेवणे आता शक्य नव्हते. म्हणून २० डिसेंबर १९४६ रोजी ब्रिटिश पंतप्रधान ॲटली यांनी ब्रह्मदेशाच्या शिष्टमंडळाला लंडन येथे पाचारण केले. १९४७ च्या जानेवारी महिन्याच्या सुरुवातीला ब्रह्मदेशचे शिष्टमंडळ आँग सान यांच्या अध्यक्षतेखाली लंडनला जाण्यास निघाले. शिष्टमंडळात उ सॉ, थकिन बा सेन यांचाही समावेश होता. हे शिष्टमंडळ दिल्लीला थोडा वेळ थांबले होते. तेथील वास्तव्यात आँग सान यांनी घोषणा केली की आमच्या मागण्या पुऱ्या होत असतील तर कुठल्याही प्रकारचे बेकायदेशीर मार्ग आचरण्याची किंवा बळाचा वापर करण्याची आमची इच्छा नाही. आणि अगदी त्याच वेळी रंगून येथे कम्युनिस्ट नेते थान टुन यांनीही एक घोषणा केली. तिच्यात त्यांनी म्हटले की, ‘लंडनचे हे आमंत्रण फसवे आहे. यामधून विधायक असे काहीही निष्पन्न होणार नाही !’

१३ जानेवारीला या शिष्टमंडळाच्या लंडनमध्ये वाटाघाटी सुरू झाल्या. याच वेळी ब्रह्मदेशमध्ये हरताळ आणि निदर्शनांना ऊत आला होता. या वाटाघाटी २७ जानेवारीला संपल्या. त्यामधून गुळ-गुळीत शब्दप्रयोगाने जे काही ठरले ते मुळीच प्रभावी नव्हते. परंतु त्यात काही तरी आश्वासने होती आणि बऱ्याच सदिच्छा होत्या. ठरले ते असे की, 'ब्रह्मदेशच्या जनतेच्या आशा-आकांक्षा लक्षात घेऊन त्यांना कॉमनवेल्थ अंतर्गत स्वातंत्र्य द्यावे का संपूर्ण स्वातंत्र्य द्यावे याविषयी लवकरात लवकर पाऊल उचलले जाईल !' शिवाय घटनासमितीच्या निवडणुका एप्रिलमध्ये घेण्यात येतील हेही आश्वासन होते.

मध्यंतरीच्या काळात कार्यकारी मंडळाने ब्रह्मदेशात तात्पुरते काळजीवाहू सरकार स्थापन करावे असा ठराव केला. त्यामध्ये असे ठरले की ब्रह्मी राष्ट्रीय सेना तात्पुरत्या सरकारच्या नियंत्रणाखाली यावी, मात्र ब्रह्मदेशातील ब्रिटिश सेना ही ब्रिटिशांच्याच शासनाखाली राहावी. शिवाय या ब्रिटिश फौजा ब्रह्मदेशातच राहाव्या का राहू नयेत ही गोष्ट नवीन मंत्रिमंडळ आणि ब्रिटिश सरकार ठरवील. ब्रह्मदेशाचा सरहद्दविभाग आणि मुख्य ब्रह्मदेश यांचे एकीकरण व्हावे आणि असे एकीकरण करण्यासाठी सरहद्दप्रांतातील लोकांचे मत विचारात घ्यावे ! असाही एक चाणाक्ष सूर काढण्यात आला होता !

अर्थात् या सर्व करारमदारांवर आणि उपायांवर करारनामा म्हणून सही करण्याचे उ सॉ आणि थकिन बा सेन यांनी नाकारले.

हे शिष्टमंडळ जेव्हा लंडनहून रंगूनला पोहोचले तेव्हा जवळ जवळ तीस हजार नागरिक संपावर होते. त्यामध्ये विद्यार्थी, कामगार आणि सरकारी नोकरही होते. या संपाचे कारण जरी आर्थिक होते तरी पण लंडन येथील शिष्टमंडळाच्या वाटाघाटीतील अपयश हे देखील दुसरे कारण होतेच !

फेब्रुवारीच्या सुरुवातीला *A. F. P. F. L.* ने लंडनचे करार-पत्र कायम केले आणि आँग सान याने जनतेला उद्देशून आवाहन केले की तिने ब्रिटिश योजनेचा, शांततामय स्वातंत्र्यासाठी स्वीकार

करावा. याच महिन्याच्या शेवटी बहुतेक सारे संप मागे घेण्यात आले. त्यांच्या आर्थिक मागण्या काही प्रमाणात मान्य करण्यात आल्या होत्या हे एक कारण आणि दुसरे म्हणजे स्वातंत्र्याचे पुन्हा पुन्हा मिळालेले आश्वासन हेही एक कारण होतेच.

परंतु असे जरी असले तरी राजकीय ताण हा मात्र थोडा-देखील कमी झालेला नव्हता. ब्रिटिशांच्या मनात ही एक गोष्ट स्पष्ट होती आणि तीच कदाचित् आँग सान यांच्याही मनात असावी, ती म्हणजे संपूर्ण नव्हे तरी निदान स्वसत्ताक राज्याची तरी निर्मिति होईल !

याच काळात उ साॅ आणि धनिक बा सेन यांनी सरकारातून आपल्या मंत्रीपदाचे राजिनामे दिले. त्यांनी बा माव यांच्याशी सह-योग करून एक तात्पुरती संघटना स्थापन केली आणि तिच्या द्वारे एप्रिलमध्ये भरणाऱ्या घटना परिषदेवर संपूर्ण बहिष्कार घातला. थान टुन यानेही लंडन येथील करारनाम्यावर बहिष्कार घातला.

घटना परिषदेच्या निवडणुकीत *A. F. P. F. L.* ने ९० टक्के जागा जिंकल्या. कम्युनिस्टांनी २५५ पैकी फक्त पंचवीस जागा लढ-विण्याचे ठरविले होते. त्यापैकी त्यांना अठरा जागा मिळाल्या. आणि कारेनच्या जागा ' कारेन यूथ लीगला ' मिळाल्या.

वरवर पाहता कम्युनिस्टांना जरी अगदी कमी जागा मिळाल्या होत्या तरी घटना परिषदेत त्यांचे वजन मोठेच होते. याचे एक कारण असे होते की प्रत्यक्ष जरी सर्व थरातून प्रातिनिधिक जागा त्यांनी लढ-विल्या नसल्या तरी कामगारवर्गात, शेतकरीवर्गात आणि विद्यार्थी-वर्गातही या पक्षाचे वजन फार होते. त्यामुळे परिषदेत देखील त्यांच्या शब्दाला एक प्रकारचे वजन प्राप्त झालेले होते. शिवाय आँग सान-प्रमाणे या पक्षाचे धोरण नेमस्त आणि गुळमुळीत नव्हते. आणि त्या धोरणाला संपांचे, हरताळाचे आणि जनतेच्या चैतन्याचे पाठबळ होते. प्रबळ लढा दिल्याशिवाय ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य मुळीच मिळणार नाही, याविषयी त्यांच्या कार्यकर्त्यांच्या मनात यत्किंचितही संभ्रम

नव्हता. मात्र आँग सानवर या सर्वांचा ताण आलेला नव्हता असे म्हणता येत नव्हते. ती सारी परिस्थितीच विचित्र होती.

निवडणुका पार पडल्याबरोबर त्याच महिन्यात आँग सान यांनी घोषणा केली की, 'ब्रह्मदेशाच्या जनतेचा ब्रिटिशांना घालवून देण्याचा पक्का निर्धार आहे.' तेव्हाच घटना परिषदेने ठराव केला की, 'ब्रह्मदेश हे संपूर्ण सार्वभौम लोकसत्ताक राष्ट्र आहे.' परंतु १९ जुलै १९४७ रोजी घटना परिषद आपले कामकाज करीत असता काही बंदुकधारी लोक आत घुसले आणि त्यांनी कार्यकारिणीच्या कचेरीत जाऊन सात कौन्सिल मेंबर्सवर गोळ्या झाडल्या. या गोळ्यांची शिकार झालेल्यांमध्ये आँग सान आणि थनिक माया हे दोघे प्रभावी नेतेही मरण पावले.

या कटाचा सूत्रधार म्हणून कम्युनिस्ट लीडर उ साँ याला पकडले गेले. त्याच्यावर खटला भरून त्याला फाशी देण्यात आले.

आँग सान याच्या मृत्यूचा देशाला फार मोठा धक्का बसला. *A F. P F. L.* वरही त्यांच्या मृत्यूचा परिणाम झाला. एक अत्यंत प्रबळ माणूस आणि हुशार राजकीय नेता म्हणून आँग सान यांनी ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याची वाटचाल फार कुशलतेने केली असती, यात मुळीच संशय नव्हता. आँग सान यांचा राजकीय वारस म्हणून थकिन नू हे पुढे आले. ते सोशॅलिस्ट पक्षाचे नेते होते आणि घटना परिषदेचे अध्यक्ष होते. परंतु आँग सान यांच्याप्रमाणे थकिन नूमध्ये वकूब नव्हता. त्यांचे नेतृत्व परिणामकारक ठरू शकले नाही आणि त्यामुळे तेथील डाव्या पक्षाचे बळ वाढले.

जुलैमध्ये ब्रिटनने तात्पुरत्या सरकारला ब्रह्मदेशचे सरकार म्हणून मान्यता दिली आणि २४ सप्टेंबर रोजी घटना परिषदेने ब्रह्मदेशाची नवी घटना तयार केली. खुनाचा निषेध करून थान टुन यांनी *A. F. P. F L.* आणि कम्युनिस्टांची एकी व्हावी यासाठी थकिन नू यांची भेट घेतली. त्यांच्यात तात्पुरता सलोखा झाला आणि दोघांनी मिळून ब्रह्मदेशाचा एक दौराही काढला. परंतु त्यामधून भरीव असे काहीही निष्पन्न झाले नाही. उलट थकिन नू यांना पुढे एका निवेद-

नाते असे स्पष्ट करावे लागले की, आमची पार्टी कम्युनिस्टांच्या हातचे बाहुले बनणार नाही !

ब्रह्मदेशाचे राजकीय भवितव्य असेच अंधातरी राहू देणे ब्रिटिशांना यापुढे परवडणारे नव्हते. शेवटी ४ जानेवारी १९४८ रोजी ब्रह्मदेशाला संपूर्ण सार्वभौम लोकसत्ताकाचा दर्जा बहाल करताना ब्रिटिशांनी स्पष्ट केले की, 'कोणत्याही परिस्थितीत बळाचा अगर अन्य कोणताही मार्ग अवलंबून ब्रह्मदेशाला यापुढे स्वातंत्र्यापासून वंचित ठेवणे जमणार नाही. आमच्या आंतरराष्ट्रीय दर्जाचा,आजच्या जागतिक परिस्थितीचा आणि ब्रह्मदेशातील जनतेच्या स्वातंत्र्यविषयक चळवळीचा योग्य विचार वरील संदर्भात करून आम्ही ब्रह्मदेशाचे स्वातंत्र्य घोषित करीत आहो. त्यामध्ये आमची आणि ब्रह्मदेशाची मैत्री अबाधित राहावी ही भावना प्रमुख आहे !'

असे औपचारिक स्वातंत्र्य मिळाल्यानंतर घटना परिषदेनेच, कायमची घटना तयार होईपर्यंत आणि सार्वत्रिक निवडणुका होऊन नवे निर्वाचित सरकार कारभारावर येईपर्यंत पार्लमेंट म्हणून कामकाज पाहावे असे ठरले. या पार्लमेंटचे प्रमुख म्हणून थकिन नू यांनी अधिकाराची सूत्रे पंतप्रधान या नात्याने हाती घेतली आणि त्यांच्या नेतृत्वाखाली नवे मंत्रिमंडळ स्थापन झाले. नंतर लगेच १९ एप्रिल रोजी ब्रह्मदेश यूनोचा सभासदही झाला. इतकेच नव्हे तर यूनोमध्ये त्याने आपला प्रभावही पाडण्यास सुरुवात केली व हळू हळू जगातील इतर राष्ट्रांशी आपले राजकीय संबंध प्रस्थापित करण्यास सुरुवात केली. ब्रिटन, अमेरिका, रशिया आणि फ्रान्ससारख्या प्रबळ राष्ट्रांबरोबरच आशियातील आपले शेजारी भारत, चीन, इंडोनेशिया, सयाम, सिलोन आणि पाकिस्तान यांच्या बरोबरही त्याने मैत्रीचे संबंध जोडले.

ब्रह्मदेशची नवी घटना ही पाश्चात्त्य राजकीय विचारसरणीचे आणि कार्ल मार्क्स यांच्या सूत्रांचे मिश्रणच आहे असे म्हटले पाहिजे. या नवीन घटनेत ब्रह्मदेशाचे शान प्रांत, काचिन प्रांत, कारेनी प्रांत आणि मुख्य बर्मा असा भाग समाविष्ट आहे.

असा स्वतंत्र ब्रह्मदेश अस्तित्वात आल्यानंतर लगेच सरकार आणि कम्युनिस्ट पार्टी यांच्यामध्ये लढयाला तोंड फुटले. फेब्रुवारी १९४८ ला पांढरे निशाण कम्युनिस्टांनी आग्नेय आशियातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांची कलकत्ता येथे एक परिषद भरविली. तेथे त्यांनी संपूर्ण आग्नेय आशियामध्ये कम्युनिस्ट नेतृत्वाचे धोरण काय असावे याविषयी संपूर्ण विचारविनिमय केला. आणि संयुक्त कारवाई करण्यासंबंधीचा एक कार्यक्रम आखला. १९४८ च्या मार्चमध्ये रंगून येथील कामगारवर्गामध्ये संपाचे सत्र सुरू झाले. या संपाचे सूत्रधार अर्थातच कम्युनिस्ट होते. सरकारने या संपाचा बंदोबस्त करताना बहुतेक सर्व कम्युनिस्ट चळवळ्यांना अटक केली आणि कम्युनिस्टांच्या प्रेसवरही बंदी घातली. थान टुन याने आता उघड उघड थकिन नू सरकारविरुद्ध बंड उभारले. कम्युनिस्टांनी आपल्या बंडाची केन्द्रस्थाने मंडाले आणि रंगून येथे निश्चित केली आणि तेथून त्यांच्या हालचाली सर्व जिल्ह्यात होऊ लागल्या. या लोकांना कामगारवर्ग तसाच शेतकरीवर्ग यांच्याकडूनही पाठिंबा मिळू लागला आणि त्यांनी उभारलेल्या सशस्त्र सैनिकांची संख्या पाच हजारावर सहज होती. थिएन पी मात्र या संप प्रकरणापासून संपूर्ण अलिप्त राहिले होते, इतकेच नव्हे तर ते थकिन नू यांना येऊन मिळाले होते !

एकीकडे कम्युनिस्टांनी देशामध्ये असंतोष आणि अराजक माजविले होते आणि दुसरीकडे पीपल्स व्हॉलन्टिअर ऑर्गनायझेशन *( Pvo)* या संघटनेने लष्करातच बेदिली माजविण्यास सुरुवात केली होती. या साऱ्याचा परिणाम म्हणून थकिन नू सरकार दुबळे होऊ लागले होते. या दोन संघटनांचे जसे दुखणे सरकारमागे होते तसेच केरेन प्रांतातील लोकांच्या स्वातंत्र्यभावनेचे एक संकट होतेच. केरेन नॅशनल डिफेन्स ऑर्गनायझेशन *(KNDO)* या संघटनेने फुटीर वृत्तीचे प्रदर्शन करतांना दंग्याधोप्याचाच अवलंब केला होता. देशांतर्गत बंडाळीचे पृथःकरण करतांना जुलै १९४९ मध्ये संरक्षण मंत्री जनरल ने विन यांनी विरोधी पक्षाच्या सशस्त्र लोकांची संख्या

निश्चित करताना जो अहवाल प्रसिद्ध केला, त्यात ही संख्या बारा हजार सहज असल्याचे प्रतिपादिले आहे.

मार्च १९४९ मध्ये तर खुद्द रंगूनमध्ये सरकारला चहूबाजूंनी अंतर्गत शत्रूंचा वेढा पडल्याची तीव्र जाणीव होऊ लागली होती. कम्युनिस्ट आणि केरेन चळवळे यांनी हातमिळवणी करून नुसतेच रंगून शहर पोखरले नव्हते तर मंडाले आणि उन्हाळ्यातली राजधानी *(Maymyo)* मायमियो या शहरावरही पकड बसवीत आणली होती. आणि हीच चळवळ वाढवीत वाढवीत तिचे लोण त्यांनी जवळच्या शान प्रांतापर्यंत नेऊन भिडविले होते.

सरकारची अंतर्गत शक्ति आतल्याच विरोधाने क्षीण होत चालली होती. ब्रह्मदेशाची त्यावेळची जी परिस्थिती होती. ती आजच्या भारतातील परिस्थितीप्रमाणेच होती. कशाचा कशाला ताळमेळ नव्हता, कोणाची कोणावर श्रद्धा नव्हती, राजकीय क्षेत्रात उदासीनता आणि सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात भ्रष्टाचार आणि लांचलुचपत यांना ऊत आलेला होता. इतकेच नव्हे तर सरकारी कामकाजाच्या क्षेत्रात, पोलीस संघटनेत आणि लष्करातदेखील लांचलुचपतीला उधाण आलेले होते. पंतप्रधान थकिन नू यांना या सर्व गोष्टींचा आणि परिस्थितीचा उबग आलेला होता. १९४९ मधील त्यांच्या बहुतेक सर्व सार्वजनिक भाषणातून त्यांनी या वस्तुस्थितीचा जाहीर उल्लेख आणि निषेध केलेला आहे.

अशाच १९ जुलै १९४९ च्या एका भाषणात त्यांनी 'एका वर्षात शांतता' या घोषवाक्याचा उच्चार करून जनतेने आपल्या या कार्यक्रमाला विधायक आणि सक्रिय पाठिंबा द्यावा म्हणून आवाहन केले. मार्च महिन्यात देशामध्ये ज्या सार्वत्रिक निवडणुका व्हावयाच्या होत्या त्या ४ जुलै १९४९ पर्यंत स्थगित केलेल्या होत्याच. जून महिन्यातील एका घोषणेने निवडणुकीची ही तारीख आणखी पुढ ढकलून ती ४ मे १९५० केली गेली. थकिन नू यांच्या मंत्रीमंडळातही परिणामकारक बदल केला गेला. त्यात सरन्यायाधीश ऊ ई माऊंग *(U. E. Maung)* यांना परराष्ट्रमंत्री करण्यात आले. तसेच

जनरल ने विन यांना उपपंतप्रधान, गृहमंत्री आणि संरक्षण मंत्री अशी तीन खाती देण्यात आली !

देशाची आर्थिक परिस्थिती तर कमालीची बिघडलेली होतीच. अशा या अंतर्गत बंडाळीच्या काळात खाण, तेल आणि लाकूड यांच्या धंद्यात मुळीच स्थैर्य निर्माण होऊ शकले नव्हते. इतकेच नव्हे तर भाताच्या उत्पन्नाच्या बाबतीतही तीच रड होती ! शिवाय अशा अशांततेच्या परिस्थितीत कर आणि शेतसाऱ्याची वसुली होणे ही गोष्ट अत्यंत कठीण होऊन बसलेली होती. अगोदरच उत्पादन नाही, त्यात करवसुली नाही, वर आणखी देशातील अशांततेच्या परिस्थितीला परिणामकारकपणे तोंड देता यावे म्हणून संरक्षण खर्चाप्रीत्यर्थ करावी लागलेली वाढ, लाचलुचपत आणि खजिना लुटीचे सत्र यामुळे ब्रह्मदेशाचे सरकार एका भयानक चक्रीवादळातच सापडल्यासारखे झाले होते !

अशा भीषण परिस्थितीत देशाने काय करावे ? दुसऱ्या देशाकडे मदतीची यांचना करावी ! तीच याचना पंतप्रधान थकिन नू यांनी केली. फेब्रुवारी १९४९ मध्ये भारताच्या आमंत्रणावरून कॉमनवेल्थची बैठक नवी दिल्ली येथे भरली होती. ब्रिटन, सिलोन, ऑस्ट्रेलिया आणि भारत या देशांनी ब्रह्मदेशाच्या सध्याच्या परिस्थितीवर चर्चा केली. ब्रह्मदेशाने दहा कोटी डॉलर्सची कर्ज म्हणून मागणी केलेली होती. हे कर्ज त्याला निर्यातीसाठी जहाज विकत घेणे, अंतर्गत व्यवस्थेसाठी आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी लष्करी साहित्य खरेदी करणे आणि सरकारी यंत्रणा परिणामकारक रीतीने चालू राहण्यासाठी राष्ट्राच्या खजिन्यात भर म्हणून ही रक्कम त्याला हवी होती. परंतु वरील राष्ट्रांनी कर्जासाठी अशी अट घातली की केरेन आणि सरकारी पक्ष यांनी एकत्र येऊन ही मागणी केली तरच कर्ज देता येईल !

अर्थात् ब्रह्मदेशाच्या सरकारला ही अट मान्य होणे शक्य नव्हते. एक तर या दोन पक्षांनी एकत्र येऊन कार्य करणे व्यवहार्यही नव्हते आणि दुसरे म्हणजे अशा अटीमुळे देशाच्या अंतर्गत बाबीमध्ये

ढवळाढवळ करणे होते. स्वतंत्र ब्रह्मदेशला ही गोष्ट रुचणे शक्य नव्हते !

त्यानंतर थकिन नू यांनी भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांची भेट घेतली. नेहरू त्या वेळी लंडन येथे कॉमनवेल्थच्या बैठकीसाठी जाण्याच्या तयारीत होते. थकिन नू यांनी नेहरूंना विनंती केली की त्यांनी ब्रह्मदेशासाठी ब्रिटनकडून शस्त्रास्त्रांची मदत आणि कर्ज मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत. त्याप्रमाणे लंडनमध्ये ब्रिटन, भारत, पाकिस्तान आणि सिलोन यांच्या पंतप्रधानांनी ब्रह्मदेशच्या प्रश्नावर चर्चा केली आणि त्यानुसार ब्रिटनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी खालीलप्रमाणे आपली प्रतिक्रिया व्यक्त केली :

' थकिन नू सरकारला त्यांच्या मागणीप्रमाणे ब्रिटन सर्व काही मदत देण्यास तयार आहे. ब्रह्मदेशामध्ये लवकरात लवकर शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून ब्रिटन द्रव्याची आणि शस्त्रास्त्रांचो मदत जरूर देईल ...'

नवी दिल्ली येथील वरील चार देशांच्या वकिलांनी एकत्र येऊन याबाबतीत सविस्तरपणे चर्चा करून कार्यक्रम ठरवावा असे त्या बैठकीत ठरले.

येथे ही गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे की, ब्रह्मदेशच्या ब्रिटनविषयीच्या तीव्र भावना लक्षात घेता ब्रह्मदेशाला आपल्या मदतीमागे काही हेतूंचा संशय येऊ नये म्हणून ब्रिटन, या मदत देण्याच्या व्यवहारापासून सर्वस्वी अलिप्त राहिले आणि या कामी सर्व काही कारवाई करण्यासाठी त्याने भारताला पुढे केले. परंतु दुर्दैवाने त्यावेळी भारत–ब्रह्मदेश यांचे संबंधदेखील फार चांगले नव्हते. याचे कारण तांदुळाच्या निर्यातीमागील ब्रह्मदेशाचा पक्षपाती दृष्टिकोण भारताला पसंत नव्हता आणि दुसरे कारण म्हणजे ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीपासून ब्रह्मदेशात भारतीय नागरिक स्थायिक झालेले होते आणि त्यांच्या हातात तेथील मोठमोठे उद्योगधंदेही होते. ही गोष्ट ब्रह्मी सरकारला रुचत नव्हती. या सर्व नाजुक गोष्टींचा विचार करता अगदी त्रयस्थ दृष्टीने जरी या मदतप्रकरणी भारताने कार्य

केले असते तरी ब्रह्मदेशावर त्याचा कितपत इष्ट परिणाम झाला असता हे सांगता आले नसते ! या सर्व गुंतागुंतीच्या प्रश्नामुळे हा मदतप्रश्न रेंगाळत रेंगाळतच चालला आणि प्रत्यक्ष मदत जी ब्रह्मदेशाच्या हातात पडली ती फारच थोडी होती !

अशा परिस्थितीत ब्रह्मदेशाचे तारू वाऱ्यावादळाचा मार खात, अंतर्गत बंडाळीने व्यथित होत सुबत्तेकडे आणि स्वास्थ्याकडे वाटचाल करण्यासाठी धडपडत होते. याच वेळी ब्रह्मदेशाच्या आणि जगाच्याही इतिहासात आणखी एक महत्त्वाची घटना घडली. ती म्हणजे १९४९ च्या शेवटी चीन कम्युनिस्ट झाला. कम्युनिस्टांची सरहद्द ब्रह्मदेशाच्या सरहद्दीला येऊन भिडली. चीन आणि ब्रह्मदेश यांच्या सरहद्दीचा प्रश्न मिटलेला नव्हता. आता कम्युनिस्ट राज्यकर्त्यांच्या दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे पाहिले जाणार होते !

१७ डिसेंबर १९४९ रोजी ब्रह्मदेश सरकारने चीनच्या लोकसत्ताकाला मान्यता दिली. जगातल्या पहिल्या बिगर कम्युनिस्ट राष्ट्राने दिलेली ही पहिलीच मान्यता होती. १९५० च्या मध्यावर दोन्ही देशाने आपापले वकील एकमेकांच्या देशात रवाना केले.

अमेरिकेवर याचा विलक्षण परिणाम झाला. कम्युनिझम विरुद्ध झगडा देण्याचे अमेरिकेचे ध्येय, ब्रह्मदेशामध्ये नव्याने निर्माण झालेल्या परिस्थितीकडे देखील विधायक दृष्टीने पाहण्याचा यत्न करू लागले. ब्रह्मदेश हा आपल्या पकडीतून सैल होऊन हळू हळू कम्युनिस्टांच्या हातात सापडेल ही भीति त्यांना होती. त्याची प्रतिक्रिया म्हणून अमेरिकेचे स्टेट सेक्रेटरी डीन अॅचेसन यांनी १२ जानेवारी १९५० रोजी घोषणा केली की, ' आग्नेय आशियात निर्माण झालेले कम्युनिझमचे भय नष्ट करण्यासाठी अमेरिका तेथील देशांना सक्रिय मदत करील ! '

म्हणजे चीनच्या कम्युनिस्ट अंमलाखाली येण्यामुळे आशियातील सत्तेच्या राजकारणाचा तोल एकाएकी बिघडला आणि ब्रह्मदेशासारख्या वर्षानुवर्षे अंतर्गत बंडाळीने हैराण झालेल्या देशाला तर चीनचे भय विलक्षण होते.

परंतु अशा वेळी नू यांच्या जागी जनरल ने विन या लष्करी अधिकाऱ्याचा ब्रह्मदेशाच्या राजकारणात उदय झाला. देशाचा मुख्य म्हणून त्यांनी सत्तेची सर्व सूत्रे हाती घेतली. एका लष्कराच्या प्रमुखाने देशाची सूत्रे आपल्या हातीं घेतली हे पाहून तेथील राजकीय पक्ष आणि जनतेच्या मनात देखील धास्ती निर्माण झाली. परंतु त्यांचे हे भय ने विन यांनी खोटे ठरविले ! ऑक्टोबर १९५८ साली त्यांनी देशाचा प्रमुख म्हणून सर्व सूत्रे आपल्या हातात घेतली आणि पाहता पाहता आपली प्रभावी पकड राष्ट्रावर आहे हे त्यांनी सिद्ध केले. त्यांनी लष्करातील अधिकाऱ्यांना ज्याप्रमाणे राजकारणात ढवळाढवळ न करण्याविषयी बजावले त्याचप्रमाणे देशातील सर्व थरांच्या लोकांना आपापली कर्तव्ये निर्भयतेने आणि निष्ठेने करण्याविषयी बजावले. न्यायालयापासून ते विद्यार्थीवर्गापर्यंत त्यांनी आपल्या व्यक्तित्वाची छाप बसविली.

मात्र पुढे एप्रिल १९६० मध्ये देशात सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्या निवडणुका अत्यंत निःपक्षपातीपणाने व्हाव्यात म्हणून ज्या ने विन यांनी जिवापाड प्रयत्न केले त्यांनाच पुढे सत्ता सोडावी लागली. ऊ नू यांच्या ' क्लीन ' ग्रुपला बहुमत मिळाले. तेव्हा क्षणाचाही विलंब न करता ने विन यांनी सत्ता सोडली.

परंतु ऊ नू यांना सत्तेच्या घोड्यावर आपली पकड नीट बसविता आली नाही. पुन्हा देशात अंदाधुंदी, अराजक, आर्थिक घसरगुंडी आणि भ्रष्टाचार माजला. देशाचे भवितव्य धोक्यात आले. तेव्हाच देशात लष्करी कट झाला आणि २ मार्च १९६२ रोजी जनरल ने विन यांना पुन्हा देशाची सत्ता आपल्या हातात घ्यावी लागली. तेव्हापासून आजतागायत ही सत्ता त्यांच्याच हाती आहे आणि त्यांच्या हातात देशाचे भवितव्य सुरक्षित आहे असे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही.

हळूहळू देशाची घडी नीट बसविण्याच्या उद्योगाला पुन्हा जनरल ने विन लागले. ने विन यांच्यावर ते लष्करी हुकुमशहा आहेत म्हणून कितीही टीका झाली, तरी शांतताप्रिय जगाला हे

# २. सयाम

## ( थायलॅन्ड )

भारताच्या पूर्वेकडील देशांमध्ये सयाम हा एक अत्यंत भाग्यवान देश आहे असे म्हणावे लागेल. याची मुख्य दोन कारणे आहेत. एक म्हणजे सयामची भूमी ही प्रामुख्याने शेतकऱ्यांची भूमी समजली जाते. येथे पिकणाऱ्या भाताने सयामला जागतिक महत्त्वाचे स्थान मिळवून दिले आहे या म्हणण्यात काहीही अतिशयोक्ति नाही. हा देश प्रचंड प्रमाणात तांदुळाची निर्यात करतो आणि परकीय चलन मिळवितो. दुसरी गोष्ट म्हणजे सयामची लोकसंख्या अत्यंत कमी आहे. ज्याला लोकसंख्येचा प्रश्न म्हणतात आणि जो प्रश्न सध्या केवळ भारतालाच नव्हे तर जगातल्या कितीतरी देशांना भेडसावीत आहे, तो लोकसंख्येचा प्रश्न सयाममध्ये नाही. उलट सयामची अफाट भूमी अजून निर्जन म्हणून पडलेली आहे.

मान्यच करावे लागेल की, जनरल ने विन यांनी अधिकारावर येऊन ब्रह्मदेशामधील गेल्या १६ वर्षातील बंडाळीचे दुखणे कायमचे निकालात काढले.

परदेशाशी त्यांचे धोरण भारताप्रमाणेच अलिप्ततेचे आहे. त्यांनी भारत आणि चीन या दोन्ही शेजारी राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले आहेत. तसेच त्यांनी जगातील इतर छोटया मोठ्या देशांशीही मैत्रीचे संबंध प्रस्थापित केलेले आहेत. आपल्या देशाच्या स्वास्थ्यासाठी, प्रगतीसाठी ब्रह्मदेशाला देखील बाहेरच्या राष्ट्रांची मदत लागते आणि जनरल ने विन ती मदत पेकिंग, मॉस्को, अमेरिका आणि ब्रिटन यांच्याकडून घेतातही. परंतु कोणालाही आपल्या देशावर दडपण आणण्याची संधि देत नाहीत.

जनरल ने विन यांच्या लष्करी समाजवादाची ध्येय–धोरणे काहीही असोत, देशावर असलेल्या त्यांच्या प्रेमाबद्दल आणि त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांच्या शत्रूलाही शंका घेता येणार नाही !

● ● ●

# २. सयाम

## ( थायलॅण्ड )

भारताच्या पूर्वेकडील देशांमध्ये सयाम हा एक अत्यंत भाग्यवान देश आहे असे म्हणावे लागेल. याची मुख्य दोन कारणे आहेत. एक म्हणजे सयामची भूमी ही प्रामुख्याने शेतकऱ्यांची भूमी समजली जाते. येथे पिकणाऱ्या भाताने सयामला जागतिक महत्त्वाचे स्थान मिळवून दिले आहे या म्हणण्यात काहीही अतिशयोक्ति नाही. हा देश प्रचंड प्रमाणात तांदुळाची निर्यात करतो आणि परकीय चलन मिळवितो. दुसरी गोष्ट म्हणजे सयामची लोकसंख्या अत्यंत कमी आहे. ज्याला लोकसंख्येचा प्रश्न म्हणतात आणि जो प्रश्न सध्या केवळ भारतालाच नव्हे तर जगातल्या कितीतरी देशांना भेडसावीत आहे, तो लोकसंख्येचा प्रश्न सयाममध्ये नाही. उलट सयामची अफाट भूमी अजून निर्जन म्हणून पडलेली आहे.

त्यामुळे सयामच्या शेतकऱ्यांचे जीवन अत्यंत सुखी आहे. इतकेच नव्हे तर आपल्या वाडवडिलांचेच जीवन अजूनहि ते जगत आहेत. याचे कारण असे की जीवन बदलते केव्हा? तर जेव्हा राष्ट्रात लक्षावधी प्रश्न निर्माण होतात तेव्हा! लोकसंख्येचा प्रश्न हा जीवन बदलावयास लावणारा पहिला आणि प्रमुख प्रश्न आहे. नंतर आर्थिक प्रश्न, शैक्षणिक प्रश्न, उत्पादनविषयक प्रश्न, आरोग्यविषयक प्रश्न, संरक्षणविषयक प्रश्न, स्वातंत्र्यविषयक प्रश्न आणि अन्न प्रश्न! असे किती तरी प्रश्न आहेत. असे प्रश्न राष्ट्राच्या जीवनात निर्माण व्हावे लागतात. पुन्हा या प्रश्नांची गंमत अशी असते की काही प्रश्न परिस्थितीमुळे निर्माण होतात आणि राष्ट्रातील व्यक्तिजीवनाला त्यामध्ये लक्ष घालावेच लागते. आणि दुसरे असे की, राष्ट्रातील व्यक्तींचे जीवन जर महत्त्वाकांक्षी असले तर ते जीवनच प्रश्न निर्माण करते आणि ते प्रश्न सोडवून राष्ट्राला प्रगतीकडे घेऊन जात असते.

शेतीच्या बाबतीत सयाममध्ये मात्र अशी परिस्थिती मुळीच नव्हती. कारण खाणारे लोक थोडे आणि उत्पन्नाचा आकडा मोठा त्यामुळे शेतीकडे आणखी निराळ्या, शास्त्रोक्त दृष्टिकोणातून पाहता येते याची जाणीवच सयामी जीवनात निर्माण झालेली नव्हती.

अर्थातच त्यामुळे त्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या जीवनातही फरक पडण्याचे, बदल घडून येण्याचे कारणच नव्हते. हे झाले शेतकऱ्याच्या जीवनाचे.

अन्न, वस्त्र आणि निवारा असणे म्हणजे मनुष्यमात्राच्या जीवनाचे सार्थक होणे असे विचार आशियातील बहुतेक सर्वच देशात फार पूर्वीपासूनच चालत आलेले आहेत. अर्थात् वरील तिन्ही गोष्टींमध्ये देखील सपन्नतेच्या दृष्टिकोनातून मुळीच पाहिले जात नव्हते. तर केवळ किमान गरज याच दृष्टिकोणातून पाहिले जात होते. याचेही प्रमुख कारण असे आहे, की संपूर्ण आशिया खंडावर धर्मविषयक विचारांचा जबरदस्त पगडा बसलेला होता. 'ब्रह्म सत्यं जगन् मिथ्या' सारखे काही धार्मिक विचार जीवनाकडे पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोणच दर्शवीत होते. शिवाय आशियातील या अतिपूर्वेकडील

देशामध्ये बुद्ध धर्माचा प्रभाव विशेष दिसून येतो. गौतम बुद्ध हा तर राज्यवैभवाचा त्याग करून संन्यस्त वृत्ती धारण केलेला महापुरुष, तेव्हा आदर्श म्हणून त्याच्या जीवनाचे प्रतिबिंबच अनेक देशात पडणे साहजिकच होते. आदर्श असलाच तर तो धर्मविषयक जीवनाचा. ऐहिक सुखापेक्षा पारमार्थिक सुखाचा. पृथ्वीवरचे सुख उपभोगण्यापेक्षा पृथ्वीवरूनच स्वर्गाकडे डोळे लावून बसण्याचा.

आशियातील बहुतेक देशाची त्या वेळची जीवने पाहिली तर माझ्या म्हणण्यातील सत्य कळण्यास काही अडचण पडणार नाही. असाच जीवनविषयक दृष्टिकोण सयामी लोकांचा होता. अर्थात् या दृष्टिकोणात क्रांती होण्याचेही काही कारण नव्हते. याची कारणे मी वर निवेदन केलेलीच आहेत. परंतु या देशाची ही विचारसरणी हळूहळू बदलत गेली. याचे कारण पाश्चात्यांचा संपर्क घडू लागला. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स आणि जपान या चार राष्ट्रांनी पूर्वेकडच्या या चिमुकल्या देशांवर हळूहळू आपली पकड बसविण्यास सुरुवात केली होती. व्हिएतनाम, कंबोडिया, लाओस, इंडोनेशिया, मलाया, फिलिपाईन्स, ब्रह्मदेश असे चिमुकले देशच नव्हे तर भारतासारखा प्रचंड देश देखील या पाश्चात्यांच्या प्रभावाखाली, अधिकाराखाली आलेला होता. पंधराव्या शतकापासून आशिया खंडाच्या पूर्वेकडे आणि खुद्द आशियातही अशा प्रकारे निरनिराळ्या देशांच्या संस्कृतींचा संगम घडून येऊ लागलेला होता !

परंतु इतर ज्या गोष्टींचे विवरण केलेले आहे त्यामध्ये बहुतांशाने सयामची गणना करता येत असली तरी इतर काही गोष्टींमध्ये सयामचे स्थान आग्नेय आशियात वैशिष्टयपूर्ण होते. त्यापैकी एक महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे साम्राज्यवाद्यांच्या वसाहतवादापासून सयाम मुक्त होता !

जेव्हा कम्युनिस्ट चीनने दक्षिण चीनमध्ये आपला पगडा बसविला होता आणि आपल्या शस्त्रास्त्र चकमकीखाली ब्रह्मदेश, इंडोचायना आणि मलाया यांना ओढलेले होते तेव्हा आग्नेय आशियात सयाम हा आपल्या स्वातंत्र्याच्या भक्कम पायावर उभा ठाकलेला

होता. एक भरभराटीला आलेला देश म्हणून तेव्हा त्याच्याकडे पाहिले जात होते.

सयामचे हे महत्त्व चार गोष्टींतून व्यक्त होत होते; वसाहत-वादापासून मुक्त असलेली भूमी, अन्नधान्य आणि खनिज संपत्तीने संपन्न असालेली भूमी, अंतर्गत राजकारणातील भक्कम पाया आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील उत्तम संबंध ही ती चार वैशिष्टये होत. मात्र याचा अर्थ असा लावता येणार नाही, की त्यावेळच्या उद्योगप्रधान पाश्चात्य राष्ट्रांच्या बरोबरीने सयामने आपली देखील प्रगती करून घेतलेली होती ! अर्थ एवढाच लावता येईल की, त्याची ध्येयधोरणे खंबीर होती आणि त्याला दैनंदिन जीवनासाठी परावलंबन पत्करण्याची गरज नव्हती !

परंतु देश आतून कितीही खंबीर असला आणि स्वावलंबी असला (हे अठराव्या–एकोणिसाव्या शतकातील देशाविषयींचे विश्लेषण समजावे.) तरीही त्याच्यावर आक्रमण होण्याची आणि त्याला आपल्या वसाहतवादाखाली दडपला जाण्याची भीति नव्हती असा याचा अर्थ समजू नये. सयामसारख्या स्वावलंबी आणि प्रबल असलेल्या कितीतरी छोटया देशांची अशी उदाहरणे देता येतील की ज्यांच्यावर साम्राज्यवाद्यांची अथवा फासिस्टांची आक्रमणे झालेली आहेत. मग सयामच या बाबतीत तेव्हा नशीबवान कसा ठरला ? याचे उत्तर असे आहे की, नामधारी का होईना परंपु स्वातंत्र्य उपभोगण्याचे कारण म्हणजे सयामच्या भोवतालची त्या वेळची परिस्थिती-म्हणजे त्या वेळच्या परिस्थितीची पाहणी केली तर असे दिसून येते की सयाम दोन साम्राज्यवादी देशांच्या मध्ये सापडलेला होता. एकीकडे ब्रिटिश आणि दुसरीकडे फरान्स. म्हणजे असे की आपल्या साम्राज्याचा तोल सांभाळण्यासाठी त्यांच्यापैकी कोणालाही उघड उघड सयामवर आक्रमण करून त्याला पादाक्रांत करण्याची हिंमत होत नव्हती. कारण आपापल्या शक्ति पणाला लावण्याची वेळ अजून आलेली नव्हती. हात दाखवायला जावे आणि अवलक्षण पदरात घेऊन यावे अशी गोष्ट तेव्हा दोघांनाही नको होती. ही झाली एक

परिस्थिती. त्या वेळची बाह्य परिस्थिती. त्याचबरोबर दुसरीही गोष्ट अशी लक्षात घ्यावी लागेल की सयामची अंतर्गत परिस्थिती देखील चांगलीच भक्कम होती. त्यावेळचे राजे शहाणे होते आणि राजकारणाचा वकूब असलेले मुत्सद्दी तेव्हाच्या राजांच्या पदरी होते. त्यामुळे एकमेकांचे प्रतिस्पर्धी असलेल्या या दोन साम्राज्यवादी राष्ट्रांशी, एकएकटयाशी कसे वागायचे आणि दोघांपासूनही आपला देश मुक्त कसा ठेवायचा याची उत्तम समज त्यांना होती.

अगदी अलिकडे जपानने सयामवर आक्रमण केले तेव्हा देखील जपान्यांशी दोस्तीचा करार करून सयामने आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवले होते ! हे आक्रमण डिसेंबर १९४१ मध्ये झालेले होते. असे असले तरी या आक्रमणाविरुद्ध सयामने चळवळ आणि प्रतिकार चालूच ठेवला होता. या चळवळीचे आणि प्रतिकाराचे पर्यवसान असे झाले की, सयामला तेव्हा पाश्चात्यांच्या गोटात जावे लागले ! त्यावेळी दुसरे महायुद्ध जोरात होते. जपानची चिन्हे चांगली दिसत नव्हती. दोस्तांना विजयाची लक्षणे दिसत होती आणि सयामी राज्यकर्त्यांना आपल्या राजकीय भविष्याची कुंडली मांडणे तेव्हा सोपे वाटले ! त्यांनी पाश्चात्यांना मदत केली. या मुत्सद्देगिरीने सयामला पाश्चात्यांच्या गोटात स्थान मिळाले आणि आपल्या देशाचे भवितव्य त्यांनी या गोटाशी निगडित केले !

परंतु असे जरी असले तरी केवळ सयामच्या मुत्सद्देगिरीवर खूष होऊन सर्व काही विसरून जाणे ब्रिटन आणि अमेरिकेला शक्य नव्हते. कारण १९४२ साली बँकॉकने दोस्तांविरुद्ध युद्ध पुकारलेले होते. सयामच्या मुत्सद्देगिरीतील ही एक मोठीच चूक मानावी लागेल ! तिचा परिणाम म्हणून ब्रिटिशांनी १ जानेवारी १९४६ रोजी सयामशी जो तह केला त्याच्या अटी फार कडक होत्या. इतक्या की त्यामुळे सयामची आर्थिक घडी एक-दीड वर्षातच कोलमडून पडली असती. परंतु अमेरिकेने आपले वजन खर्च करून सयामवरील ब्रिटिशांच्या या विलक्षण अटी ढिल्या करून घेतल्या ! याचे कारण एक तर तेव्हाचा अमेरिकन राज्यकर्त्यांचा उदार दृष्टिकोण

आणि दुसरे असे की दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक घडी विस्कटून गेलेली होती. जगातच जीवनोपयोगी वस्तूंचा तुटवडा भासू लागलेला होता. अशावेळी सयामसारख्या धान्योत्पादनाच्या दृष्टीने संपन्न असलेल्या देशाची, केवळ त्याच्याकडून काही चुका झाल्या म्हणून जबरदस्त अटींनी मुस्कटदाबी करणे मुळीच शहाणपणाचे ठरले नसते याची डोळस जाणीव अमेरिकेला होती. म्हणून यावेळी अमेरिका पुढे झाली. तिने नुसत्या सयामवरील विलक्षण अटीच ढिल्या केल्या असे नव्हे तर, युद्धकाळात सयामच्या भुमीची जी हानि झाली होती आणि त्यामुळे उत्पादनावर परिणाम झालेला होता ती हानि भरून काढण्यासाठी सयामला पूर्ण-मदत केली !

आणि सयामची आर्थिक आणि उत्पादनविषयक घडी संपूर्णपणे सावरण्यास मदत केली ! शिवाय ब्रिटन आणि अमेरिकेने सयामचा युद्धानंतरचा राज्यकारभार मान्य केला. त्यावेळी बळाचा उपयोग करून राज्यसत्ता हातात घेतलेल्या व्यक्तींच्या सत्तेलादेखील मान्यता दिली.

मी वर सांगितलेले आहेच, की सयाम हा देश अन्नधान्याच्या आणि खनिज द्रव्याच्या बाबतीत फार संपन्न देश म्हणून ओळखला जातो. त्या देशाच्या या संपन्नतेमुळे सयामी लोक अत्यंत दर्जेदार आणि संपन्न जीवन जगत होते. परंतु असे जरी असले तरी याच संपन्नतेमुळे त्यांच्यामध्ये राजकीय निष्क्रियता आलेली होती. याचा परिणाम जो व्हायचा तो होणे अटळ होतेच. तांदूळ हे या देशाचे मुख्य अन्न होते आणि प्रमुख उत्पादनही होते. जवळ जवळ एक कोटी ऐंशी लाख नागरिकांना आपले मुख्य अन्न म्हणून तांदूळ वापरता येत होते. आणि दुसऱ्या महायुद्धानंतर तर तांदुळाची निर्यात ही या देशाची मुख्य निर्यात आणि परकीय चलन मिळविण्याचे एकमेव साधन होते.

पाश्चात्यांच्या जीवनपद्धतीनुसार सयामी लोकांचे जीवन जरी संपन्न नसले तरी आशियातील इतर देशांच्या, प्रामुख्याने चीन आणि भारतासारख्या मोठ्या देशांच्या, मानाने सयामी लोकांचे जीवनमान

निश्चितच संपन्न होते. ज्याला जमीन नाही असा सयामी नागरिक सापडणे जवळ जवळ अशक्यच होते. परंतु शेतीच्या आणि धान्योत्पादनाच्या दृष्टीने जरी हा देश सुखी होता तरी पण हे सुख एकांगी होते असेच म्हटले पाहिजे. कारण आजच्या जगात केवळ एकाच प्रकारच्या उत्पादनावर कुठलाही देश अवलंबून राहू शकत नाही. त्याला त्यापासून होणारे दुष्परिणामही भोगावेच लागतात. तरी पण युद्धोत्तर जगामध्ये त्यावेळी सयामी लोकांना आपल्या तांदुळाच्या उत्पादनामुळे अतोनात फायदा झाला.

वर म्हटलेच आहे की मर्यादित लोकसंख्या आणि उपयुक्त साधनसामुग्रीची संपन्नता यामुळे सयामी लोकांचे राजकीय जीवन निष्क्रिय झालेले होते! फक्त जेव्हा जेव्हा आपले स्वातंत्र्य धोक्यात येत असल्याची जाणीव त्यांना होत असे तेव्हा सारा आळस आणि सुखवस्तुपणा झाडून हे लोक बाहेरच्या शक्तिविरुद्ध झगडा देण्यासाठी सिद्ध होत असत. तेव्हाच त्यांच्या प्रखर राष्ट्रीयत्वाचा साक्षात्कार होत असे. ही त्यांची राष्ट्रीयत्वाची भावना अंतर्गत प्रतिकारानेही प्रज्वलित होत असे. सयाममध्येच राहणारे शेजारच्या देशातील चिनी नागरिक जेव्हा आपल्या आर्थिक संपन्नतेच्या जोरावर वरचढपणा करण्याचा प्रयत्न करीत असत तेव्हा त्यांचा प्रतिकारही असाच प्रखरतेने होत असे!

शिवाय पाश्चात्यांच्या शिकवणुकीनुसार तेथे काही सरंजामी सरदार अथवा तथाकथित युवराज आपली संपूर्ण सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत तेव्हा अशा प्रतिगामी चळवळींचा देखील सयामी लोक तीव्रतेने प्रतिकार करीत असत.

एकोणीसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत तरी सयाम हा आशियातील इतर छोट्या देशाप्रमाणेच एकाकी आणि शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जात होता. त्या देशावर ईश्वरी सत्ताक राज्यपद्धती होती. म्हणजे हे राजे जणू 'आपण ईश्वराचे अवतारच' अशा भावनेने वागत होते. नागरिकांवर जुलूमजबरदस्ती तर होत होतीच, पण त्यातही थोडी नरमाई नक्कीच असे. याचे कारण म्हणजे देशात बुद्ध-

धर्माचे प्राबल्य फार असल्यामुळे बुद्धाच्या तत्त्वानुसार फार जुलूम केला जात नसे एवढेच !

सुदैवाने एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात चक्री (*Chakkri*) राजघराण्यातील दोन राजे अत्यंत लायक निघाले. त्यापैकी एकाचे नाव माँगकुट (*Mongkut*) आणि दुसऱ्याचे चुलालॉंग-कॉर्न (*Chulalongkorn*) असे होते. त्यांनी आपल्या देशाच्या बाबतीत एक गोष्ट जाणलेली होती की, एक तर आपल्या देशाची राजकीय बांधणी संपूर्ण पाश्चात्यांच्या राज्यपद्धतीनुसार झाली पाहिजे. नाहीतर ब्रह्मदेश, मलाया आणि इंडोचायना यांच्याप्रमाणे आपणही पाश्चात्यांची वसाहत म्हणून राहिले पाहिजे ! परंतु वसाहतीपासून मुक्त होण्यासारखी परिस्थिती देशाच्या स्वभावातच होती असे म्हटले पाहिजे. आणि हा स्वभावही भोवतालच्या आणि अंतर्गत वातावरणामुळेच बनलेला होता. मागे मी उल्लेख केल्याप्रमाणे इंडोचायनामधील फ्रान्स आणि ब्रह्मदेश व मलायामधील ब्रिटन यांच्या आपसातील स्पर्धेमुळे सयाम हा देश आपोआपच दोघांच्याही साम्राज्य-विस्ताराच्या धोरणापासून मुक्त राहिला होता. ही झाली देशाबाहेरची परिस्थिती. अंतर्गत परिस्थिती अशी होती की, देशात अनुवंशिक सरंजामशाहीचे प्राबल्य नव्हते आणि बुद्धाच्या विचारसरणीमुळे राज-कारण अरेरावी झालेले नव्हते. त्यामुळे अडाणीपणाने होणाऱ्या प्रतिकाराचे वरील राज्यांना भय नव्हते ! त्यांनी याचा अत्यंत हुशारीने आणि अंगभूत कर्तबगारीने फायदा घेऊन अगोदर देशातील गुलामगिरीचे उच्चाटन केले. नंतर देशातील आर्थिक व्यवहाराचे नाते आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहाराशी जोडून घेतले. आणि मग शासन-विषयक सुधारणांबरोबर न्यायदानातही आधुनिक विचारसरणीचा झोत आणून सुधारणा केली. या सर्व दृष्टींनी आपल्या देशाची नव्याने उभारणी करून आपला दर्जा पाश्चात्यांच्या बरोबरीचा आहे हे या दोन राज्यांनी जवळ जवळ सिद्धच केले. देशात अशी अंतर्गत क्रांति होत असताना एकदमच सर्वच्या सर्व सुधारणा नागरिकांच्या पचनी पडतील, अथवा सर्वच्या सर्व कायदे आणि नीतिनियम शास्त्यांना

अमलात आणता येतातच असे नाही. त्यामधील कित्येक सुधारणा कागदावरच राहणेही शक्य असते. आणि सयामच्या बाबतीत हा अपवाद घडू शकला नाही. परंतु एक गोष्ट मात्र मान्य केलीच पाहिजे की चक्री राजघराण्यातील या राज्यांनी संपूर्ण देशहित डोळ्यापुढे ठेऊन कार्य केले. त्यांनी अत्यंत सचोटीने, प्रामाणिकपणे आणि देशाच्या स्वाभिमानाचा मानबिंदु नजरेसमोर ठेवून राज्यकारभार केला.

परंतु असे जरी असले तरी पुढे पुढे हा राजकारणातील या राजांचा उच्च ध्येयवाददेखील कंटाळवाणा होऊ लागला. याचे कारण असे की, जसजसे देशामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढू लागले तसतसे सुशिक्षित वर्गामध्ये आणि मध्यमवर्गामध्ये या राज्यपद्धतिविषयी असंतोष वाढू लागला. तसेच लष्करातील तरुण अधिकारी आणि देशातील बुद्धिवादी लोक यांना देशाच्या राजकारणात आपला देखील वाटा असावा असे वाटणे साहजिकच होते. एकतंत्री आणि एकांगी राज्यकारभार चाललेला असल्यामुळे देशाच्या प्रगतीचा वेग अत्यंत मंदावलेला होता. यामुळे बुद्धिवादी वर्गात आणि कर्तबगार लोकांमध्ये असंतोष पसरणे अगदी साहजिक होते. त्याचे पर्यवसान व्हावयाचे तेच झाले. १९३२ साली बंड झाले आणि त्या बंडाचा परिणाम म्हणून सयामला एक राज्यघटना आणि पाश्चात्यांच्या वळणावर लोकशाही राज्यपद्धत्ति मिळाली. एकसत्ताक अधिकाराचा अस्त झाला. परंतु केवळ एक कट किंवा बंड करून देशाची घडी संपूर्णपणे नव्या वळणावर येणे शक्यच नव्हते. त्यासाठी आणखी एखादे बंड तरी होणे आवश्यक होते. आणि तसे ते झालेही !

१९३२, १९३३ आणि १९४७ सालात सयाममध्ये तीन लष्करी कट झाले परंतु त्यामुळे युद्धानंतरच्या सरकारी कारभारामध्ये काही अगदी महत्त्वाचे किंवा मूलगामी फेरफार मुळीच झाले नाहीत. सरकारची असमर्थता किंवा कमकुवतपणा ही राजकीय व्यक्तींच्या वैयक्तिक कमकुवतपणाचा भाग होता. या सबंध काळातील एका अतूट धाग्याविषयी सांगायचे झाले तर असे सांगता येईल की, सयामने आपली आर्थिक धोरणे इतकी शहाणपणाने आखलेली

होती की त्यामुळे देशाचे स्वातंत्र्य धोक्यात येऊ नये. हे झाले आर्थिक क्षेत्राच्या बाबतीत, परंतु सयाम या देशाच्या प्रतिष्ठेची आणखी कितीतरी उदाहरणे देता येतील.

उदाहरणार्थ, पाश्चात्य देशात सयाम आपले वकील पाठवीत असे ते एका स्वतंत्र देशाचे वकील म्हणूनच पाठवीत असे. तेव्हाच्या चिनी सरकारच्या वकिलाप्रमाणे खंडणी घेऊन जाणारे हुजरे म्हणून नव्हे किंवा जपानप्रमाणे आडमुठे धोरण घेऊन जाणारे आणि व्यापाराची परवानगी नाकारणारे वकील म्हणूनही नव्हे. किंवा त्यांनी पाश्चात्यांना भारताप्रमाणे आपल्या अंतर्गत बंडाळीची लालूचही दाखविली नाही. १५०३ सालापासून सयाम पाश्चात्यांशी व्यापार करीत होता आणि १९ व्या शतकात त्यांनी पाश्चात्यांची व्यापाराची थोडी मागणी मान्य केली तीही त्यांच्यावर भरपूर आयात कर लादून ! तांत्रिक ज्ञानाच्या बाबतीत सयामी लोकांनी पाश्चात्यांची मदत घेण्याचे नाकारले नाही. लाकूड आणि कथील यांच्या उत्पन्नाच्या बाबतीत त्यांनी ब्रिटिशांचे भांडवल घेतले. त्यांनी दोन हजार मैलांचा रेल्वेरस्ता बांधला आणि त्याचा दोन तृतियांश खर्च स्वतःच्या उत्पादनक्षमतेतून भागविला. त्यांनी अत्यंत कार्यक्षम भूदल आणि सागरी दल तयार केले. आर्थिक धोरणे ठरविण्याच्या बाबतीत त्यांनी ब्रिटिश तज्ज्ञांची मदत घेतली, परंतु एवढे सारे करूनही त्यांनी मोठ्या कटाक्षाने ब्रिटिशांपासून कर्ज घेण्याचे टाळले. याचे कारण असे की तेव्हा ब्रिटिशांनी एखाद्या छोट्या राष्ट्राला कर्ज देणे म्हणजे हळूहळू आपल्या साम्राज्यशाही पावलांना पाऊलवाट करून ठेवणेच होते !

१९३२ च्या कटानंतर देशात जी एक घटनात्मक राज्यपद्धती सुरू झाली तीमुळे नागरिकांचे जीवनात विशेष काहीच फरक पडलेला नव्हता. देश तेच एक शेतकीप्रधान जीवन जगत होता. मात्र देशात असाही एक छोटा वर्ग होता, तो वर्ग लोकसभेसाठी उभ्या राहिलेल्या उमेदवारांना मते देत होता. तसेच दैनंदिन राजकारणात रस घेत होता आणि शिक्षणाच्या सवलतींचा जास्तीत जास्त उपभोग घेत

होता. तसेच विचारस्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र्य आणि लेखन स्वातंत्र्याचाही पुरेपूर फायदा घेत होता.

थोडक्यात असे सांगता येईल की, १९३२ च्या उठावामुळे फक्त काही राजपुत्रांच्या हातून सत्ता गेली आणि ती देशातील सुविद्य लोकांच्या हाती आली.

लष्कराच्या बाबतीतही सयामचे त्याचे असे खास व्यक्तित्व दिसून येते. या वेळी सयामच्या आसपास ज्या ज्या वसाहती होत्या त्यांच्यामधील सेनेपेक्षा सयामची सेना अनेक बाबतीत निराळी होती. त्या सेनेचा नेता होता पिबुल सोंग्रॅम (*Pibul Songgram*) तो प्रथम प्रसिद्धीस आला तो राजपुत्र बोव्हाराडेज (*Bovaradej*) याचे पारिपत्य करून बोव्हाराडेज याने १९३३ चे घटनात्मक राज्य उलथून टाकण्याचा कट केला होता. या कटाचा संपूर्ण बीमोड पिबुल सोंग्रॅम याने केला. परंतु त्याचा प्रतिस्पर्धी प्रिडी भानोमियांग (*Pridi Bhanomyong*) याने काही विचारवंताच्या साह्याने एका लोकप्रिय सरकारची स्थापना केली. परंतु तिच्यातील सर्व बीजे सत्ताधीशांचीच होती. तरी पण १९३२ पासून सहा वर्षे या गटाने सत्ता गाजविली, परंतु नंतर १९३८ च्या डिसेंबरमध्ये सत्तेची सूत्रे पिबुल याने हातात घेतली आणि तो देशाचा पंतप्रधान झाला.

१९३९ साली सयामच्या इतिहासात एक मोठी घटना घडली. सयामचे नाव थायलॅन्ड असे ठेविले गेले. १९४०–४१ साली थायलँड मध्ये सरहद्दीवरील युद्धास सुरुवात झाली. प्रथम यांच्या फ्रेंचांशी चकमकी सुरू झाल्या. त्याचे कारण सरहद्दीवरील काही प्रांतांची देवाणघेवाण होती. त्यानंतरचा प्रश्न होता चिनी नागरिकांचा. कारण थायलॅन्डमध्ये कायम झालेले हे चिनी नागरिक त्यांच्या हातात बरेच प्रमुख उद्योगधंदे असल्यामुळे अकारण देशाच्या राजकारणात ढवळाढवळ करीत होते. आणि जरी ते थाय देशात राहात असले तरी त्यांच्या निष्ठा चीनमध्येच होत्या. अशा रहिवाशांवर काही नियम घालून थाय सरकारने खूप नियंत्रणे घालून त्यांना ताळ्यावर आणले. दुसरी एक गोष्ट सयामच्या इतिहासात दूरगामी परिणाम करणारी

ठरली ती म्हणजे त्यांनी मलाया मुस्लिमांचे देखील सयामीकरण करण्यास सुरुवात केली. थाय भाषा, कायदे आणि कपडे यांचा त्यांच्यावर जबरदस्ती करून प्रचार करण्यास सुरुवात केली.

हे सर्व प्रकार थायलँडमधील एका गटामध्ये खूपच लोकप्रिय झाले. परंतु पुढे १९४१ साली जपानने थायलँडवर चढाई केली तेव्हा मात्र त्यांच्यापुढे अनेक प्रश्न उपस्थित झाले. जपानी शक्तीशी सहकार करायचा का प्रतिकार? हा प्रश्न तेव्हा फारच महत्त्वाचा ठरला. परंतु पुढे लगेच पंतप्रधान पिबुल याने निर्णय घेतला. जापानशी सहकार्य करावयाचे हा तो निर्णय होता! या निर्णयाच्या मुळाशी दोन कारणे होती. एक म्हणजे आपल्या देशाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवणे आणि दुसरे त्यांना असलेली फॅसिस्टांविषयीची सहानुभूति!

जपानी आक्रमकांशी शेवटपर्यंत झगडा देण्याऐवजी पिबुल याने थोड्याच दिवसांच्या प्रतिकारानंतर शस्त्रे खाली ठेवण्याचा हुकूम दिला. इतकेच नव्हे तर या पंतप्रधानाने जपानशी सहयोग केला आणि जपान आणि थायलँड यांनी एकत्र येऊन ब्रिटन आणि अमेरिकेशी युद्धाची घोषणा केली. जपानशी दहा वर्षांचा सांस्कृतिक करार केला आणि अशा रीतीने एखादी जादूची कांडी फिरावी त्याप्रमाणे थायलँड देश जपानला शरण गेला. त्यांच्या कधीही न संपणाऱ्या मागण्या आणि अटींपुढे त्याने मान तुकविली!

अशा प्रकारच्या सरकारची किळस असणाऱ्या प्रिडीने मग आपल्या चळवळींना जोरात सुरुवात केली. एव्हाना प्रिडीचे महत्त्व देशात खूपच वाढलेले होते आणि केवळ धाकदपटशा किंवा जुलूम जबरदस्ती करून प्रिडीची राजकारणातून हकालपट्टी करता येणे थाय सरकारला शक्य नव्हते. ही चळवळ वाढवीत वाढवीत प्रिडीने दोस्तांची मदत घेतली आणि अतिशय शिस्तीने, परंतु तेवढ्याच धैर्याने प्रिडीने घटनात्मक पद्धतीने सत्ता हस्तगत केली आणि जुलै १९४४ मध्ये त्याने पिबुल सरकारची हकालपट्टी केली. नंतर आपला नेता खुआंग आफाईवांग (*Khuang Aphaiwong*) याची पंतप्रधान म्हणून नेमणूक केली.

जपान्यांना स्वातंत्र्यप्रिय सयामी लोकांच्या प्रतिकाराची कल्पना नव्हती असे नाही. परंतु आता या नव्या परिस्थितीत या नव्या सरकारशी सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे जपानी मुत्सद्देगिरीने ठरविले !

आता तर थायलँडची परिस्थिती पूर्वीपेक्षा फारच वाईट झालेली होती. दुसऱ्या महायुद्धाचा फटका त्यांना चांगलाच बसला होता. देशाची आर्थिक घडी पार विस्कटून गेलेली होती. सयामचे दळणवळणाचे मार्ग, वीजकेंद्रे आणि मोठमोठाली शहरे बाँबफेकीने विस्कळित झालेली होती. तसेच उद्योगधंद्याची मोठमोठी केंद्रेही विस्कळित झालेली होती. तांदूळ, रबर, जस्त आणि लाकूड यांचे धंदे बसले होते. याचे कारण एक तर बाहेरची मागणी नव्हती आणि दुसरे म्हणजे खेड्यातील लोकांचा ओघ शहराकडे वळण्याला सुरुवात झालेली होती. त्यामुळे मुख्यतः तांदूळ, रबर, लाकूड वगैरेंच्या उत्पादनावर परिणाम झालेला होता. त्यातच अमेरिका सोडली तर बाकीच्या प्रबळ देशांशी सयामचे संबंध चांगले राहिलेले नव्हते ! अमेरिकेचे भांडवल या देशात फार अल्प प्रमाणात होते, तशी गोष्ट ब्रिटनची नव्हती. ब्रिटनने आपले प्रचंड भांडवल या देशात गुंतविलेले होते. त्यामुळे आपली सुरक्षितता पिबुल सरकारच्या हाती बिनघोर आहे याची त्याला शाश्वती नव्हती. तशीच स्थिति फ्रान्सची इंडोचायनाच्या संदर्भात होती. आणि कोमिंटांग चीनची तर गोष्टच निराळी होती. कारण थायलँडमधील चिनी नागरिकांबद्दल काळजी वाहणे चीनला आपले कर्तव्यच वाटत होते ! शिवाय आता चीनचा दर्जा बड्या पाच राष्ट्रात त्याचा समावेश होण्याइतका वाढलेला होता. तेव्हा आपल्या प्रतिष्ठेचा विचार करून थायलँडच्या बाबतीत पाऊल उचलणे त्याला आपले कर्तव्यच वाटत होते ! आणि जपान्यांच्या शरणागतीनंतर लगेच चिनी नागरिक आणि थाय यांच्यामध्ये बँकॉक शहरात धुमश्चक्रीला सुरुवात झाली. थाय सरकारने मात्र उच्च दर्जाच्या मुत्सद्देगिरीचा मार्ग स्वीकारून आंतरराष्ट्रीय राजकारणात आपला घसरलेला दर्जा सुधारण्यास सुरुवात केली. ब्रिटिशांचा राग शांत

करण्यासाठी, मलाया आणि ब्रह्मदेशपासून घेतलेला प्रदेश सयामने परत केला. आणि पिबुल याने युद्धाच्या केलेल्या घोषणेस प्रिडीने विरोध केला. प्रिडी यावेळी राष्ट्रीय नेता म्हणून समजला जाऊ लागला होता, म्हणजे केवळ सयाम देशापुरतेच नव्हे तर प्रिडीला जगाच्या दृष्टीनेही मान्यता मिळू लागलेली होती.

या नव्या चकमकीत, युद्धात, जपानशी सहकार्य करण्यात आणि ते मोडण्यात ब्रिटन, फ्रान्स, चीन वगैरे देशांशी सहकार्य करण्यात आणि ते मोडण्यात सयामला एक मौलिक अनुभव आलेला होता. तो म्हणजे तांदुळाचे उत्पादन ! सयामचे तांदुळाचे उत्पादन जागतिक प्रतिष्ठा मिळविण्याचे एक प्रमुख साधन होऊ शकते याची त्यांना प्रचीति आलेली होती !

दुसरे महायुद्ध समाप्त झाल्यापासून सयामचे अमेरिकेशी असलेले संबंध अधिक अनौपचारिक पातळीवर आलेले होते. हे संबंध चांगले राहण्याला सयामचे परराष्ट्रीय धोरणही कारणीभूत होते. हे धोरण त्यांनी इतके शहाणपणाने आखलेले होते, की त्यामुळे देशादेशांच्या संबंधातही बिघाड उत्पन्न होऊ नये, आपल्या देशाची प्रतिष्ठाही कायम राहावी, बाहेरून येणाऱ्या मदतीमुळे आपल्या सार्वभौमत्त्वाला बाध येऊ नये आणि यूनोमध्येही आपली प्रतिष्ठा वाढावी. ही शेवटची, म्हणजे यूनोमध्ये सभासदत्व मिळविण्याची शिष्टाई करण्यासाठी मात्र सयामला चीन, फ्रान्स आणि रशियाशी बऱ्याच बाबतीत मिळतेजुळते घ्यावे लागलेले होते ! कारण तसे केले नसते तर यांपैकी कोणी ना कोणीतरी नकाराचा अधिकार वापरून (*Veto*) सभासदत्व मिळण्याला खीळ घातली असती !

२३ जानेवारी १९४६ रोजी सयामने चीनबरोबर स्नेहभावाचा तह केला. या तहान्वये चीन आणि सयाम यांना आपापल्या मुत्सद्द्यांची नेमणूक एकमेकांच्या देशात करणे सोपे झाले. या मुत्सद्द्यांच्या नेमणुकीमागील हा उद्देश होता, की एकमेकांच्या देशातील एकमेकांशी संबंधित असणाऱ्या निरनिराळ्या क्षेत्रात स्नेहभाव निर्माण व्हावा आणि देशाची प्रगती होण्यास साह्य व्हावे. परंतु ही शिष्टाई

एका बाबतीत तरी यशस्वी झाली नाही. ती म्हणजे सयाममध्ये स्थायिक झालेल्या चिनी लोकांच्या हक्काचा प्रश्न ! त्यातही दोन प्रमुख प्रश्न होते. ते म्हणजे चिनी लोकांचे नागरिकत्वाचे हक्क आणि त्यांच्या सयाममधील शिक्षणाचा प्रश्न. शिवाय काही प्रमाणात, चिनी लोकांनी, जे सयाममध्ये राहिलेले होते त्यांनी आपल्या देशात जाऊन सयाममधील वसाहतीकरण कमी करावे, या प्रश्नामध्येही दोन्ही देशांच्या मुत्सद्द्यांना यश मिळाले नाही !

शिवाय फ्रान्सबरोबरचे संबंध सुधारण्यासाठी अनेक वेळा आंतरराष्ट्रीय मदतीची याचना करूनही सयामला त्यामध्ये यश आले नाही. तेव्हा १९४६ मध्ये त्याने इंडोचीनमधील सरहद्दीवरील प्रदेशावरील आपला हक्क सोडून दिला आणि त्याच वेळी सयामने १९३३ मध्ये कम्युनिस्टांविरुद्ध केलेले कायदे रद्द केले. त्याचे कारण रशियाने तशी मागणी केलेली होती आणि आता रशियाच्या मदतीची सयामला हरघडी मदत लागणार होती. कारण यूनोमध्ये जर सभासदत्व मिळवायचे तर बड्या राष्ट्रांची मनधरणी ही करायलाच हवी होती ! या साऱ्या गोष्टी केल्यावर मात्र सयामचा आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेचा मार्ग मोकळा झाला आणि डिसेंबर १९४६ मध्ये त्याला यूनोचे सभासदत्व मिळाले. परराष्ट्रीय संबंधांबाबत १९४६ अखेर थायलॅन्डच्या लक्षात आले की जपानबरोबरच्या सहकार्यामुळे जी चूक झाली आहे, ती घोडचूक नसून सुधारता येण्यासारखी आहे ! अजून देशाची आर्थिक परिस्थिति संपूर्णपणे धोक्यात आलेली नव्हती. दिशाहीन धोरणामुळे ती संकुचित झाली होती एवढेच. असे असले तरी सयाम हा देश आपल्या शेजारी देशांपेक्षा कितीतरी पटींनी सुस्थितीत होता ! एवढी गोष्ट मात्र खरी होती, की युद्धानंतरच्या परिस्थितीमुळे सयाममध्ये शेतकाम करणारा मजूर, शेतीविषयक अवजारे, दुभती आणि शेतीकाम करणारी जनावरे आणि आयात होणारा माल, उदा. कापड आणि औषधे यांचा तुटवडा पडलेला होता. यातच भर म्हणून चलनवाढीमुळे शहरातून अनंत अडचणींची परिस्थिति निर्माण झालेली होती.

अशी जरी परिस्थिति असली तरी देशात उत्पन्न होणारे धान्य देशातील लोकसंख्येला पुरून उरणारे असल्यामुळे परिस्थिति काबूत ठेवणे फारशी कठीण गोष्ट नव्हती. त्यातही ब्रिटन आणि अमेरिकेने मदत देऊन सयामचे दळणवळणाचे मार्ग सुस्थितीत आणले होते. तसेच रबराचा धंदाही पूर्ववत् चालावा यासाठी त्यांनी खूप मदत केली होती. त्यावेळी संपूर्ण आशियामधील अन्नाच्या तुटवडयावर मात करण्यासाठी आणि सयामची अंतर्गत परिस्थिति सुधारण्यासाठी, सयामच्या धान्योत्पादनात वाढ करणे फार आवश्यक गोष्ट होती. आणि ती प्रथम हाती घेणे जरूर होते. अमेरिकेने या गोष्टींकडे लक्ष देऊन त्या संदर्भात लागणारी सर्व मदत सयामला दिली.

देशाच्या अत्यंत आणीबाणीच्या काळात आपला देश झपाट्याने सुधारावा म्हणून पराक्रम करणारे सरकार खरे म्हणजे देशात प्रतिष्ठा पावावयास हवे होते, पण प्रिडी सरकारच्या बाबतीत ही गोष्ट घडून येऊ शकली नाही ! प्रिडीचे स्वतःचे नैपुण्य आणि त्याच्या अनुयायांची हुशारी याबाबतीत दुर्दैवी ठरली ! याचे एक कारण असे सांगता येईल की प्रिडी सरकारच्या पक्षाचे धोरण फार नरम होते उदार दृष्टिकोणाबरोबरच कडव्या शिस्तीची जी गरज असते त्या गरजेकडे प्रिडी सरकारच्या पक्षाचे दुर्लक्ष झालेले होते किंवा कार्यकर्त्यांमध्ये तशी लायकीच नव्हती म्हटले तरी चालेल ! आज भारतात जी स्थिती काँग्रेस पक्षाची झालेली आहे तशीच त्यावेळी सयाममध्ये होती. आज पक्षसंघटनेच्या, अंतर्गत विश्वासाच्या आणि पक्षाने योजलेल्या कार्यक्रमावरील विश्वासाच्या अभावी भारतातील काँग्रेस पक्ष नुसताच निर्बल झालेला नाही, तर १९६७ च्या निवडणुकीत त्याला देशातील अर्ध्याच्या वर मंत्रिमंडळे देखील गमवावी लागली ! देशाच्या आणि पक्षाच्या भवितव्याच्या दृष्टीने देखील अशी परिस्थिती भयावह असते. तीच स्थिती तेव्हा सयाममध्ये उद्‌भवलेली होती. सरकारी नोकर लाचलुचपतखोर बनले होते, काळचा बाजाराला ऊत आलेला होता, चोरट्या मार्गानी मालाची ने-आण करण्याचे प्रकार सर्रास सुरू झालेले होते. तांदूळ, जस्त आणि रबर यांच्या चोरट्या

व्यापारामुळे काळ्या बाजाराला भरती आलेली होती आणि या सर्व प्रकारांवर सरकार आपली पकड प्रभावीपणे बसवू शकत नव्हते. १९४७ च्या आकडेवारीवरून असे लक्षात येईल की, त्यावर्षी चोरट्या मार्गांनी चीन आणि मलायामध्ये गेलेला तांदूळ अधिकृत मार्गाने गेलेल्या तांदुळापेक्षा कितीतरी अधिक होता !

ही अंतर्गत अशांतता घालविण्यासाठी आणि आपले सार्वभौमत्व टिकविण्यासाठी सयामला ब्रिटिशांशी एक तह करावा लागला. त्याच सुमाराला, म्हणजे १९४६ साली सयाममध्ये प्रामुख्याने दोन पक्षांची निर्मिती झाली. तिसराही लष्करी नेत्यांचा एक पक्ष होता, पण त्याचा प्रभाव पडत नव्हता. हे दोन पक्ष मुख्यत: उदारमतवादी आणि पुराणमतवादी विचारसरणीच्या लोकांचे प्रतिनिधित्व करीत होते. परंतु या दोन्ही पक्षांना निर्णायक बहुमत नव्हते. सरकारी पक्षाचे धोरण सर्वसाधारणत: उदारमतवादी आणि लोकशाही मतप्रणालीवर आधारलेले होते. परंतु असे जरी होते तरी प्रामुख्याने खुर्ची टिकवू वृत्ती ही कोणत्याही पक्षाच्या प्रवृत्तीचा आत्मा होता असेच म्हणावे लागेल !

यामध्ये एवढीच एक गोष्ट महत्त्वाची होती, ती म्हणजे प्रिडीच्या आग्रही वृत्तीच्या आणि शक्तीच्या वळापुढे नमून, या वरील दोन्ही पक्षांनी अंतर्गत एकजूट करून मार्च १९४६ ते नोव्हेंबर १९४७ पर्यंत राज्यकारभार हाकण्याचा प्रयत्न केला होता.

जानेवारी १९४६ मध्ये सयामची दुसरी घटना तयार करण्यासाठी निवडणुका लढविल्या गेल्या होत्या. यामध्ये फक्त उद्देश एकच होता आणि तो म्हणजे प्रिडीच्या पक्षाला असेंब्लीमध्ये जे बहुमत मिळालेले होते ते धुवून काढणे. परंतु लगेच पुढे एक दुर्दैवी घटना घडली, ती म्हणजे जून १९४६ मध्ये तेथल्या लोकप्रिय राजाचा अत्यंत अनपेक्षितपणे खून झाला. त्या राजाचे नाव आनंद होते. *( Ananda )* हा राजा आपल्या अंथरुणात बंदुकीची गोळी लागून गतप्राण झालेला आढळला. त्याच्या मृत्यूचे हे एक गूढच होते. आणि

या मृत्यूमुळे पुन्हा या दोन्ही पक्षातील लोकांना आणि कार्यकर्त्यांना आपसात लाथाळ्या करण्याची संधी मिळाली. असेंब्लीमध्ये दररोज या एकाच प्रश्नावर प्रश्नोपप्रश्नांची सरबत्ती झडू लागली ! प्रिडी सरकारची या प्रश्नाला तोंड देण्याची असमर्थता, प्रिडीची दीर्घ-काळपर्यंतची देशामधील अनुपस्थिती आणि जनतेचा वाढता असंतोष यांचा एकच परिणाम झाला. तो म्हणजे पिबुल यांचे सयामच्या राज-कारणात पुन्हा आगमन झाले !

पिबुल सरकार अधिकारावर आल्यानंतर तथाकथित लोकशाही पक्षांची, जे फक्त संधीसाधू वृत्तीने लडबडलेले आणि लाचलुचपतखोर वृत्तीने बरबटलेले होते, त्यांची डाळ शिजेनाशी झाली. मात्र या बदलामुळे राजकीय पक्षांमधील लोकशाही, किंवा नेमस्त मार्गाने पुन्हा सत्ता मिळविण्याची आशा मावळली. घातपाती अथवा बळाचे मार्ग अवलंबिण्यावाचून आता गत्यंतर राहिले नव्हते. परंतु असे जरी असले तरी पुढे १९४७ साली जो उठाव झाला त्यामागे फक्त राजकीय असंतोष नव्हता, किंवा असे जरी म्हटले तरी चालेल, की त्या पाठी-मागे राजकीय असंतोष मुळीच नव्हता. कारण थायलँडच्या नागरि-कांची वृत्ति पाहता असल्या प्रकारचे वैध मार्ग अवलंबिण्याकडे त्यांचा कल झुकणे शक्यच नव्हते. म्हणून हा जो उठाव झाला, त्याचे पुढे जे विश्लेषण झाले त्यामध्ये असे दिसून आले की केवळ आर्थिक हालाखीमुळे हा उठाव झालेला होता.

प्रिडी सरकार अनेक प्रकारच्या तहनाम्यांनी बांधले गेलेले होते, त्यात ब्रिटिश मालकीचे मोठमोठे—जस्ताचे आणि लाकडाचे—कारखानदार केवळ आपण पूर्ण स्वतंत्र आहोत या भावनेने प्रिडी सरकारशी वागू लागलेले होते, तसेच या सरकारला व्यापारी वर्गा-कडूनही सहकार्य मिळेनासे झालेले होते, आणि अशा मोठमोठ्या व्यापाऱ्यांवर सरकारचा वचकही राहिलेला नव्हता. आजची भार-ताची परिस्थिती बरोबर सयामची १९४७ साली जशी होती अशीच झालेली आहे. म्हणून प्रत्येक भारतीयाने या दोन्ही घटनांचा सूक्ष्म आणि व्यवहारी दृष्टिकोणातून अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रिडी

सरकारने या बिकट परिस्थितीवर मात करण्याचे त्यावेळी खूप केविलवाणे प्रयत्न करून पाहिले. त्या सरकारने कारखानदार आणि व्यापारी वर्गाला ताळ्यावर आणण्यासाठी बरेच कडक कायदे केले. तसेच निरनिराळ्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी निरनिराळ्या समित्या नेमल्या. आणि त्या समित्यांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालाची अम्मलबजावणी करण्यासाठी एक यंत्रणा नेमली. परंतु हा साराच खटाटोप व्यर्थ ठरला.

त्याचे कारणही अगदीच उघड होते. कारण ज्या देशात सरकारचा वचक राहात नाही तेथे कितीही समित्या नेमा, अथवा क्रांतिकारी कायदे करा. शेवटी त्या समित्या आणि ते कायदे कुचकामीच ठरत असतात. याचे कारण असे की देशात अस्थिरता निर्माण झाली म्हणजे लाचखाऊ वृत्ति अतोनात वाढते. कारण जीवन अस्थिर बनलेले असते आणि अशा जीवनात जे ज्या वेळी, ज्या मार्गाने मिळेल ते हस्तगत करण्याची प्रवृत्ति वाढीला लागते. सयाममधल्या कायद्यांची तीच गत झाली. कायद्याची अम्मलबजावणी करणारे लोकच पैसे खाऊ लागले आणि ती सारी यंत्रणा सडून गेली. सरते शेवटी प्रिडी सरकारची जी काही थोडीफार लोकप्रियता शिल्लक राहिली होती तीही पार नष्ट झाली! लष्करी नेता पिबुल याने नोव्हेंबर १९४७ मधील लष्करी उठाव यशस्वी केला याला बहुअंशी वरील परिस्थितीच कारणीभूत होती. दुसरे कारण, त्याने देशातील पुराणमतवादी नेमस्त पक्षाला या उठावात हाताशी धरलेले होते. परंतु हा उठाव जसा रक्तविरहित होता तसाच तो फार अल्पकालीन होता.

या उठावानंतर अपहायवाँग (*aphaiwong*) याने मंत्रिमंडळ बनविले. त्याने आपल्या सरकारात देशभक्त, कर्तबगार आणि एकात्मतेची जाणीव असणाऱ्या व्यक्तींची नेमणूक केली. आणि राज्यघटनाही बदलली. सयामची ही तिसरी घटना होय. या मंत्रिमंडळाच्या आणि राज्यशासनाच्या बनावामध्ये लष्कर प्रथम अत्यंत दूरदर्शीपणाने सत्तेपासून दूर राहिले. परंतु हा सारा बनाव आणि हे सारे परिवर्तन

फार तकलादू होते. कारण लवकरच मंत्रिमंडळातील नमस्त आणि लष्करातील काही शक्ति डोके वर काढू लागल्या. लोकसभेच्या निवडणुका १९४८च्या जानेवारी महिन्यात झाल्या. त्यामध्ये लोकशाही पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले. परंतु लष्करी नेत्यांना त्यांचे हे यश पाहवले नाही. लगेच लष्कराने हालचाल केली, लोकसभा आपल्या ताब्यात घेतली, आणि ८ एप्रिल १९४८ ला लष्करी नेता पिबुल याने पुन्हा सत्ता आपल्या हाती घेतली ! परंतु असे जरी असले तरी पण पिबुल सरकारने केवळ ही सत्ता हाती घेऊन सयामचे भवितव्य कोणाच्या हातात आहे हे जणू दाखवून दिले. प्रत्यक्ष राज्यकारभारामध्ये त्यांनी विशेष ढवळाढवळ केली नाही. उलट लोकशाहीवादी नेत्यांना त्याने लोकसभेत मानाचे स्थान दिले, इतकेच नव्हे तर अंदाजपत्रक तयार करणे आणि आर्थिक व्यवहारावर परिणामकारक लक्ष ठेवण्यासाठी त्याने याच नेत्यांना हाताशी धरले होते. दुसरीही एक महत्त्वाची गोष्ट पिबुल सरकारने केली ती म्हणजे त्याने सयामच्या सरकारी यंत्रणेत कसलेही बदल केले नाहीत.

पिबुल याने प्रथम पाश्चिमात्यांमध्ये स्वत:विषयीचा विश्वास उत्पन्न केला. नंतर लोकांना त्याने विश्वासात घेऊन सांगितले की, ‘ माझे सरकार जास्तीत जास्त प्रामाणिकपणे आणि देशाचे हित डोळ्यापुढे ठेवून राज्यकारभार हाकील ! ’ पिबुलच्या बोलण्यात, वागण्यात आणि दृष्टिकोणात हा जो बदल घडून आलेला होता याचे कारण फक्त ‘ अनुभव ’ असेच म्हणावे लागेल. अर्थात् अनुभवाला कर्तबगारीचीही जोड लागते अशी जोड देण्याचा मगदूर पिबुल यांच्यामध्ये कितपत होता आणि त्याचा त्याने कसा उपयोग करून घेतला हे पुढे येईलच.

लष्करातील हा कंपू राजकारणात घुसल्यावर त्याचा पहिला परिणाम जो दिसून आला तो सयामच्या परराष्ट्रीय संबंधावर. तांदुळाचे उत्पन्न १९४९ साली भरघोस आले आणि बाहेरच्या देशात त्याची प्रचंड निर्यात करणे पिबुल सरकारला शक्य झाले. ही एक गोष्ट. दुसरी अशी की, परराष्ट्रीय संबंध निश्चित करताना पिबुल-

सरकारने कम्युनिझम विरोधी दृष्टिकोण स्वीकारला होता. त्याचा चांगला परिणाम पाश्चात्य राष्ट्रावर, विशेषतः अमेरिका आणि ब्रिटनवर झाला. या दोन राष्ट्रांनी पिबुल सरकारच्या पूर्वीच्या सरकारपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात साह्य देण्यास सुरुवात केली. चीनच्या कोमिंटांग सरकारशी आणि कम्युनिस्टांशी सारख्याच निःपक्षपाती धोरणाने वागल्यामुळे त्याला सयाममधील चिनी नागरिकांकडून देखील लोकप्रियता मिळाली. दुसरी गोष्ट उघड उघड कम्युनिस्टांशी असहकाराचे किंवा विरोधी धोरण ठेवून देखील रशियाचे संबंध बिघडणार नाहीत याचीसुद्धा पिबुलने खूप काळजी घेतली होती. त्यामुळे रशियाशी सयामचे राजकीय संबंध टिकून होते.

पिबुलने भारताशी आणि चीनशी उत्तम संबंध राखण्याच्या बाबतीत मात्र निष्काळजीपणा दाखविला. आशियातील हे दोन महान् देश सर्व आशियावरच नव्हे तर जगावरदेखील आपला प्रभाव पाडण्याइतके महान् आहेत याची जाणीव पिबुलने ठेविली नाही. परंतु असे जरी असले तरी सर्वसाधारणपणे पिबुलने आपल्या देशाचे आंतरराष्ट्रीय महत्त्व वाढविले असेच म्हटले पाहिजे. अर्थात् त्याची कारणेही निराळी आहेत. खनिज आणि अन्नधान्याच्या बाबतीत सयामची विलक्षण संपन्नता या एकाच गोष्टीमुळे देखील बाहेरच्या देशाशी चांगले संबंध प्रस्थापित होण्यास मदत झालेली आहे, हे ऐतिहासिक सत्य आहे! त्यानंतर लगेच फ्रान्सशीही सयामचे संबंध सलोख्याचे झाले. याचे कारण 'इंडोचायनाच्या सरहद्दीचा प्रश्न मिटला आहे' असे फ्रान्सने जाहीर केले आणि सरहद्दीवरील सैन्य त्याने सायगावला पाठवून दिले. हे संबंध आणखीही उत्कृष्ट दर्जाप्रत सुधारले. याचे कारण म्हणजे या दोन्ही देशांनी आपापल्या वकिलाती एकमेकांच्या देशांमध्ये स्थापन केल्या. तसेच फिलिपाईन्स आणि ब्रह्मदेश या देशांशीही सयामने आपले संबंध सुधारले. तेथेही नोव्हेंबर–डिसेंबर १९४९ मध्ये वकिलातींची स्थापना झाली. तसेच यूनोमध्ये देखील सयामला महत्त्वाचे स्थान मिळाले. १९४९ च्या सुरुवातीला यूनोचे अन्न आणि शेतीविषयक कचेरी बँकॉकमध्ये सुरू केली. अति-

पूर्वेकडील देशांसाठी ही प्रमुख कचेरी समजली जाते. त्याच वेळी आर्थिक मंडळाची बैठकही सयामच्या राजधानीमध्ये भरली. हे मंडळ आशिया आणि अतिपूर्वेकडील राष्ट्रांच्या आर्थिक प्रश्नावर चर्चा करणार होते. थोडक्यात म्हणजे या सबंध वर्षात यूनोची निरनिराळी मंडळे आणि निरनिराळे प्रतिनिधि–आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक सल्ला देणारे–सयामला भेटी देऊन गेले होते.

मात्र याच वर्षात आणखी इतरही अशा काही घटना घडल्या ज्यामुळे सयाममधील पिबुलसरकारवरील विश्वास डळमळीत होऊ लागला. याचे एक कारण असे असले पाहिजे की १९४९ मध्येच चीनमध्ये कम्युनिझमची सरशी झालेली होती. एका शेजारी महान् राष्ट्रामधील ही प्रचंड उलथापालथ कदाचित् या चिमुकल्या देशावर परिणाम करण्यास कारणीभूत झाली असेल असे समजण्यास जागा आहे ! सबंध आग्नेय आशियातील राजकीय परिस्थितीलाच त्यामुळे हादरा बसलेला होता. याच वर्षी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सर्व आशियाई राष्ट्रांची एक बैठक नवी दिल्ली येथे बोलाविली होती. त्यावेळी उपस्थित झालेल्या इंडोनेशियाच्या प्रश्नावर चर्चा करून काही मार्ग काढण्यासाठी ही बैठक होती. परंतु त्या बैठकीस हजर राहण्याचे पिबुलने नाकारले. त्यामुळे सयाम आणि सर्व आग्नेय आशियाई राष्ट्रे यांच्यामध्ये एक विलक्षण ताण आला. परंतु पिबुलने लगेच ही परिस्थिती लक्षात घेऊन, या बैठकीसाठी आपला एक निरीक्षक पाठवून दिला. आणि हा निर्माण झालेला ताण अंशतः ढिला केला !

त्याच वर्षी दुसरीही एक गोष्ट घडली. फिलिपाईन्सचे अध्यक्ष क्विरिनो ( *Quirino* ) यांनी आग्नेय आशियाच्या संघटनेसाठी एक योजना आखली होती. अध्यक्षांनी असे सुचविले होते की, ब्रह्मदेश, भारत आणि फिलिपाईन्सच्या प्रतिनिधींनी बँकॉकमध्ये एकत्र जमावे आणि समान दृष्टिकोण असणाऱ्या प्रश्नावर चर्चा करावी. परंतु चीनशी असणाऱ्या आपल्या राजकीय संबंधामुळे पिबुलने या योजनेत फार उत्साहाने भाग घेतला नाही ! त्याची भूमिका अलिप्ततेची

आणि त्रयस्थाचीच होती. तेव्हा जरी चीनमधून सयामच्या वकिला-तीचे उच्चाटण झालेले होते तरी चीनच्या राष्ट्रीय सरकारशी सयामने आपले राजकीय संबंध अजून राखलेले होते. याच सालामधील सप्टेंबर महिन्यात पिबुलने जाहीर केले की अँग्लो–अमेरिकन सैन्याची आमच्या राष्ट्ररक्षणासाठी आम्ही मदत घेऊ! आणि त्याच महिन्यात माओ याने नवचीनला मान्यता देण्याविषयी सयामला आवाहन केले होते, त्यावरही पिबुल याने कोणताच पवित्रा घेतला नाही. इतकेच नव्हे तर नंतर जेव्हा पेकिंग रेडिओ सयामच्या या थंड धोरणावर ताशेरे झाडू लागला तेव्हाही पिबुल याने याबाबतीत सूडाची वृत्ति दाखविली नाही. रेडिओ पेकिंगने पिबुल याला पाश्चात्यांचा फॅसिस्ट बगलबच्चा ही उपाधि दिली होती.

सयामच्या इतिहासाकडे, प्रामुख्याने राजकीय इतिहासाकडे सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास त्या देशाच्या मनोधारणेतील काही वैशिष्टचे चटकन् लक्षात येतात. आतापर्यंत सयामच्या आर्थिक, भौगोलिक, राजकीय आणि सामाजिक घडामोडींचे शब्दचित्र मी उभे केले. त्यातूनच असे निदर्शनास येईल की सयामचे व्यक्तिमत्त्व निराळे आहे.

एक गोष्ट स्पष्ट दिसते की आग्नेय आशियातील हे सयामी लोक अशिक्षित, अविकसित असले तरी त्यांच्यामध्ये स्वातंत्र्यभाव-नेचा प्रखर उदय पहिल्यापासूनच झालेला दिसतो. आपल्या देशाचे स्वातंत्र्य बाहेरच्या लोकांकडून धोक्यात येवो अथवा आतल्या. त्याविरुद्ध बंड करून उठणे ही गोष्ट सयामी लोकांच्या रक्तातच भिनलेली आहे. लष्करी उठाव करून अन्यायाविरुद्ध आम जनतेत चीड उत्पन्न करणे हे त्या देशातील लोकांचे दुसरे वैशिष्टच आहे. राजकीय शहाणपण, ( *Political Consciousness* ) ज्याला म्हणतात आणि जे जगाच्या पाठीवरील कित्येक देशांच्या नागरिकां-मध्ये उपजतच असल्याचे दिसून येते ते शहाणपण सयामी लोकामध्ये उपजतच असल्याचे दिसते. तिसरी गोष्ट, सयामची प्रकृति ही सुसंस्कृत देशाची प्रकृति आहे. शिवाय कुठल्याही देशाच्या प्रगतीला जो एक जबरदस्त धोका असतो तो म्हणजे गतानुगतिक आयुष्य जगण्याची

सवय माणसांना जडलेली असते. जुने सोडणे आणि नव्याचा स्वीकार करणे त्यांच्या जिवावर येते. त्यामुळे राष्ट्राच्या जीवनात चैतन्याच्या लाटाच उसळत नाहीत! कारण आपल्या वाडवडिलांनी घालून दिलेल्या गोष्टीच आपण करीत राहायच्या आणि आपल्या पुढच्या पिढीलाही त्याच शिकवायच्या! त्यामुळे जीवनाचा संथपणा कधीच ढळत नाही आणि चैतन्याच्या लाटा, ज्या मानवी जीवनाच्या आणि देशाच्या जीवनाच्या प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक असतात, त्या उसळत नाहीत!

सयाम हा देश या गतानुगतिकत्वाच्या भावनेला अपवाद असला तरी सर्वस्वी अपवाद नव्हता! शेतीच्या बाबतीत तो अपवाद नव्हता. एवढी अफाट जमीन, सुपीक जमीन, पण तीमध्ये नवीन नवीन प्रयोग करून उत्पन्न वाढविण्याची सयामी लोकांना कधीच गरज भासली नाही. आणि त्यामुळे त्यांनी या बाबतीतील रूढीप्रियताही सोडली नाही. परंतु इतर बाबतीत मात्र तसे नव्हते. त्यामुळे या देशाच्या राजकीय जीवनात लष्करी उठाव खूपच झालेले दिसतात. अगदी पिबुल याने पुन्हा राजसत्ता हाती घेतल्यावर लगेच एक सशस्त्र उठाव झाला. मात्र या उठावाला लष्कराचा म्हणावा तेवढा पाठिंबा नसल्या-मुळे तो यशस्वी झाला नाही. तरीपण पिबुल सरकारच्या राज्यकार-भाराविषयी लोकांच्या मनात असंतोष धुमसत राहिला होता.

हा असंतोष पुढच्या जून–जुलै महिन्यात एकदम वर उफाळून आला. आणि लष्करी अधिकारी विरुद्ध नागरी नेते यांच्यामध्ये कडा-क्याचे वाग्युद्ध सुरू झाले! हे चर्चेचे युद्ध जवळ जवळ दोन आठवडे चालले होते. आणि मोठ्या कडाक्याच्या चर्चेनंतर या नागरी नेत्यांनी पिबुल सरकारवर असा आरोप केला की, हे सरकार अधिकाधिक पोलिसांचे आणि लष्करी सरकार होऊ लागले आहे. कारण हे सर-कार आणि लष्कर मिळून नेहमीच सयामची घटना पायदळी तुडवीत असते. त्यामुळे सयामचे राजकीय जीवन अस्थिर झाले आहे आणि नागरी जीवन अशाश्वत बनत चालले आहे!

शेवटी या कडाक्याच्या चर्चेला उत्तर देताना पिबुलने सांगितले

की, ‘ लष्कराच्या आणि पोलिसांच्या निष्ठा या माझ्याशी वैयक्तिक आहेत. त्या राजकीय स्वरूपाच्या नाहीत आणि त्यामुळे सयामच्या राजकीय जीवनावर लष्कराचे दडपण येण्याचा मुळीच धोका नाही. ही भीति किंवा हे सारे आक्षेप कपोलकल्पित आहेत. वस्तुस्थितीशी किंवा सयामच्या राजकीय भविष्याशी त्यांचा काहीच संबंध नाही ! ’

परंतु असे जरी असले तरी जनतेचा विश्वास पिबुलवर आणि पिबुलच्या लष्करी सरकारवर नव्हता. शब्द कितीही नरम आणि गोड ( जसे प्रे. आयूबखान आपल्या पाकिस्तानी जनतेला उद्देशून नेहमी बोलत असतात ! ) असले तरी कृति आणि शब्द यांचा मेळ बसला पाहिजे. तो जेथे बसत नसेल तेथे शब्द कितीही प्रभावी आणि मिठ्ठास असले तरी लोकांचा त्या शब्दांवर विश्वास बसत नाही. कारण लोकांना या शब्दांशी काही कर्तव्य नसते. त्यांना प्रामुख्याने हवी असते नेत्यांची कृति आणि ती अशी कृति की, जिच्या द्वारे त्यांच्या जीवनाचा विकास घडून येईल. म्हणून सयामच्या जनतेचे पिबुलवर खरे प्रेम नव्हते !

खरे म्हणजे सयाममध्ये प्रिडी हीच एक अशी व्यक्ति होती की जिने देशाचे राजकारण घटनेची बंधने पाळून, लोकशाहीच्या चौकटीत केले असते. परंतु त्याच्या दुर्दैवाने तरुण राजा आठवा राम यांचा खून झाला. आणि त्या खुनाचे गूढ शेवटपर्यंत तसेच कायम राहिले. शिवाय प्रिडीविषयी मोठ्या नेत्यांची मनेदेखील निर्मळ नव्हती ! कारण त्यांची राजकीय मते या लोकांना पटण्यासारखी नव्हती. यावेळी तर प्रिडी हा संपूर्णपणे परागंदा झालेली आणि पराभव पावलेली व्यक्ति म्हणून निर्वासितांचे जीवन कंठीत होता. आणि त्यामुळेच सयामचे सारे राजकीय प्रांगण लष्करी नेत्यांच्या घोडदौडीसाठी खुले झाले होते. जनरल पिबुल सोंग्रॅम याचे लष्करी सरकार आपला सारा लष्करी अंमल वेगाने राजकारणात उतरवीत होता.

ही त्याची हुकूमशाही १९५७ पर्यंत टिकली. त्याच्या सरकारची वैशिष्ट्ये मोठी मजेशीर होती. त्याच्या सरकारात लष्कर आणि पोलीस यांचा अधिकार चांगलाच होता. आरमारी सत्ता ही नेहमीच

पिबुलचा विरोध करीत होती आणि वायुसेना या दोघांच्या संघर्षात भाग न घेता राजकीय तोल राखण्याची भूमिका बजावीत होती. त्यावेळी नवा राजा नववा रामा हा फार लहान होता. त्यामुळे तो आपला प्रभाव देशावर आणि देशाच्या राजकारणावर पाडू शकत नव्हता. परंतु हळूहळू त्याने आपले आसन आणि प्रभाव बळकट करण्याचा प्रयत्न केला. सयामच्या इतिहासात मी मागे निवेदन केल्याप्रमाणे अनेक राजकीय उठाव झाले; अनेक वेळा घटना बदलली आणि अनेक राजकीय स्थित्यंतरे घडून आली. परंतु या साऱ्यांचा परिणाम मात्र फक्त लष्करी सत्ता प्रबळ आणि सर्वकष होण्यासच मदत झाली.

१९५५ साली एक मजेदार घटना घडून आली. त्या साली फील्ड मार्शल पिबुल हा ब्रिटनच्या दौऱ्यावर गेला होता. तेथे त्याने लंडनच्या हाइड पार्कमध्ये लंडनच्या राजकारणावर अत्यंत मोकळेपणाने चर्चा करणारे लोक बघितले. या साऱ्या प्रकाराने पिबुल प्रभावित झाला. आणि आपल्या देशात परत आल्यानंतर त्याने देखील सयामच्या नागरिकांना बँकॉकच्या उद्यानात सयामच्या राजकारणावर मनमोकळी चर्चा करण्याची मुभा दिली ! त्या अगोदर सयामचे नागरिक राजकारणावर उघडपणे उलटसुलट चर्चा करू शकत नसत. अशी त्यांना परवानगीच नव्हती ! अर्थात् अशी मोकळीक देण्याच्या पाठीमागे पिबुलचा एक स्वार्थी राजकीय डाव होता. तो म्हणजे आता निवडणुका जवळ आल्या होत्या. १९५७ च्या निवडणुकांमध्ये आपल्याला आणि आपल्या सरकारला बहुमत जर मिळायचे असेल तर लोकांना विश्वासात घेतले पाहिजे, लोकांच्या मनातून लष्करी राजवटीबद्दलची भीति काढून टाकली पाहिजे आणि अशा राजवटीतही विचारस्वातंत्र्याला वाव असतो असा (फसवा) आभास निर्माण करण्याचा पिबुलचा हा एक आपल्या देशाच्या नागरिकांविरुद्ध केलेला कटच होता असे म्हटले तरी त्यात काही वावगे होणार नाही ! परंतु हा साराच बनाव पिबुलच्या अंगाशी आला. कारण मते मिळविण्यासाठी पोलिसामधील नेत्यांनी ज्या आडमार्गांचा रस्ता धरला होता

ते सारेच पिबुलच्या अंगाशी आले. लाच देऊन मते मिळविण्याची मोहीम जनतेच्या क्षोभाला कारणीभूत झाली. जनतेचा या पोलीस नेत्यांविषयीचा राग उसळून वर आला आणि त्यातच फील्ड मार्शल सारित थानरॅट( *Sarit Thanrat* ) याने आणखी रॉकेल ओतले ! त्याने आपल्या प्रभावी भाषणाच्या द्वारे पोलिसांच्या कृतीवर भयंकर कोरडे ओढले आणि लोकांची मते जिंकली ! सारित हा लष्कराचा प्रमुख होता आणि तोच आता पोलीस प्रमुख फाओ ( *Phao* ) याचा कट्टर प्रतिस्पर्धी बनला. हा फाओ सयामच्या नेतेपणाची महत्त्वाकांक्षी स्वप्ने पाहात होता.

आणि याच वेळी पिबुलचा राजकीय प्रभावही अस्तास चाललेला होता. त्याचा फायदा घेऊन सारित याने पिबुल–फाओ यांचे सरकार आणखी एक लष्करी उठाव करून संपुष्टात आणले. पिबुल जीव घेऊन कंबोडियामध्ये पळाला. नंतर १९६० मधील बातमी अशी की हा माजी लष्करी नेता आणि माजी पंतप्रधान सयाममधील एका मठात गुप्तपणे राहिला होता. त्यानंतर १९६४ च्या जूनमध्ये त्याच्या मृत्यूची बातमी पसरली आणि अशा रीतीने सयाममध्ये पंचवीस वर्षे लष्करी अंमलाखाली राजकारण चालविणाऱ्या या ताऱ्याचा अंत झाला.

फील्ड मार्शल सारित याने लष्करी उठाव यशस्वीपणे घडवून आणून सयामच्या राजकारणाची सूत्रे आपल्या हाती घेतली ! परंतु अत्यंत अचानक रीतीने तो प्रकृतीचे कारण पुढे करून अमेरिकेला निघून गेला. या पाठीमागे काय गूढता होती हे त्याचे त्यालाच माहीत ! जाताना त्याने एक आयत्यावेळचे कामचलाऊ सरकार आपल्याच एका लष्करी अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली स्थापन केले. परंतु या कामचलाऊ सरकारला अतिशय संकटातून जावे लागले. सयामची राजकीय सूत्रे यशस्वीपणे हाती घेऊन देशाला प्रगतीच्या मार्गावर नेणे ही गोष्ट त्या सरकारच्या आवाक्याबाहेरची होती. परंतु पुढे ऑक्टोबर १९५८ मध्ये सारित परत आला आणि त्याने देशाच्या राजकारणाची सूत्रे आपल्या हाती घेतली.

२४ जून १९५९ रोजी फील्ड मार्शल सारित याने एका

सार्वजनिक भाषणात आपण केलेल्या लष्करी उठावाची कारणे दिली. हा दिवस १९३२ मधील लष्करी उठावाचा ऐतिहासिक दिवस म्हणून पाळण्यात आला होता. त्यात त्याने काही गोष्टी किंवा स्पष्टीकरणे अशी केली :

'आमच्या लष्करी उठावाच्या योजना कशा होत्या? एका व्यक्तीने कुठल्या तरी जबरदस्त महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन देशाच्या कारभाराची सूत्रे आपल्या हातात घेणे एवढाच मर्यादित हेतु या लष्करी उठावाच्या पाठीमागे मव्हता. पहिला आणि एकमेव हेतु या लष्करी उठावाच्या मुळाशी होता तो आपल्या देशाचे राष्ट्रीय ऐक्य अबाधित ठेवणे हा होता. उठाव होण्यापूर्वी देश अनेक प्रांतात विखुरला गेला होता. एकमेकातील वैरभाव, पराभवामुळे आलेली निराशा आणि भविष्याचा अंधार या साऱ्या गोष्टींमुळे देशाचे भवितव्यच धोक्यात आलेले होते. पूर्वीच्या सरकारचा सर्व पातळ्यांवरून झालेला पराभव त्याने मान्यच केलेला होता आणि आता त्या सरकारने सत्ता सोडण्यावाचून दुसरा काही मार्गच शिल्लक उरलेला नव्हता! आमच्या पुढे आता प्रथम हातात घ्यावयाच्या म्हणून ज्या काही गोष्टी आहेत त्यामध्ये, देशातील बिघडलेली हवा शुद्ध करणे, कलहाकडे नेणाऱ्या ज्या प्रवृत्ति बळावल्या आहेत त्यांचा निःपात करणे आणि राष्ट्रीय ऐक्यासाठी झटणे या गोष्टींना आम्ही प्राधान्य देणार आहोत. मला याची पूर्ण जाणीव आहे, की जर का राष्ट्रीय ऐक्य प्रस्थापित करण्याच्या कामी माझे सरकार पराभूत झाले तर मात्र आम्ही केलेला लष्करी उठाव फसला असेच म्हणावे लागेल!

'या कामासाठी मी निरनिराळ्या पातळ्यांवरून समित्या नेमणार आहे. या समित्यामधील सभासद हे त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ असतील. या समित्या सरकारला सल्ला देतील. आणि अशा तऱ्हेने देशामध्ये विचारांची देवाण-घेवाण सुरू होईल. शेवटी या साऱ्या गोष्टी कार्यवाहीत आणण्याची जबाबदारी माझ्यावर असली आणि सर्वाधिकार माझ्या हातात असले तरी त्या अधिकारांचा दुरुपयोग होणार नाही, तर विचारवंत, तंत्रज्ञ आणि त्या त्या विषयातील

प्रवीण लोकांच्या विचारातून निष्पन्न झालेला कार्यक्रमच राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून समजण्यात येईल. मी माझ्या सहकाऱ्यांची म्हणून जी निवड केलेली आहे त्या निवडीमध्ये माझे वैयक्तिक हितसंबंध गुंतलेले नाहीत. त्यांची निवड केवळ त्यांची गुणवत्ता, त्या त्या क्षेत्रांतील त्यांचा अधिकार आणि त्यांची सचोटी यांचा विचार करूनच त्यांना सरकारात घेतलेले आहे.

या आठ महिन्यांचा आढावा घेतल्यास एक गोष्ट प्रामुख्याने नजरेत भरते ती म्हणजे माझ्या सरकारने राष्ट्रीय ऐक्य अटळ राहण्यासाठी अत्यंत परिणामकारक उपाय योजलेले आहेत.'

अशा रीतीने सयामच्या राष्ट्रीय इतिहासातील हा बदल फील्ड मार्शल सारित याने राष्ट्रीय ऐक्याच्या एकमेव प्रेरणेने घडवून आणला. देशामध्ये हा आवश्यक बदल घडवून आणण्याच्या बाबतीत सारित याने खालीलप्रमाणे काही गोष्टी केल्या. त्यात प्रमुख म्हणून ज्या गोष्टीचे वर्णन करता येईल ती म्हणजे देशात येणारी कम्युनिझमची लाट थोपवून धरणे ही होय. यानंतर देशाच्या दैनंदिन आणि कौटुंबिक जीवनात सुख आणण्यासाठी त्याने अफू ओढण्यावर बंदी आणली, गुंडगिरीला आळा घातला आणि रात्रीच्या क्लबमधील निशाचरी जीवनावर निर्बंध आणले.

त्यानंतर नागरिकांचे जीवनमान सुधारण्याच्या दृष्टीने त्याने देशाच्या आर्थिक कार्यक्रमाची आखणी केली. जीवनमान सुधारण्यासाठी किंमती खाली आणणे ही एकच गोष्ट परिणामकारक ठरण्यासारखी होती. आणि वस्तूंच्या किंमती खाली आणणे ही गोष्ट सोपी नव्हती. त्यासाठी उत्पादनवाढ करणे आवश्यक होते आणि या सर्व गोष्ठींना चालना देण्यासाठी देशात नवे परिणामकारक बदल घडवून आणणे आवश्यक होते. तसेच शिक्षणाकडेही लक्ष देणे आवश्यक होते. कित्येक वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या जीवनात एक विचित्र प्रकारची मरगळ आलेली होती.

या साऱ्या गोष्टींकडे फील्ड मार्शल सारित याने लक्ष घातले आणि परिणामकारक बदल घडवून आणले. पिबुल सरकारपेक्षा सारित सरकार देशाची प्रगति घडवून आणण्याच्या कामी खूपच यशस्वी ठरले. देशामध्ये अनेक घटना अस्तित्वात आल्या. अनेक वेळा त्यात बदलही झाले. निवडणुका झाल्या. निवडून आलेले सरकार अधिकारावर आले. अनेक लष्करी उठाव झाले. या देशात अनेक राजांनी राज्ये केलीं, उदारमतवादी नेत्यांनीही राज्यकारभार सांभाळला, हुकुमशहांनीही आपली हुकुमत गाजविली. परंतु या देशात खरीखुरी लोकशाहीची मुळे कधीच रुजू शकली नाहीत.

वास्तविक सारित याने लष्करी उठाव घडवून आणल्यानंतर सयामच्या राजकारणात खूपच बदल परिस्थितीने घडवून आणले होते. लोकजागृतीचे कार्य तर सयाममध्ये १९३२ च्या पहिल्या लष्करी उठावापासूनच सुरू झालेले होते. पण तरी सुद्धा हा लोकजागृतीचा प्रवाह परिणामकारक रीतीने लोकशाही राज्यपद्धतीकडे झुकू शकलेला नव्हता. लोकजागृति शंभर टक्के झालेली होती परंतु लोकशाही मात्र शंभर टक्के नव्हती !

याची काही कारणे सांगता येतील. परंतु ही कारणे आहेत, राज्यशास्त्रातील नियम नव्हेत हे लक्षात घेतले पाहिज ! जरीही देशातील चळवळींनी राजसत्तेच्या शक्तींपेक्षा लोकसत्तेची शक्ति मोठी असते ही गोष्ट सिद्ध केलेली असली तरीही लोकसत्ता आणि लष्करी सत्ता यामध्ये लोकसत्ता श्रेष्ठ आहे हे अजून सिद्ध होऊ शकलेले नव्हते. कारण जेव्हा जेव्हा लोकांचे प्रतिनिधि म्हणून नागरी नेते निवडणूक जिंकून अधिकारावर येत तेव्हा तेव्हा राज्यकारभारात हमखास गोंधळ निर्माण होत असे ! आणि लोकांची श्रद्धा पुन्हा डळमळीत होत असे. अर्थात् नागरी जीवनात निर्माण झालेली अस्थिरता नेहमीच लष्करी अंमलाला सामोरी जात असते, तशी ती सयामच्या राजकीय इतिहासातही गेलेली दिसेल. दुसरे थायलॅन्डचे वैशिष्टच

असे आहे की हा देश कधीही इतर शेजारी देशांप्रमाणे साम्राज्य-वाद्यांची वसाहत बनला नाही. ढगाची सावली पडावी एवढा अल्पकाळ तो साम्राज्यवादाखाली होता. पण एकंदरीने त्याचा बाणा राष्ट्रीय आणि स्वातंत्र्यप्रियच राहिलेला आहे. तरीपण राज्य-कारभाराच्या दृष्टीने पाहता या देशात लोकशाहीची पाळेमुळे खोलवर का रुजू नयेत याचे आश्चर्य वाटते !

● ● ●

## आग्नेय–आशिया


भारत
काचीन स्टेट
चीन
मंडाले
ब्रह्मदेश
शान स्टेट
व्हिएतनाम
प्रोम
रंगून
थायलँड
(सयाम)
कंबोडिया
बँकॉक
अंदमानचा समुद्र
पेनांग
क्वालालंपूर
सिंगापूर
सुमात्रा

# ३. फिलिपाईन्स

मराठी ... ठाणे. स्थलप्रत


फिलिपाईन्सने तीनशे–साडेतीनशे वर्षांचा दीर्घ काळ पारतंत्र्यात काढला. एवढा काळ पारतंत्र्यात राहिलेला एखादा देश पुन्हा स्वातंत्र्याची हवा खाऊ शकतो हे जणू सिद्ध करण्यासाठीच अमेरिकेने, '१४ नोव्हेंबर १९३५ रोजी फिलिपाईन्सवरील अमेरिकेची सत्ता संपली' असे जाहीर केले! त्याच दिवसापासून फिलिपाईन्समध्ये कॉमनवेल्थ स्थापन झाले. दहा वर्षांच्या अवधीत या बेटांना संपूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्याचे उद्दिष्ट त्यामागे होते.

फिलिपाईन्सच्या पारतंत्र्याचा आढावा घेताना एक गोष्ट प्रामुख्याने नजरेत भरते ती म्हणजे अमेरिकेने, तेथे आपला अंमल चालू असता, रक्तपात, बंडे किंवा असेच निर्घृण उत्पात घडू दिले नाहीत. याचे कारण अमेरिकेतील राज्यकर्त्यांचा धोरणीपणा आणि

दूरदृष्टि याच गोष्टी प्रमुख होत. याचा अर्थ मात्र असा नाही, की या पारतंत्र्याच्या काळात फिलिपाईन्सवर काहीच अन्याय झाला नाही, त्यांच्यात काही वाग्युद्धे झाली नाहीत किंवा साम्राज्यवाद्यांच्या हेतु-विषयी फिलिपिनोज यांनी त्यांच्यावर टीका केली नाही. तसे सर्व काही झालेले आहे, तरीपण तुलनेच्या दृष्टीने पाहता इतर साम्राज्य-वाद्यांपेक्षा अमेरिकन साम्राज्यवाद मऊ होता.

दुसऱ्या महायुद्धानंतर सर्व वसाहती म्हणून असलेल्या देशामध्ये स्वदेश–स्वातंत्र्यविषयक भावना जोरात वर येऊ लागल्या होत्या. त्याचप्रमाणे त्या भावना फिलिपिनोज लोकांमध्ये निर्माण होणेहि साहजिकच होते. उलट राष्ट्रीयवादी भावनांचा उदय फिलिपिनोज-मध्ये फार पूर्वीपासूनच झालेला होता आणि स्वातंत्र्यविषयक राजकीय इतिहास घडण्यासहि त्या देशामध्ये पूर्वीपासूनच सुरुवात झालेली होती. वर केलेला १९३५ सालाचा उल्लेख त्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. प्रथम स्पॅनिश लोकांच्या जोखडाखालून मुक्त होण्यासाठी फिलि-पाईन्सच्या लोकांनी जो तीव्र लढा दिला त्याचे पर्यवसान एवढेच झाले की स्पॅनिश अंमल दूर झाला, परंतु त्याची जागा अमेरिकेने घेतली. आणि मग नंतरचे अर्धशतक अमेरिकन साम्राज्यवादाला निप-टून काढण्यासाठी फिलिपिनोजकडून म्हणावे असे प्रयत्न झालेले दिसत नाहीत. ४ जुलै १९४६ मध्ये फिलिपाईन्सने स्वातंत्र्य मिळविले. हे स्वातंत्र्य केवळ आर्थिक आणि राजकीय स्थैर्याचेच निदर्शक होते. सर्व रोगांवर इलाज असणाऱ्या त्रैलोक्यचिंतामणिप्रमाणे हे स्वातंत्र्य देशाचा सर्व बाजूंनी उद्धार करणारे ठरले नाही ! अनेक वर्षे रेंगाळत पडलेले आर्थिक आणि सामाजिक प्रश्न सोडविण्यास हे स्वातंत्र्य काही प्रभावी किंवा हुकुमाचा एक्का ठरू शकत नव्हते.

दुसऱ्या महायुद्धानंतर आशियातील इतर देशांप्रमाणेच शेती-विषयक सुधारणांची इथे रड होतीच. त्यामुळे लोकांचे जीवनमान सुधारण्यात अडथळे येणे साहजिकच होते. ही दोन जोखडे राष्ट्राच्या गळ्यात अडकलेली असल्यामुळे सुधारणांचा वेग रोखला जाऊन त्यामुळे देशात नैराश्य पसरणे ही ओघानेच निर्माण होणारी परिस्थिति




फिलिपाईन्स बेट समूह

फिलिपाईन्समध्येहि निर्माण झालेली होतीच. युद्धानंतरची एक चळवळ म्हणून फिलिपाईन्समध्ये जिचा उल्लेख केला जातो ती 'हुकबालाहप' या नावाने ओळखली जात होती. ही शेतकऱ्याची गोरिल्ला पद्धतीने एकत्रित झालेली संघटना होती. तिच्या हालचाली कम्युनिस्ट नेतृत्वाखाली आणि इशाऱ्यांखाली होत होत्या. या संघटनेच्या हातात, त्यांनी लुटलेली अमेरिकन आणि जपानी शस्त्रे होती. ही संघटना दुसऱ्या महायुद्धानंतर विलीन पावली नाही. उलट तिने फिलिपाईन्सच्या राज्यव्यवस्थेविरुद्ध प्रतिकाराची चळवळ चालूच ठेविली. फक्त तिने आपले नाव बदलून 'फिलिपाईन पीपलस लिबरेशन आर्मी' असे नाव ठेविले. तिच्या अनुयायांनी फक्त ग्रामीण भागातील सुधारणाविषयकच चळवळ हाती घेतली नाही, तर तथाकथित सरकारला शेवटचा रामटोला हाणण्यासाठीहि तिने कंबर कसली होती.

त्या वेळी फिलिपाईन्समध्ये अमेरिकन भांडवलदारांचे प्राबल्य तर होतेच, परंतु त्यांनी आपले जाळे केवळ व्यापाराच्या बाबतीतच या देशात पसरले नव्हते, तर शेतीविषयक साधने आणि उत्पादन यामध्ये देखील त्यांचा हात आणि प्रभाव होता. या अमेरिकन भांडवलदारांमध्ये त्या वेळी दोन मतांचे लोक होते. एकाचे मत फिलिपाईन्सवर आपला प्रभाव कायम ठेवून संपूर्ण आशियात आपल्या व्यापाराचे जाळे पसरावे, तर दुसऱ्याचा दृष्टिकोण असा होता की सबंध आशिया खंडातील जागृत होत असलेल्या राष्ट्रवादाची योग्य दखल घेऊन आपली पुढची दिशा फार काळजीपूर्वक ठरवावी!

१९४६ मध्ये फिलिपाईन्सने अमेरिकेशी एक व्यापारी करार केला होता. त्यामध्ये दोन्ही देशांच्या सहकार्याने फिलिपाईन्समध्ये उद्योग व्यापाराची वृद्धी कशी करता येईल याविषयी अनेक तरतुदी केलेल्या होत्या, तसेच १९४७ मध्येहि अमेरिका आणि फिलिपाईन्स यांचे व्यापारविषयक सल्लामसलत करणारे संयुक्त कमिशनहि नेमण्यात आलेले होते. या कमिशनने अत्यंत मौलिक सूचना करूनहि फिलिपाईन्सकडून त्यांची अम्मलबजावणी होऊ शकली नाही. याचे कारण दुसऱ्या महायुद्धाची झळ हेच होय. युद्धकाळात

या देशाला अनेक प्रकारच्या विनाशाला तोंड द्यावे लागलेले होते. आणि मोडतोड झालेल्या धंद्याची, शेतजमिनीची उभारणी आणि मशागत करून वर येणे केवळ अशक्य होते. त्यातहि वसाह-तीचे एक विशिष्ट अर्थशास्त्र शतकानुशतकांपासून तयार झालेले असते, त्याच्या कुचकामी सांगाड्यातून मुक्त होण्याची कल्पकता, मगदूर आणि शक्तीहि या देशामध्ये राहिलेली नव्हती !

याचे पर्यवसान जे अभिप्रेत असते तेच घडून आले होते आणि फिलिपाईन्सला व्यापार आणि आर्थिक समस्यांना तोंड देता देताच पुरे वाट झाली होती.

फिलिपाईन्सच्या कारभारात अमेरिकेची फार मोठी जबाब-दारी होती, त्या दृष्टीने या देशाच्या परिणामकारक वाटचालीची दिशा ठरविताना लोकसत्ताक राज्यपद्धतीकडे देशाची विचारशक्ती वळविणे आवश्यक होते. अमेरिकेचे अतिपूर्वेकडील देशांच्या बाबतीत जे राजकीय धोरण होते त्याला वरील विचार सुसंबद्धच होते. या दृष्टीने १९५० साली त्यांनी एका अर्थशास्त्रीय आढावा घेणाऱ्या समि-तीची योजना केली. त्या समितीचे प्रमुख म्हणून डॅनियल डब्लू. बेल (*Daneil W.Bell*) यांची नेमणूक केली गेली. या कमिशनने दूर-गामी दृष्टि ठेवून फिलिपाईन्समध्ये शेतीविषयक सुधारणा. आर्थिक आणि उद्योगधंद्याची प्रगति आणि सामाजिक कायदे करून या देशाला प्रगतिपथावर आणावयाचा प्रयत्न करणे हा उद्देश होता.

अर्थात् ही जी कामगिरी पार पाडावयाची होती ती साधीसुधी नव्हती. कारण आर्थिक क्षेत्रातील सुधारणा केवळ बाहेरून उपाय-योजना करून होत नसतात. शिवाय आर्थिक स्थैर्य घडवून आणताना राजकीय अडचणींकडे दुर्लक्ष करता येणेच शक्य नव्हते. त्यातल्या त्यात महत्त्वाची गोष्ट अशी होती, की फिलिपाईन्सच्या आधिपत्याला बाध न येता या साऱ्या गोष्टी करावयाच्या होत्या !

फिलिपाईन्सचा पहिला अध्यक्ष ( *Manuel Quezon* ) मॅन्युएल कझन याचे उद्‌गार वरील संदर्भात प्रसिद्धच आहेत. तो म्हणाला होता, ‘आमच्या देशातील लोकांनी एकत्र येऊन चाल-

विलेल्या सरकाराने आम्हाला नरकाकडे नेले तरी ते आम्हाला चालेल. परंतु अमेरिकन लोकांनी कारभार करून या देशात स्वर्ग जरी निर्माण केला तरी तो आम्हाला नको आहे !'

फिलिपाईन्स हा किती तरी बेटांचा मिळून एक देश बनलेला आहे. हा देश कसा बनला याचा एक फार मोठा राजकीय इतिहास आहे. त्यामध्ये अनेक युद्धे, अनेक आर्थिक करारमदार, व्यापारविषयक करारमदार आणि या साऱ्यांच्या अनुभवामधून उदित झालेली फिलिपिनोज नागरिकांची स्वातंत्र्यविषयक आकांक्षा. एक स्वतंत्र देश म्हणून एकत्र येण्याचा त्यांनी केलेला पक्का निर्धार या साऱ्यांचा मिळून फिलिपाईन्सचा इतिहास बनला आहे.

जवळ जवळ सात हजार बेटांचा मिळून फिलिपाईन्सचा देश बनलेला आहे. आशिया खंडाच्या आग्नेय दिशेला हा द्वीपसमूह आहे. या सर्व बेटांची मिळून भूमी एक लक्ष छप्पन्न हजार चौरस मैल होते. आणि इतक्या हजारो बेटांचा मिळून जरी फिलिपाईन्स देश बनलेला असला तरी भूमीच्या आणि लोकसंख्येच्या दृष्टीने हा देश एकावयवी आहे असेच म्हणावे लागेल. सर्वात मोठाली दोन बेटे आहेत. उत्तरेकडे लुझाॅन (*Luzan*) आणि दक्षिणेकडे मिंडानावो (*Mindanao*). लुझाॅनचे क्षेत्रफळ ४०४२० चौ. मैल आणि मिंडानावोचे ३६५३७ चौ. मैल आहे. त्या दोनशिवाय काही प्रमुख बेटांची नावे : बोहोल, सेबु, लीटे, मासबेट, नेग्रोस, पलावान, पानाय, मिंडोरो आणि सामार अशी आहेत. या सर्व अकरा बेटांमध्ये मिळून फिलिपिनो नागरिकांची लोकसंख्या जवळ जवळ पंचाण्णव टक्के आहे. १९५० साली झालेल्या खानेसुमारीनुसार फिलिपाईन्सची लोकसंख्या १,९५,१८००० होती. फिलिपाईन्सची प्रमुख शहरे : मॅनिला (लोकसंख्या १०२४५५८ १९४८ मध्ये), सेबु, झांबोआंगा, दाव्हावो आणि इलोइलो ही होत. बहुसंख्य फिलिपिनो नागरिक खेड्यातून राहतात.

येथील नागरिकांमध्ये जातीविषयक अनेक वैशिष्टये दिसून येतात. प्रामुख्याने फिलिपिनो नागरिकांचे मूळ मलाई लोकात दिसून येते. शिवाय हा देश पारतंत्र्यात असल्यापासून चिनी आणि स्पॅनिश

लोकांशी आलेल्या संबंधामुळे याचे आपसात विवाह झाले आणि फिलिपिनो नागरिकांमध्ये स्पॅनिश आणि चिनी रक्ताची वैशिष्टचेहि दिसून येऊ लागली. तसेच नऊदशांशापेक्षा अधिक लोकसंख्या ख्रिश्चन आहे. त्यामध्ये जवळ जवळ ऐंशी टक्के नागरिक रोमन कॅथॉलिक धर्माचे आहेत. मुसलमान जातीचे लोकहि अल्पप्रमाणात इथे दिसतात. तसेच मोठमोठ्या शहरातून स्पॅनिश, चिनी आणि अमेरिकन लोकांच्याहि वस्त्या आहेत.

या बेटांवरील नैसर्गिक साधनसामुग्रीमुळे फिलिपाईन्स देशाला आपोआपच एका विशिष्ट प्रकारचे वैभव प्राप्त झालेले आहे. मात्र युद्धापूर्वी लागवडीस योग्य असलेल्या जमिनीपैकी फक्त एक चतुर्थांश जमीनच वहीत केली जात होती. शेतीतून होणाऱ्या उत्पादनापैकी साखर, खोबरे आणि तंबाखू या वस्तूंची निर्यात होत असे आणि तांदूळ, मका आणि बटाटा यांची पिके घरगुती उपयोगासाठी देशातच ठेविली जात असत. युद्धापूर्वी दुसऱ्या काही महत्त्वाच्या वस्तूंचीहि निर्यात होत असे. या वस्तू म्हणजे सोने, मॅंगनीज आणि पिवळा रंग या होत. शेती आणि खाणीतील उत्पादन या दोन गोष्टीच त्यावेळी फिलिपाईन्सच्या आर्थिक आधार समजल्या जात होत्या. जेव्हा सर्व दृष्टीने देशाच्या साधनसामुग्रीमध्ये वैज्ञानिक दृष्टीने सुधारणा केली जाते आणि डोळस प्रयोग करून योजना आखल्या जातात, तेव्हाच कोणत्याहि देशाची आर्थिक स्थिति सुधारत असते. तशी सुधारणा अजून फिलिपाईन्समध्ये झालेली नव्हती.

एक राष्ट्र म्हणून आपल्याला मान्यता मिळावी म्हणून फिलिपिनो नागरिकांनी अनेक तीव्र आणि निकराचे लढे दिलेले आहेत. आपला पूर्वेतिहास, आपली संस्कृति या दोन्ही दृष्टीने श्रेष्ठ असून देखील फिलिपिनोजनी जवळ जवळ तीन शतके पारतंत्र्यात काढली. या तीन शतकात स्पेनने त्यांच्यासाठी राज्य केले. १८९६ सालापूर्वी फिलिपिनोजनी अनेक बंडे केली. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जिवापाड कष्ट केले. परंतु त्या कष्टाचे, त्या बंडाचे चीज होऊ शकले नाही. याचे कारण त्यांच्यामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ज्या प्रकारच्या संघटणेची,

एकीचो आवश्यकता असते तशी संघटना निर्माणच झालेली नव्हती. परकीय अंमलाविरुद्ध एखादा प्रांत बंड करून उठला तर दुसरा प्रांत थंड राहात असे. दोन प्रांत एकत्र झाले तर तिसरा त्यांच्यात सामील होण्याला उत्सुक नसे. त्यामुळे पारतंत्र्याचे जोखड झुगारून देण्यासाठी ज्या धडकीची आवश्यकता होतो तशी जोरदार धडक त्यांना केवळ संघटनेच्या अभावी मारता आली नाही.

परंतु ही गोष्ट इ. स. १८९६ मध्ये आणि तेथून पुढे शक्य झाली. त्या साली सारा फिलिपाईन्स देश एकत्र झाला. स्वातंत्र्यप्राप्तीच्या एकमेव भावनेने एकत्र झाला. आणि पारतंत्र्याविरुद्ध निकाराचे लढे देण्यासाठी बद्धपरिकर झाला. मात्र एखादी जादूची कांडी फिरावी तसे काही हे घडले नव्हते. जसजसा अधिकाधिक काळ लोटत चालला होता तसतसे शिक्षणांमुळे, दळणवळणाच्या साधनामुळे आणि तसाच इतरहि अनेक गोष्टींमुळे फिलिपिनोज लोकांमध्ये संघटण वाढले आणि संघटनाबरोबरच स्वातंत्र्यविषयक भावनाहि वाढली.

स्पॅनिश राज्यकर्त्यांना हाकून देण्यासाठी फिलिपाईन्समध्ये गुप्तमंडळे स्थापन होत होती. आणि त्या मंडळातर्फे कट रचले जात होते. अनेक वेळा हे कट उघडकीला येत आणि त्यामधील कार्यकर्त्यांना फाशीच्या तख्तावर चढावे लागे. असेच एक काटिपुनन नावाचे गुप्त मंडळ होते. या मंडळातील सभासदांनी आपल्या देशाला संपूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या शपथा घेतल्या होत्या. या मंडळांची तत्त्वे जशी उदात्त होती तशीच ती क्रांतिकारकहि होती. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी पडतील ते कष्ट आणि करावे लागेल ते दिव्य करण्याची या मडळातील सभासदांची प्रतिज्ञा होती. काटिपुनन या शब्दाचा अर्थ स्वदेशसतान असा आहे. या मंडळाचे बरेचसे शब्द परवलीचे असत काही संकेत, हालचालविषयक काही खुणांवरहि यांचे कार्य चालत असे. महिनो न् महिने या मंडळातील सभासद गुप्त रीतीने कार्य करीत असत.

अशीच आणखी दुसरीहि एक संस्था 'लालिगा फिलिपिना'

नावाची याच उद्दिष्टासाठी स्थापन झालेली होती. या संस्थेच्या संस्थापकाचे नाव 'जोसे रिझाल' असे होते. या संस्थेची सूत्रे फार चांगली होती. जुलुमाचा प्रतिकार, राष्ट्रीय उद्योगधंद्यांची वाढ, सक्तीचे शिक्षण आणि राष्ट्रीय ऐक्य वगैरे कार्यक्रम तिच्यापुढे होते. काटिपुननचा आणि 'लालिगा फिलिपिना' या सस्थेचा एकमेकाशी काहीहि संबंध नव्हता. मात्र काटिपुनन मंडळाचे बरेच सभासद याहि संस्थेचे सभासद होते ही गोष्ट मात्र खरी होती.

काटिपुनन संस्था राज्यक्रांतीची तयारी कोणालाहि संशय येऊ न देता अत्यंत गुप्त रीतीने करीत होती. परंतु कट म्हटला की तो शेवटपर्यंत गुप्त राहणे मोठे कठीण असते. स्पॅनिशांचे गुप्त पोलीस आणि फिलिपाईन्समधील मिशनरी लोक, येथील लोकांचे हाडवैरी होते. मिशनऱ्यांना या गुप्त मंडळाची माहिती होती आणि ऐनवेळी त्याचा स्फोट करण्याची योजना त्यांनीहि आखलेली होती. आणि एका वेळी या पाद्र्यांची योजना कल्पनातीत रीतीने यशस्वी झाली. एकदा या गुप्तमंडळाची काही परिपत्रके छापली जात असता काही पाद्री त्या छापखान्यात गेले आणि त्यांनी परिपत्रके पाहिली. त्या परिपत्रकात स्पॅनिशांची सार्वत्रिक कत्तल करावी असा मजकूर छापलेला होता. मग काय? स्पॅनिश सरकारला हे हवेच होते लगेच त्यांनीच मग सार्वत्रिक कत्तलीला सुरुवात केली. फिलिपिनोज लोकांना पकडणे आणि त्यांना ठार मारणे याशिवाय स्पॅनिशांना दुसरा उद्योगच राहिला नाही. या पर्वणीतच जोसे रिझॉल, ज्याने फिलिपाईन्सची कीर्ति जगभर पसरविली होती, त्याचा खून केला गेला. अत्यंत अमानुषपणे त्याचा खून झाला. या खुनामुळे मात्र आतापर्यंत अनेक कारणांमुळे अथवा न्यूनगंडामुळे मागे मागे घेणारी देशातील इतरहि राजकीय मंडळे भयंकर चिडली. आणि जुलुमाविरुद्ध प्रतिकार करण्यासाठी हिरिरीने पुढे सरसावली. या अनपेक्षित क्रांतीमुळे आगीत तेल ओतले जावे, त्याप्रमाणे सारा फिलिपाईन्स देश भडकून उठला.

या प्रचंड शक्तीच्या दर्शनाने फिलिपिनोजना आणखी नवे स्फुरण चढले. काटिपुननच्या सभासदांमध्येदेखील आता आणखी एका

क्रांतीचे शिंग लवकरच फुंकावे म्हणून निकडीचा विचारविनिमय सुरू झाला. अनेक सभासद प्रांताप्रांतातून फैलावले आणि क्रांतीचा वणवा पेटवीत निघाले. वीस प्रांतांपेक्षा अधिक प्रांतातून काटिपुननचे वजन वाढले आणि देशामध्ये नवचैतन्य निर्माण झाले. याचा फायदा घेऊन काटिपुननच्या सभासदांनी फिलिपाईन्सचे प्रजासत्ताक राज्य स्थापन झाले अशी ग्वाही फिरविली. इतकेच नव्हे तर शत्रूच्या मुकाबल्या-साठी आपले सैन्य लढण्यासाठी रणांगणावर पाठविले. या सैन्याचे नेतृत्व एमिलो अगिनाल्डो नावाच्या एका विलक्षण बुद्धिमान मनुष्याकडे दिले होते. त्याच्या नेतृत्वाखालील सैन्याने राज्यात चहूकडे धुमाकूळ घातला. फिलिपाईन्सच्या इतिहासात या तेजस्वी बंडाने फार मोठी क्रांति केली असे समजले जाते. जरीहि या क्रांतिची फळे फिलिपिनो-जना उपभोगावयास मिळाली नाहीत तरीहि या क्रांतीचे ऐतिहासिक महत्त्व आहेच. याचे कारण या क्रांतीच्या निमित्तानेच फिलिपिनोज एकत्र आले; आपण सर्वजण मिळून एक देश आहोत--एक राष्ट्र आहोत याची त्यांना प्रथमच जाणीव आणि साक्षात्कार झाला. तसेच आपले ध्येयहि एक आहे, ते म्हणजे आपला देश पारतंत्र्यातून मुक्त करणे, याची त्यांना प्रखरतेने जाणीव झाली.

देश स्वतंत्र केला पाहिजे आणि प्रजासत्ताक सार्वभौम राष्ट्राची स्थापना केली पाहिजे, या दोन प्रमुख गोष्टीच जणू वरील क्रांतीने फिलिपिनोजना शिकविल्या.

काटिपुननच्या सभासदांनी प्रजासत्ताकाची स्थापना केल्यानंतर दुसरी पायरी म्हणजे आपल्या राज्याची नीट आखणी करणे. कर-वसुली करून राज्याचा कारभार नीट चालण्याच्या दृष्टीने कारभाराची दिशा ठरविणे. परंतु जोपर्यंत स्पॅनिश लोकांचे राज्य होते तोपर्यंत वरील कोणत्याच गोष्टीला कागदोपत्री अमलाशिवाय काडीचाहि अर्थ नव्हता. कारण या बंडामुळे एकतर स्पॅनिश राज्यकर्ते चिडले होते. बंडखोरांचा सूड घेण्याचा एकमेव इरादा त्यांच्या मनात होता. तेव्हा त्यांनी प्रथम फिलिपाईन्समधील तद्देशीय पलटणीवर विश्वास न ठेवता स्पेनहून खास पलटणी मागविल्या. आणि त्या बंडखोरांवर

पाठविण्यास सुरुवात केली. अर्थात् त्या सैन्यापुढे टिकाव धरणे फिलिपिनोजना शक्यच नव्हते. केवळ बुद्धीने, एकात्मभावनेच्या शक्तीने किंवा देशभक्तीने भरून आलेल्या हृदयाने लढणे शक्य नसते. त्यासाठी हातात शस्त्र पाहिजे. ते शस्त्र होते स्पॅनिश राज्यकर्त्यांच्या हातात.

जितका शक्य होता तितका छळ आणि जुलूमजबरदस्ती स्पॅनिश लोकांनी फिलिपिनोजवर केली. रात्रंदिवस नागरिकांवर, देशभक्तांवर आणि काटिपुननच्या मान्यवर सभासदांवर गोळ्या घालण्याचे सत्र सुरू झाले. लोकांचा अनन्वित छळ होऊ लागला. परंतु याचे पर्यवसान लोकामधली स्वातंत्र्याची आणि क्रांतीची आग उलट भडकण्यासच मदत झाली. देश नेस्तनाबूत होण्याऐवजी अधिक एक झाला. आणि ५ जुलै १८९६ ला १४००० क्रांतिकारक पासिक खोऱ्यात बंडाकरिता एकत्र जमले.

परंतु आता मात्र स्पॅनिशांनी त्यांच्याविरुद्ध शस्त्र उचलले नाही. त्यांच्यातील फक्त काहीजणांना त्यांनी अटक केली.

त्याचे कारण असे होते की, स्पॅनिश सरकारच्या दिमतीला जी फौज होती तीमध्ये बहुसंख्य फिलिपिनो होते आणि आता बदललेल्या परिस्थितीनुसार या मुलकी लोकांवर विश्वास ठेवून वागणे स्पॅनिश सरकारला शक्य नव्हते. सरकार बंडखोरांवर हल्ला चढवीत नव्हते, पण त्यांची धरपकड जोरात चालू होती. एकामागून एक तुरुंग भरत होते. शेवटी गव्हर्नर जनरल याने आपल्या देशाहून फौज मागविली. दोन हजार सैनिक आणि दोन लढाऊ जहाजे आणि बराचसा दारू-गोळा तिकडून फिलिपाईन्सकडे वाटचाल करू लागला. पण फिलि-पाईन्समध्ये बंडालाहि जोर चढू लागला. पहिल्या सलामीत फिलि-पिनोजची पिछेहाट झाली. त्याचा फायदा घेऊन सरकारने मॅनिला शहरात ताबडतोब लष्करी कायदा पुकारला. बऱ्याच पुढाऱ्यांना लष्करातील लोक ठार करू लागले. भीषण हत्याकांड सुरू झाले. सरकार आणि जनता यांच्यात निकराचा लढा सुरू झाला. मॅनिला-तील निवडक देशभक्तांना सरकारने तुरुंगात डांबून ठेवले. सर्व वृत्त-

पत्रांवर, बंडाविषयी लिहिण्यावर बंदी घातली. लोकाच्या छळाला तर सीमाच उरली नाही. परंतु जनता देशभक्तीच्या भावनेने पेटली होती. ती प्राणांची पर्वा न करता प्रांताप्रांतातून बंडाचे निशाण उभारू लागली.

१ ऑक्टोबर १८९६ रोजी सरकारने स्पेनहून आणखी सैन्य मागविले, आणि त्यानंतर दररोज तिकडून सैन्य येऊ लागले. त्या वेळी स्पेनमधून फिलिपाईन्समध्ये आलेल्या सैन्याची संख्या २८००० वर भरली होती. परंतु ही चकमक रात्रंदिवस चालून देखील त्यामध्ये सरकारी पक्षाला यश लाभू शकले नाही !

कारण त्या वेळी स्पेन व अमेरिका यांचे युद्ध जुंपले होते. अगोदर कितीतरी महिने अमेरिका आणि स्पेन यांच्यात वैर निर्माण झाले होते. युद्धाची भीति निर्माण झाली तेव्हा अमेरिकेने आपले आरमार हाँगकाँग येथे आणून ठेवले होते. स्पॅनिशांप्रमाणेच अमेरिकेच्याहि वसाहती पॅसिफिक महासागरात होत्या. आपला माल खपविण्यासाठी अमेरिकेला वसाहतींची गरज होती. या वेळी स्पॅनिशांच्या पडत्या काळाला सुरुवात झाली होतीच. या संधीचा फायदा घेण्यास आणि आपला साम्राज्यविस्तार वाढविण्यास अमेरिका टपलेलीच होती. या मार्गात त्यांना मुख्य अडचण मॅनिलाची होती. एकदा का मॅनिला शहर हातात पडले की मग आपोआपच सारी बेटे आपल्या आधीन होण्यास वेळ लागणार नाही याबद्दल अमेरिकेची खात्री होती. तेव्हा या मार्गाने आत घुसण्याची अमेरिकेची हालचाल चालू होती.

या हालचालीतील मुख्य आणि महत्त्वाचा भाग असा होता. ॲगिनाल्डो हा फिलिपाईन्सचा परागंदा झालेला नेता त्यावेळी फिलिपाईन्समध्ये चाललेल्या धुमश्चक्रीकडे अत्यंत बारकाईने लक्ष ठेवून होता. त्याचा एक ब्रे नावाचा स्नेही सिंगापूर येथे होता. हा ब्रे पूर्वी फिलिपाईन्समध्ये रेसिडेंट म्हणून होता आणि तो ॲगिनाल्डो याचा स्नेही होता. ब्रे हा इंग्लिश गृहस्थ स्पॅनिशांच्या अरेरावीला उबगलेला होता, त्यामुळे ॲगिनाल्डो आणि ब्रे आता आणखी एका समान पातळीवर आलेले होते. ब्रे याने सिंगापूरला ॲगिनाल्डो यास बोलावून

घेतले. २१ एप्रिल रोजी ॲगिनाल्डो गुप्त वेषाने सिंगापूर येथे गेला. तेथे ब्रे याने ॲगिनाल्डो याची अमेरिकेच्या वकिलाशी गाठ घालून दिली. या तिघांमध्ये फिलिपाईन्सच्या सध्याच्या परिस्थितीवर बरीच बोलणी झाली आणि स्पॅनिशांविरुद्ध फिलिपिनोजना मदत करण्याचे अमेरिकेने मान्य केले. त्यासाठी त्यांनी एक अट अशी घातली, की फिलिपाईन्सने याच्या बदली अमेरिकेला फिलिपाईन्समध्ये व्यापार-विषयक काही खास सवलती द्याव्यात.

हे सारे काही झाले. परंतु प्रत्यक्ष अमेरिकेने स्पॅनिशांशी युद्ध करून फिलिपाईन्सवर ताबा मिळविला, तेव्हा मात्र अमेरिकेची दृष्टि एकदम बदलली. व्यापारविषयक सवलती आम्ही मागितल्याच नव्हत्या किंवा ॲगिनाल्डो याच्याशी आमचा काहीहि करार झालेला नव्हता अशी भाषा बोलण्यास लगेच अमेरिकेने सुरुवात केली. या विलक्षण बदलामुळे फिलिपाईन्सचे देशभक्त, ॲगिनाल्डोसकट सारे बुचकळयात पडले. कारण त्यांची समजूत अशी होती, की अमेरिका ही नुकतीच पारतंत्र्यातून बाहेर पडलेली असल्यामुळे पारतंत्र्याचे दु:ख तिला चांगले माहीत आहे. शिवाय इकडे क्यूबा बेटाच्या मुक्तते-साठीदेखील अमेरिका वचनबद्ध झालेली आहे. तेव्हा दिलेली आश्वा-सने अमेरिका जरूर पाळील. परंतु हा फिलिपिनोज यांचा भोळा आशावाद पार मावळला आणि त्यांचा भ्रमनिरास झाला.

अमेरिकेने स्पॅनिशांना हाकलून लावले आणि ॲगिनाल्डो याला क:पदार्थ लेखले. अमेरिकेचा लौकिक आणि परंपरा फार मोठी होती. हे लोक स्वातंत्र्यप्रिय आहेत. दुसऱ्या देशाशी प्रेमाचे आणि सलोख्याचे संबंध ठेवणारे आहेत आणि चिमुकल्या राष्ट्रांच्या रक्षणासाठीच त्यांनी शस्त्र हाती घेतले आहे अशा प्रकारचे अमेरिकेचे चित्र तेव्हा तयार झालेले होते. परंतु फिलिपाईन्सची बेटे हाती येताच अमेरिकेने झटकन आपले रूप बदलले. स्वातंत्र्यप्रेम वगैरे कुछ नहीं, आम्हाला फिलि-पाईन्स हवे आहे आणि ते आम्ही घेतले आहे, असा पवित्रा त्यांनी धारण केला.

इतकेच नव्हे तर पुढे पॅरिस येथे स्पॅनिश–अमेरिकन करार

झाला. त्या कराराचे नाव पॅरिस–करार असे आहे. या करारात अमेरिकेने स्पेनला दोन कोटी डॉलर्स द्यावे आणि त्याच्या बदल्यात स्पेनने फिलिपाईन्सवरील आपला हक्क सोडावा असे ठरले. शिवाय तेथेच स्पेन व अमेरिकेचे युद्ध संपल्याचेही त्यांनी जाहीर करून टाकले.

म्हणजे चोर आणि दरोडेखोर यांच्यात चोरीच्या मालाची वाटणी व्हावी आणि ज्याची चोरी झाली आहे, त्याचे मात्र सर्वस्व जावे असा हा प्रकार झाला म्हटले पाहिजे. अर्थात् आजवरच्या मानवी संस्कृतीचा इतिहास पाहिल्यास, इतर सर्व नीतिमूल्यांपेक्षा 'बळी तो कान पिळी' हे तत्त्व चहूकडे आचरिले गेले असल्याचे दिसून येते! फिलिपाईन्सच्या भवितव्यात यापेक्षा निराळे काय होणार?

वास्तविक फिलिपिनोजनी स्पॅनिशांना जेरीला आणलेले होते. चहूकडे राष्ट्रीय नेत्यांनी बंडाचा भडका उडवून दिला होता. स्पॅनिशांची 'दे माय धरणी ठाव' अशी गत झालेली होती. फक्त मॅनिला शहरात स्पॅनिश दबा धरून म्हणा किंवा दाती तृण धरून बसले होते म्हणा, परंतु अमेरिकन मुत्सद्दे‌गिरीने येथे बिचाऱ्या फिलिपिनोजवर मात केली. त्यांच्या मदतीसाठी धावून जाण्याचे नाटक केले. वर वर पाहता मॅनिलामधून अमेरिकेने स्पॅनिशांना हाकलून लावले आणि आतून त्यांच्याशी करार केला. वास्तविक फिलिपिनोज बंडखोरांच्याच हातून स्पॅनिशांची मॅनिलामधील उरलीसुरली सत्ता नष्ट झाली असती. तिला अमेरिकन आरमाराची किंवा लष्कराची मुळीच जरुरी नव्हती. परंतु फिलिपिनोज यांच्या हातून हार खाऊन तोंड काळे करून जाणे म्हणजे पाश्चिमात्यांच्या इभ्रतीला कमीपणा नव्हता का? ती मानहानी टळावी म्हणून स्पॅनिशांनी अमेरिकेशी काळेबेरे संधान बांधले. त्यांना अमेरिकेने हुसकून देण्याचे नाटक केले आणि कमीपणा येऊ नये म्हणून वर दोन कोटी डॉलर्सची खंडणीहि त्यांना दिली. अर्थात् त्यामुळे अमेरिकेचे काहीच नुकसान होणार नव्हते. कारण अमेरिकेचे सामर्थ्य स्पेनला मान्य होते, शिवाय फिलिपाईन्स सारखा देश दोन कोटी डॉलर्सना मुळीच महाग नव्हता!

फिलिपिनोजना मात्र या गुप्त राजकीय कारस्थानाची कल्पना

नव्हती. ते आपल्या पराक्रमाच्या व शौर्याच्या आनंदात गर्क होते. आपण स्वतंत्र झालो या कल्पनासाम्राज्यात ते धुंद होते. त्यांनी आपले रिपब्लिकन स्थापन केले व आपल्या देशाचा कारभारहि हाकण्यास सुरवात केली होती. अमेरिका आपल्या स्वातंत्र्यास अनुकूल आहे, अमेरिका ही आपल्या स्वातंत्र्याची भोक्ती आहे, वगैरे वगैरे उदात्त विचार, अमेरिकेसंबंधी फिलिपिनोजच्या मनात चालू होते. परंतु हा त्यांचा भ्रम ठरला. तिथेहि साम्राज्य-वादाचा वास त्यांना येऊ लागला. अमेरिकेची गुप्त कारस्थाने त्यांना समजण्यास थोडा उशीर लागला. हे खरे असले तरी तो लागला. नंतर त्यांनी वॉशिंग्टनला जाऊन आपले म्हणणे अमेरिकन राज्य-कर्त्यांपुढे मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचे म्हणणे कोणीहि ऐकून घेतले नाही. पुढे पॅरिसला स्पॅन–अमेरिका तहाची बैठक चालू अस-ल्याचे त्यांना कळले. तेव्हा त्यांनी पॅरिसला धाव घेतली. पण तेथेहि त्यांच्यासाठी दारे बंदच राहिली.

शेवटी पुनःश्च ' हरि ॐ ' या न्यायाने फिलिपिनोजनी आपला स्वातंत्र्याचा लढा आता अमेरिकेविरुद्ध सुरू केला. मॅनिला शहराच्या भोवती फिलिपिनोजनी वेढा दिलेला होता तो अधिक घट्ट केला. अमेरिकन लष्करी अधिकाऱ्यांनी हुकूमनामे काढले की फिलिपिनो-जनी हा वेढा उठवावा. आणि क्रांतिकारकांनी आणि मुल्की लष्क-राच्या शिपायाने हातातील शस्त्र टाकून शरण यावे ! अमेरिकन लष्करी जनरल ऑटिस याचा हा हुकूम होता. परंतु स्वातंत्र्यभावनेने अंतर्बाह्य पेटून निघालेले फिलिपिनोज क्रांतिवीर या हुकुमनाम्याला भीक घालीनात. लढा अखंड चालूच राहिला. शेवटी अमेरिकन लष्करी अधिकारी चिडले आणि त्यांनी मोठमोठाल्या मुल्की अधि-काऱ्यांचे खून करण्यास आरंभ केला ! हे खून दिवसाढवळ्या आणि अगदी सहजतेने होत. अमेरिकन शिपाईच काय परंतु मोठमोठाले जनरल्सदेखील देशात धुमाकूळ घालू लागले. अमेरिकन लोकांचे असले विश्वासघातकी आणि राक्षसी कृत्य पाहून फिलिपिनोजहि चिडले. ॲगिनाल्डोने यावर एक जाहिरनामा काढला. त्यामध्ये त्याने

अमेरिकन लोक आमचा कसा विश्वासघात करीत आहेत, पूर्वी स्पॅनिशांना हाकून लावण्यासाठी यांनी आमच्याशी सहकार्याचा करार कसा केला होता आणि तोच ते आता कसा पायदळी तुडवीत आहेत याविषयी, त्याने आपल्या देशबांधवांना सविस्तर निवेदन केले. आणि वर त्याने आपल्या देशबांधवांना स्वातंत्र्य लढ्यासाठी दुप्पट शक्तिनिशी खडे राहण्यासाठी आवाहन केले.

ॲगिनाल्डोच्या निवेदनामुळे फिलिपाईन्समध्ये निर्माण झालेल्या चित्राचे वर्णन जनरल ऑटिस असे करतो : या लढ्यासाठी सामान्य नागरिक तर सज्ज झालाच परंतु देशातील स्त्रियांचेहि रक्त उसळले. अनेक स्त्रियांनी एक पत्रक मजकडे पाठविले होते. त्यातील मजकूर असा होता की, आमच्या देशातील पुरुषांचे सारेच्या सारे रक्त देश स्वतंत्र करण्याच्या कामी खर्ची पडले तर त्यांचे जागी आम्ही स्त्रिया उभ्या राहून हा देश स्वतंत्र करण्याच्या कामी आमचे रक्त सांडू. पण कोणत्याहि परिस्थितीत आता आम्ही आमची मायभूमी पारतंत्र्यात खितपत राहू देणार नाही !

हे सारे बदललेले चित्र पाहून जनरल ड्युईहि विचारात पडला. फिलिपिनोजच्या बाबतीत आता असली अरेरावी आणि मुजोरी करून भागणार नाही ही गोष्ट त्याला पक्की समजून चुकली. आता शिरजोरी सोडून देऊन मुत्सद्देगिरीचा उपयोग केला पाहिजे आणि त्यासाठी अमेरिकेहून मुत्सद्दी पाठवा, असे त्याने अमेरिकेला ७ जानेवारी १८९९ रोजी कळविले. जे प्रश्न रक्ताने सुटत नाहीत ते शाईने सोडविले पाहिजेत असे एक वचन आहे, त्याचा अंगीकार अमेरिकेने करावयाचे ठरविले.

फिलिपिनोजच्या या साऱ्या गोष्टीची चीड येऊन त्यांनी जगाच्या उपेक्षेला भीक न घालता आपल्याच हिंमतीवर आपल्या देशाच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. मॅनिलापासून २५ मैलांवर मॅलेलो येथे ॲगिनाल्डो व त्याचे सहकारी यांनी राज्याची स्थापना केली. १३ सप्टेंबर १८९८ रोजी त्यांनी तेथे आपली कॉंग्रेस भरविली. या अधिवेशनासाठी देशातील निरनिराळ्या थरातून हजारो लोक

आले आणि उत्स्फूर्त भावनेने या स्वातंत्र्य–मेळाव्यात सामील झाले. याच वेळी ॲगिनाल्डो याने नव्या प्रजासत्ताक राज्याचे मंत्रिमंडळ नेमले. तो स्वत: अध्यक्ष झाला आणि इतर खाती त्याने अत्यंत लायक आणि स्वच्छ कारभार करणाऱ्या लोकांना वाटून दिली. ॲगिनाल्डोने आपल्या मंत्रिमंडळात जे लोक नेमले होते त्याच लोकांना पुढे अमेरिकेने मान्यता देऊन मोठमोठाल्या जबाबदारीच्या जागा त्यांना दिल्या. यावरून ॲगिनाल्डोच्या दूरदृष्टीची, निवडीतील शहाणपणाची कल्पना येते.

परंतु फिलिपिनोजच्या या स्वातंत्र्याला शेवटी देशातील धनिक आणि भांडवलदार वर्गानेच नख लावण्यास कशी सुरुवात केली हा इतिहास पाहण्यासारखा आहे ! या धनिक वर्गाला स्वतंत्र फिलिपाईन राज्याची भीति वाटू लागली. त्यांना वाटत होते, अमेरिकन सरकार किती प्रचंड आहे, त्याची शक्ति किती अफाट, काही झाले तरी त्याच्यापुढे फिलिपिनोजची डाळ कशी शिजणार ? आज नाही उद्या चकमकींना सुरुवात होणार. आणि असे झाले म्हणजे फिलिपिनोजचे हे टीचभर सरकार पाहता पाहता सपाट होईल. अशा वेळी आपल्या धंद्यांना, आपल्या पैशाला, आपल्या भांडवलाला संरक्षण कोण देणार ?

अर्थात् अशा आत्मघातकी आणि पारतंत्र्यप्रिय विचारांनी झपाटून हा धनिक आणि भांडवलदार वर्ग हळूहळू फिलिपिनोजच्या प्रजासत्ताकातून निघून अमेरिकन पंखाखाली जाऊ लागला. मॅनिलामध्ये तो स्थायी होऊ लागला.

असे होऊ लागले तरी ॲगिनाल्डोने त्यांची पर्वा केली नाही. ॲगिनाल्डोचे दोन आधारस्तंभ होते ते मात्र त्याला चिकटून राहिले. पहिला मॅबिनी, हा या क्रांतियुद्धातील मेंदू होता. त्याच्याच सल्ल्याने युद्धातील हालचाली होत असत. दुसरा होता लूना. तो सेनेचा अधिपती होता. त्याला जिवंत आग म्हणून संबोधिले जात होते. काय वाटेल ते झाले तरी स्वातंत्र्य मिळविलेच पाहिजे, अशा भावनेने पेटलेले हे वीर होते.

त्यांचे स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न चालूच होते. परंतु त्यामध्ये त्यांना यश मिळत नव्हते. कसे मिळणार? अखेर असल्या कंटाळवाण्या परिस्थितीला फिलिपिनोज कंटाळले. अमेरिकनहि कंटाळले. त्यांनी ४ फेब्रुवारी १८९९ रोजी पहिला हल्ला चढविला. अर्थात् पहिली गोळी अमेरिकेकडून आली आणि ओघानेच त्याच मार्गाचा अवलंब फिलिपिनोजना करावा लागला. उभय राष्ट्रांमध्ये युद्धाचा डोंब उसळला. हे युद्ध अडीच वर्षे चालू होते. युद्धाला सुरुवात होताच सर्व बंडखोर लोकांनी मॅनिलामधील सर्व परकीय लोकांची कत्तल करावी असा हुकूम सोडला. त्या वेळी मॅनिला शहरात तीन लाख फिलिपिनोज होते. आणि अमेरिकेजवळ शहराच्या संरक्षणाकरिता तीन हजारावर देखील पोलीस नव्हते. जे शिपाई होते, ते बाहेरून शहराचे रक्षण करीत होते. युद्धाचे सुरवातीस अमेरिकेचे एकंदर सैन्य फक्त चौदा हजार होते. त्यातील तीन हजार शहराच्या रक्षणासाठी गेले. पण फिलिपिनोज हे संख्येने व शस्त्रास्त्राने अधिक होते. पारतंत्र्यात तीनशेवर वर्षे काढलेल्या फिलिपिनोजजवळ वास्तविक शस्त्रास्त्रे असणे असंभवनीय. परंतु पूर्वी स्पॅनिशांबरोवर झालेल्या युद्धात त्यांनी बरीच शस्त्रास्त्रे जमविली होती. त्यातील काही लुटूनहि आणलेली होती. याशिवाय त्यांच्यावर स्वदेशी शस्त्रे (तरवारी सारखी) होती त्यांचाहि त्या लोकांनी उत्तम उपयोग केला. शिवाय फिलिपिनोजांचे सैन्य अगदीच नवखे नव्हते. स्पॅनिशांबरोवर झालेल्या युद्धाचा त्यांना अनुभव होता. ह्या सैनिकांची संख्या जवळ जवळ चाळीस ते पन्नास हजार असावी असा तर्क होता.

तरी पण या युद्धात फिलिपिनोज यांची पिछेहाटच होऊ लागली. अमेरिकन सैनिक खंदकात दबा धरून आपल्या देशाहून येणाऱ्या कुमकीची वाट पहात पडून राहिले. ११ फेब्रुवारीला त्यांनी इलोइलो नावाचे शहर जिंकले. नंतर अमेरिकन शिपाई हळूहळू एक एक शहर व्यापू लागले. तिकडे अमेरिकेतही अधिक सैन्य उभारण्याचे प्रयत्न सुरू झाले. एक लाख सैन्य फिलिपाईन्समध्ये पाठविण्याचे अमेरिकन सरकारने ठरविले. मार्च महिन्यात त्यापैकी काही तुकड्या

येऊन दाखल झाल्या आणि त्यानंतर क्रमशः थोड्या थोड्या तुकड्या येऊ लागल्या.

एकदा फिलिपाईन्स लढाई करून हस्तगत करावयाचे असे ठरल्यानंतर मग अमेरिकेजवळ सैन्याला, मनुष्यबळाला आणि पैशाला कसली कमतरता होती बरे ?

अमेरिकेच्या सैन्याने या युद्धात काय पराक्रम केले, किती हाल-अपेष्टा सोसल्या, किती प्राणाहुती दिल्या यांचे दर्दभरे वर्णन आज अमेरिकेच्या इतिहासात वाचावयास मिळते. परंतु बिचाऱ्या स्वातंत्र्य-प्रिय फिलिपिनोज यांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी कोण-कोणती अग्निदिव्ये पत्करली, किती लाखांनी प्राणाहुती दिल्या, किती स्त्रियांनी वैधव्य पत्करले यांचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल तो सुदिन !

अमेरिकेबरोबर लढताना फिलिपिनोजना जरी पराभव पत्करावा लागला, तरी पण कित्येक वेळा त्यांचा जय होऊन अमेरिकन साम्राज्यवादी सन्याला हात टेकावे लागलेले होते. परंतु दुर्दैव असे होते की, अमेरिकन राज्यकर्त्यांना आपल्या मायदेशाहून कुमक मागविता येत होती आणि तसे बिचाऱ्या फिलिपिनोजना करता येत नव्हते !

शेवटी जरी या युद्धात अमेरिकन फौजांनी फिलिपिनोजचा पराभव केला, तरी पण ते नामोहरम झाले नाहीत. डोंगरात, दऱ्या-कपारीत हे क्रांतिकारक आणि त्यांचे सहकारी दडून राहिले; पुन्हा अनुकूल संधी येण्याची वाट पाहू लागले.

परंतु अमेरिकन कुमक येऊ लागली आणि त्यांचे बळहि वाढू लागले. अशा परिस्थितीत फिलिपिनोज देशभक्तीने कितीहि पेटलेले असले तरी जळून जाण्यावाचून त्यांना दुसरा मार्गच नव्हता. ‘ देशाच्या रक्षणासाठी शिर वाहणे ’ हे वाक्य कितीहि तडफदार आणि अंगावर काटा आणणारे असले तरी सर्वच नागरिकांची शिरे देशासाठी धडा-पासून वेगळी करण्याची वेळ आली तर मग शेवटी स्वातंत्र्य कोणा-साठी ? स्वातंत्र्योपभोग घेण्यासाठी कोणीतरी जिवंत राहणे आवश्यक

त्यांचे स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न चालूच होते. परंतु त्यामध्ये त्यांना यश मिळत नव्हते. कसे मिळणार? अखेर असल्या कंटाळवाण्या परिस्थितीला फिलिपिनोज कंटाळले. अमेरिकनहि कंटाळले. त्यांनी ४ फेब्रुवारी १८९९ रोजी पहिला हल्ला चढविला. अर्थात् पहिली गोळी अमेरिकेकडून आली आणि ओघानेच त्याच मार्गाचा अवलंब फिलिपिनोजना करावा लागला. उभय राष्ट्रांमध्ये युद्धाचा डोंब उसळला. हे युद्ध अडीच वर्षे चालू होते. युद्धाला सुरुवात होताच सर्व बंडखोर लोकांनी मॅनिलामधील सर्व परकीय लोकांची कत्तल करावी असा हुकूम सोडला. त्या वेळी मॅनिला शहरात तीन लाख फिलिपिनोज होते. आणि अमेरिकेजवळ शहराच्या संरक्षणाकरिता तीन हजारावर देखील पोलीस नव्हते. जे शिपाई होते, ते बाहेरून शहराचे रक्षण करीत होते. युद्धाचे सुरवातीस अमेरिकेचे एकंदर सैन्य फक्त चौदा हजार होते. त्यातील तीन हजार शहराच्या रक्षणासाठी गेले. पण फिलिपिनोज हे संख्येने व शस्त्रास्त्राने अधिक होते. पारतंत्र्यात तीनशेवर वर्षे काढलेल्या फिलिपिनोजजवळ वास्तविक शस्त्रास्त्रे असणे असंभवनीय. परंतु पूर्वी स्पॅनिशांबरोबर झालेल्या युद्धात त्यांनी बरीच शस्त्रास्त्रे जमविली होती. त्यातील काही लुटूनहि आणलेली होती. याशिवाय त्यांच्यावर स्वदेशी शस्त्रे (तरवारी सारखी) होती त्यांचाहि त्या लोकांनी उत्तम उपयोग केला. शिवाय फिलिपिनोजांचे सैन्य अगदीच नवखे नव्हते. स्पॅनिशांबरोबर झालेल्या युद्धाचा त्यांना अनुभव होता. ह्या सैनिकांची संख्या जवळ जवळ चाळीस ते पन्नास हजार असावी असा तर्क होता.

तरी पण या युद्धात फिलिपिनोज यांची पिछेहाटच होऊ लागली. अमेरिकन सैनिक खंदकात दबा धरून आपल्या देशाहून येणाऱ्या कुमकीची वाट पहात पडून राहिले. ११ फेब्रुवारीला त्यांनी इलोइलो नावाचे शहर जिकले. नंतर अमेरिकन शिपाई हळूहळू एक एक शहर व्यापू लागले. तिकडे अमेरिकेतही अधिक सैन्य उभारण्याचे प्रयत्न सुरू झाले. एक लाख सैन्य फिलिपाईन्समध्ये पाठविण्याचे अमेरिकन सरकारने ठरविले. मार्च महिन्यात त्यापैकी काही तुकड्या

येऊन दाखल झाल्या आणि त्यानंतर क्रमशः थोड्या थोड्या तुकड्या येऊ लागल्या.

एकदा फिलिपाईन्स लढाई करून हस्तगत करावयाचे असे ठरल्यानंतर मग अमेरिकेजवळ सैन्याला, मनुष्यबळाला आणि पैशाला कसली कमतरता होती बरे ?

अमेरिकेच्या सैन्याने या युद्धात काय पराक्रम केले, किती हाल-अपेष्टा सोसल्या, किती प्राणाहुती दिल्या यांचे दर्दभरे वर्णन आज अमेरिकेच्या इतिहासात वाचावयास मिळते. परंतु बिचाऱ्या स्वातंत्र्य-प्रिय फिलिपिनोज यांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी कोण-कोणती अग्निदिव्ये पत्करली, किती लाखांनी प्राणाहुती दिल्या, किती स्त्रियांनी वैधव्य पत्करले यांचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल तो सुदिन !

अमेरिकेबरोबर लढताना फिलिपिनोजना जरी पराभव पत्करावा लागला, तरी पण कित्येक वेळा त्यांचा जय होऊन अमेरिकन साम्राज्यवादी सन्याला हात टेकावे लागलेले होते. परंतु दुर्दैव असे होते की, अमेरिकन राज्यकर्त्यांना आपल्या मायदेशाहून कुमक मागविता येत होती आणि तसे बिचाऱ्या फिलिपिनोजना करता येत नव्हते !

शेवटी जरी या युद्धात अमेरिकन फौजांनी फिलिपिनोजचा पराभव केला, तरी पण ते नामोहरम झाले नाहीत. डोंगरात, दऱ्या-कपारीत हे क्रांतिकारक आणि त्यांचे सहकारी दडून राहिले; पुन्हा अनुकूल संधी येण्याची वाट पाहू लागले.

परंतु अमेरिकन कुमक येऊ लागली आणि त्यांचे बळहि वाढू लागले. अशा परिस्थितीत फिलिपिनोज देशभक्तीने कितीहि पेटलेले असले तरी जळून जाण्यावाचून त्यांना दुसरा मार्गच नव्हता. ' देशाच्या रक्षणासाठी शिर वाहणे ' हे वाक्य कितीहि तडफदार आणि अंगावर काटा आणणारे असले तरी सर्वच नागरिकांची शिरे देशासाठी धडा-पासून वेगळी करण्याची वेळ आली तर मग शेवटी स्वातंत्र्य कोणा-साठी? स्वातंत्र्योपभोग घेण्यासाठी कोणीतरी जिवंत राहणे आवश्यक

त्यांचे स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न चालूच होते. परंतु त्यामध्ये त्यांना यश मिळत नव्हते. कसे मिळणार? अखेर असल्या कंटाळवाण्या परिस्थितीला फिलिपिनोज कंटाळले. अमेरिकनहि कंटाळले. त्यांनी ४ फेब्रुवारी १८९९ रोजी पहिला हल्ला चढविला. अर्थात् पहिली गोळी अमेरिकेकडून आली आणि ओघानेच त्याच मार्गाचा अवलंब फिलिपिनोजना करावा लागला. उभय राष्ट्रांमध्ये युद्धाचा डोंब उसळला. हे युद्ध अडीच वर्षे चालू होते. युद्धाला सुरुवात होताच सर्व बंडखोर लोकांनी मॅनिलामधील सर्व परकीय लोकांची कत्तल करावी असा हुकूम सोडला. त्या वेळी मॅनिला शहरात तीन लाख फिलिपिनोज होते. आणि अमेरिकेजवळ शहराच्या संरक्षणाकरिता तीन हजारावर देखील पोलीस नव्हते. जे शिपाई होते, ते बाहेरून शहराचे रक्षण करीत होते. युद्धाचे सुरवातीस अमेरिकेचे एकंदर सैन्य फक्त चौदा हजार होते. त्यातील तीन हजार शहराच्या रक्षणासाठी गेले. पण फिलिपिनोज हे संख्येने व शस्त्रास्त्राने अधिक होते. पारतंत्र्यात तीनशेवर वर्षे काढलेल्या फिलिपिनोजजवळ वास्तविक शस्त्रास्त्रे असणे असंभवनीय. परंतु पूर्वी स्पॅनिशांबरोवर झालेल्या युद्धात त्यांनी बरीच शस्त्रास्त्रे जमविली होती. त्यातील काही लुटूनहि आणलेली होती. याशिवाय त्यांच्यावर स्वदेशी शस्त्रे (तरवारी सारखी) होती त्यांचाहि त्या लोकांनी उत्तम उपयोग केला. शिवाय फिलिपिनोजांचे सैन्य अगदीच नवखे नव्हते. स्पॅनिशांबरोवर झालेल्या युद्धाचा त्यांना अनुभव होता. ह्या सैनिकांची संख्या जवळ जवळ चाळीस ते पन्नास हजार असावी असा तर्क होता.

तरी पण या युद्धात फिलिपिनोज यांची पिछेहाटच होऊ लागली. अमेरिकन सैनिक खंदकात दबा धरून आपल्या देशाहून येणाऱ्या कुमकीची वाट पहात पडून राहिले. ११ फेब्रुवारीला त्यांनी इलोइलो नावाचे शहर जिंकले. नंतर अमेरिकन शिपाई हळूहळू एक एक शहर व्यापू लागले. तिकडे अमेरिकेतही अधिक सैन्य उभारण्याचे प्रयत्न सुरू झाले. एक लाख सैन्य फिलिपाईन्समध्ये पाठविण्याचे अमेरिकन सरकारने ठरविले. मार्च महिन्यात त्यापैकी काही तुकड्या

येऊन दाखल झाल्या आणि त्यानंतर क्रमश: थोड्या थोड्या तुकड्या येऊ लागल्या.

एकदा फिलिपाईन्स लढाई करून हस्तगत करावयाचे असे ठरल्यानंतर मग अमेरिकेजवळ सैन्याला, मनुष्यबळाला आणि पैशाला कसली कमतरता होती बरे ?

अमेरिकेच्या सैन्याने या युद्धात काय पराक्रम केले, किती हाल-अपेष्टा सोसल्या, किती प्राणाहुती दिल्या यांचे दर्दभरे वर्णन आज अमेरिकेच्या इतिहासात वाचावयास मिळते. परंतु बिचाऱ्या स्वातंत्र्य-प्रिय फिलिपिनोज यांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी कोण-कोणती अग्निदिव्ये पत्करली, किती लाखांनी प्राणाहुती दिल्या, किती स्त्रियांनी वैधव्य पत्करले यांचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल तो सुदिन !

अमेरिकेबरोबर लढताना फिलिपिनोजना जरी पराभव पत्करावा लागला, तरी पण कित्येक वेळा त्यांचा जय होऊन अमेरिकन साम्राज्यवादी सन्याला हात टेकावे लागलेले होते. परंतु दुर्दैव असे होते की, अमेरिकन राज्यकर्त्यांना आपल्या मायदेशाहून कुमक मागविता येत होती आणि तसे बिचाऱ्या फिलिपिनोजना करता येत नव्हते !

शेवटी जरी या युद्धात अमेरिकन फौजांनी फिलिपिनोजचा पराभव केला, तरी पण ते नामोहरम झाले नाहीत. डोंगरात, दऱ्या-कपारीत हे क्रांतिकारक आणि त्यांचे सहकारी दडून राहिले; पुन्हा अनुकूल संधी येण्याची वाट पाहू लागले.

परंतु अमेरिकन कुमक येऊ लागली आणि त्यांचे बळहि वाढू लागले. अशा परिस्थितीत फिलिपिनोज देशभक्तीने कितीहि पेटलेले असले तरी जळून जाण्यावाचून त्यांना दुसरा मार्गच नव्हता. ' देशाच्या रक्षणासाठी शिर वाहणे ' हे वाक्य कितीहि तडफदार आणि अंगावर काटा आणणारे असले तरी सर्वच नागरिकांची शिरे देशासाठी धडा-पासून वेगळी करण्याची वेळ आली तर मग शेवटी स्वातंत्र्य कोणा-साठी ? स्वातंत्र्योपभोग घेण्यासाठी कोणीतरी जिवंत राहणे आवश्यक

नाही काय ? फिलिपिनोजवर नेमकी अशीच वेळ येऊन ठेपली होती. अमेरिकेने हळू हळू सर्व फिलिपाईन्स घशात घालीत आणला होता.

आता फक्त जनरल अँगिनाल्डोला पकडणें एवढा एकच पराक्रम करण्याचे अमेरिकेचे सत्कृत्य शिल्लक राहिले होते ! त्याला एकदा पकडले, की मग सारा फिलिपाईन्स जिंकल्याची परिसमाप्ति झाल्याचे समाधान त्यांना मिळणार होते. शेवटी अमेरिकेची तीहि कामना पूर्ण झाली. मेकबेब या गावातील काही रहिवाश्यांनी अँगिनाल्डो याला दगलबाजीने पकडून दिले.

अमेरिकेने शेवटी जनरल ॲगिनाल्डोवर काय जादू केली कोण जाणे. त्याने युद्ध थांबविण्याविषयी आपल्या देशबांधवांना आवाहन केले. वास्तविक अँगिनाल्डो हा अत्यंत प्रामाणिक, निष्ठावंत, ज्वलंत देशाभिमानी आणि आपल्या देशप्रेमामुळे कमालीचा लोकप्रिय झालेला असा नेता होता. पण त्याला पकडून अमेरिकेने हा जळजळीत ताराहि निष्प्रभ करून टाकला. अमेरिकेने त्याला ६००० डॉलर्सचे पेन्शन दिले. शिवाय त्याच्या मुलाला शिक्षणासाठी अमेरिकेला पाठविले.

ॲगिनाल्डोला ताब्यात घेतले तरी उसळून तप्त झालेला देश शांत होऊ शकत नव्हता. ॲगिनाल्डोची जागा दुसऱ्याने घेतली, दुसऱ्याची तिसऱ्याने घेतली, तिसऱ्याची चवथ्याने असे स्वातंत्र्ययुद्धाचे सत्र चालूच राहिले. परंतु मग अमेरिकेने आपली नीति बदलली. त्यांनी शांततेचा टाहो फोडण्यास प्रारंभ केला. शिवाय देशात सुधारणांचे सत्र सुरू करण्याची मोहीम आखली. १९०१ सालच्या जून महिन्यापासून गव्हर्नर वगैरे नेमून शांततामय आणि सुधारणावादी कारभाराला त्यांनी सुरुवात केली.

तरी पण युद्ध थाबण्याचे लक्षण दिसतच नव्हते. क्रांतिकारकांच्या हालचाली सतत चालू होत्या. तरीदेखील त्यांनी शेवटी हात टेकले आणि फिलिपाईन्स राष्ट्र अमेरिकन साम्राज्याखाली आले.

फिलिपाईन्समध्ये अमेरिकेचे राज्य स्थापन झाल्यावर तेथे लष्करी राजवट सुरू झाली. लष्करी गव्हर्नरांचे हुकुमतीखाली शिक्षण, पोस्ट, पब्लिक वर्क्स, तसंच शेतसारा वगैरे खाती सुरू झाली. एक

गोष्ट अमेरिकेने केली ती म्हणजे प्रथमपासूनच फिलिपिनोज लोकांना सरकारमध्ये महत्त्वाच्या जागेवर नेमण्यात आले. दुसरा साम्राज्यवाद्यांचा जो देखावा असतो तो म्हणजे, ' आम्ही हे जे काही करतो आहो ते सारे त्या देशवासियांच्या सुखासाठी, उत्कर्षासाठी आणि देशाच्या उत्तम भवितव्यासाठीच केवळ करीत आहोत ! ' असा आभास निर्माण करणे. तो आभास अमेरिकन लोकांनी निर्माण केला. फिलिपाईन्स देश सगळा घशात घातल्यावर हे राज्यकर्ते म्हणू लागले, ' आम्हाला तुमचा देश नको आहे. तुम्ही तुमच्या देशाचा कारभार करण्यास लायक बनला की आम्ही एक क्षणभरहि येथे राहणार नाही ! '

परंतु पुढची एक चमत्कारिक गोष्ट पाहण्यासारखी आहे. शूरमन याच्या नेतृत्वाखाली अमेरिकेने 'शूरमन कमिटी' नेमली होती. या कमिटीने त्या धामधुमीच्या काळात पुरावा गोळा करून असा निष्कर्ष काढला की, ' फिलिपिनोजना जरी पुष्कळ सुधारणा, हक्क आणि मोकळीक पाहिजे असली, तरी त्यांना स्वातंत्र्य मुळीच नको आहे ! '

साम्राज्यवाद्यांनी नेमलेल्या कमिशनचे रिपोर्ट कसे असतात याचा हा एक उत्कृष्ट नमूना आहे. आपल्या भारतातहि पारतंत्र्याच्या काळी सायमन कमिशन, क्रिप्स मिशन वगैरेसारख्या विनोदी गोष्टी घडलेल्या आहेतच. ' साम्राज्यवादी ' म्हणून ब्रिटन, अमेरिकन, फ्रेंच आदि लोकांना ज्या जगभर शिव्या बसतात त्यांचा उगम हा असा आहे ! म्हणजे ज्या बिचाऱ्या फिलिपिनोजनी तीनशे वर्षे केवळ आपल्या देशाला पारतंत्र्यापासून मुक्त करण्यासाठी अहर्निश लढा दिला, त्यांना म्हणे स्वातंत्र्य मुळीच नको आहे !

तसेच या शूरमन कमिटीने आपल्या रिपोर्टात जी अनेक असत्य, खोडसाळ विधाने केली आहेत त्यांचे काही नमुने खाली थोडक्यात देत आहे :

४४०९६
३०८

१. अमेरिकेला फिलिपाईन्समधून निघून जाता येणार नाही. आम्ही येथे आहोत ते आमचे कर्तव्य म्हणून आहोत. फिलिपिनोजची जबाबदारी आम्ही स्वीकारली आहे, त्याचप्रमाणे मनुष्यजातीच्या कल्याणाचीहि जबाबदारी आम्ही स्वीकारली आहे. त्या लोकांवर राज्य करून त्यांची स्थिति सुधारणे आम्हाला भागच आहे.

२. फिलिपिनोज स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठी मुळीच तयार नाहीत. आणि अशा स्थितीत जरी त्यांना स्वातंत्र्य दिले तरी ते त्यांना टिकविता येणार नाही !

३. ॲगिनाल्डोला स्वातंत्र्याचे वचन दिले असे जो तो म्हणतो परंतु ती गोष्ट सपशेल खोटी आहे. ड्यूई म्हणतो, 'मी फिलिपिनो-जना प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष स्वातंत्र्याचे वचन कधीच दिले नाही. जरी त्यांचा व ॲगिनाल्डोचा स्पॅनिशांविरुद्ध लढताना मी उपयोग करून घेतला, तरी मी ॲगिनाल्डोला मित्र म्हणून कधीच समजलो नाही !'

४. फिलिपाईन्स असे राष्ट्रच अस्तित्वात नाही. तो एक निर-निराळ्या प्रकारच्या लोकांचा समुच्चय आहे. तेव्हा त्या बेटातील लोकांना काही विशिष्ट एकमत असणेच शक्य नाही. पण तेथे जी सुशिक्षित माणसे आहेत, ती अमेरिकेचे संरक्षण, मार्गदर्शन व सत्ता अपेक्षितात व मानतात !'

असल्या प्रकारचे धादांत खोटे आरोप करून अमेरिकेने फिलि-पाईन्सची सर्व सत्ता बळकावली. इतकी की हा देश जणू अमेरिके-चाच एक भाग आहे असे वाटावे. फिलिपिनोज मात्र आपल्या स्वातंत्र्याचे बलिदान देण्यास तयार नव्हते. फट सापडेल तिथे, संधी मिळेल तेव्हा तेथील क्रांतिकारक बंड करीतच होते. आतून एकीकडून अमेरिका हा देश पोखरीत होते तर दुसरीकडून अमेरिकन राज्य-शकटाला फिलिपिनोज कार्यकर्ते आणि क्रांतिकारक हळहळू का होईना

पोखरीत चालले होते. शिवाय धीरे-धीरे अमेरिकेवर जागतिक दड-पणहि येत चालले होते.

तेव्हा १९१६ सालच्या जोन्स ॲक्टमध्ये फिलिपिनोजना पूर्ण स्वातंत्र्य देण्याचे अभिवचन अमेरिकेने दिले. ' जेव्हा तुमच्या सत्तेला स्थैर्य येईल तेव्हा तुमच्या देशाचा सर्व कारभार आम्ही तुमच्या स्वाधीन करू. ' असे त्या कायद्यात सांगितले होते. पण उक्ति आणि प्रत्यक्ष कृति यामध्ये किती अंतर असते याचा इतिहास भारतीय नागरिकांना देखील पारतंत्र्याच्या काळात आलेला आहेच. हा १९१६ सालचा कायदा पुस्तकातच राहिला. आणि फिलिपिनोजनी आपले सारे बळ, शक्ति आणि पात्रता पणाला लावून सत्तेमध्ये स्थैर्य आणले, तरी त्यांना गुलामीतून मुक्त करण्यात आले नाही !

मात्र त्याचा एक उपयोग असा झाला की, मोठमोठाल्या अधिकाराच्या जागेवर फिलिपिनोज लोकांच्या नेमणुका केल्या जाऊ लागल्या. देशातील मुख्य मुख्य खाती फिलिपिनोजच्या ताब्यात आली. फक्त गव्हर्नर जनरल, ऑडिटर जनरल आणि दुय्यम गव्हर्नर जनरल एवढ्याच जागांवर फक्त अमेरिकन लोक राहिले. मात्र गव्हर्नर जनरलचे पुष्कळ अधिकार कमी करण्यात आले. व्हेटोसारखा रामबाण अधिकार मात्र त्याच्या हाती राहिला ! तेथील बहुतेक सारी सत्ता कायदेमंडळाचे हाती गेली. परंतु परराष्ट्रीय राजकारण आणि आंतर-राष्ट्रीय संबंध एवढे मात्र अमेरिकेच्या काँग्रेसने आपल्या हाती ठेवले.

शेवटी जोन्स ॲक्ट हा अशा प्रकारे अमलात आला. त्यातील तरतुदीनुसार निवडणुका होऊन १ जानेवारी १९१७ रोजी नवा राज्यकारभार सुरू झाला. प्रत्यक्ष राज्यकारभार हाती येण्यापूर्वी जे सत्तांतर झाले होते, त्यामुळे मोठमोठ्या हुद्द्यांच्या जागांवर असलेले अमेरिकन अधिकारी चिडलेले होते. कारण त्यांच्या हातून सत्ता गेली होती. पैसा गेला होता आणि पदरी नालायकी आली होती. ज्या लोकांना ते रानटी, पशु समजत होते व आपला अवतार जणू

त्यांच्यावर राज्य करण्याचाच आहे असे आजवर समजत आले होते, त्यांनाच आता खाली माना घालून या मुल्की लोकांच्या अधिकाराखाली राहण्याची पाळी आलेली होती.

त्यामुळे साहजिकच अमेरिकन व फिलिपिनोज यांचे वैर धुमसत राहिले ! तरी पण फिलिपिनोजनी त्यांना भीक घातली नाही. उत्तरोत्तर आपला राज्यकारभार सुधारेल कसा हेच पाहण्याकडे फिलिपिनोजनी आपले सारे लक्ष केंद्रित केले.

मात्र अमेरिकेने फिलिपाईन्स बेटे ताब्यात घेतल्यानंतर इतर काहीहि जुलूम जबरदस्ती केली असली तरी पण एक गोष्ट मात्र त्यांनी अतिशय उत्तम केली ही गोष्ट कबूलच करायला हवी. ती म्हणजे शिक्षण. स्पॅनिशांच्या आधिपत्याखाली जोपर्यंत फिलिपाईन्स होता तोवर तेथे शिक्षण नावालाच होते. त्याचे कारण या लोकांना आपण जर खरे शिक्षण दिले तर ते ज्ञानी होतील आणि मग मात्र हा देश आपल्या ताब्यात राहणे कठीण होईल, ही त्यामागील भीति होती. त्यामुळे शिक्षणाने खऱ्या ज्ञानाचे दर्शन या लोकांना होऊच नये याची स्पॅनिशांनी फार दक्षता घेतली होती !

रशियाच्या झारने ज्याप्रमाणे रशियाशिवाय जग आहे ही गोष्ट आपल्या लोकांना कळू नये याची दक्षता घेण्यासाठी त्यांना भूगोल शिकण्यास बंदी घातली होती, किंवा जगाचा इतिहास, अर्थशास्त्र इत्यादि विषय शिकविण्यास मनाई केली होती, त्याचप्रमाणे स्पॅनिशांनी फिलिपिनोजना बायबल, थोडे गणित आणि कारकुनी करण्यापुरती अक्षरओळख यापलिकडे शिक्षणाची मजल पुढे जाऊ दिली नव्हती ! त्या वेळच्या बहुतेक सर्व शाळा चर्चच्या ताब्यात असत. भिक्षुकांनी या शाळा चालवाव्या आणि धर्मप्रसार करावा एवढाच मर्यादित कार्यक्रम त्या शाळांचा होता. शिवाय संख्येने या शाळाहि कमी असत. मॅनिला शहराबाहेर तर शाळा अगदी औषधापुरत्याच होत्या. शिवाय या शाळातूनहि मातृभाषेतून शिक्षण देऊ नये असा दंडक असे.

शिक्षणाची ही स्थिति पुढेपुढे अर्थातच पालटत गेली. हळूहळू शाळांची संख्या वाढू लागली. क्वचित् कॉलेजहि निघू लागले. परंतु या गोष्टी केवळ फिलिपाईन्सच्या कल्याणासाठी होऊ लागल्या होत्या असे म्हणता येणार नाही. कारण अधिकाराच्या जबाबदाऱ्या जशा वाढू लागल्या तसतशा स्पॅनिशांची आवक या देशात करणे आवश्यक होऊ लागले आणि मग स्पॅनिश लोक येथे आणणे म्हणजे त्यांच्या कुटुंबांची आणि त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाची सोय येथे असणे आवश्यक होते. त्यामुळे केवळ त्यांच्यासाठी या शाळा निघू लागल्या व कॉलेजे निघू लागली. मग अर्थातच क्वचित प्रसंगी अत्यंत श्रीमंत फिलिपिनोजच्या मुलांच्या शिक्षणाची वर्णी येथे लागू लागली. काही गरीब मुले जर ती फारच बुद्धिमान् असतील तर त्यांनाहि शिक्षण दिले जाऊ लागले. परंतु मुख्य उद्देश काय होता ते वर वर्णन केलेच आहे.

स्पॅनिशांच्या काळात शिक्षण जसे धर्मगुरूंच्या हातात होते तसे अमेरिकन अम्मल आला तेव्हा ते अमेरिकेच्या लष्करी अधिकाऱ्याच्या हाती गेले होते. शाळेचा अथवा कॉलेजचा मुख्य एखादा कॅप्टन असे. अमेरिकन राज्यकर्त्यांचा या धोरणापाठीमागे खास उद्देश होता ही गोष्ट येथे लक्षात घेतली पाहिजे. ती म्हणजे फिलिपिनोज लोकांचा अमेरिकन लष्कराकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलावा हा त्यामागे हेतु होता. शिक्षणाधिकारी लष्करातला ठेवल्यामुळे सामान्य फिलिपिनोज यांची दृष्टि लष्कराविषयी कलुशित न होता त्यांना वाटावे की हे लष्कर आम्हाला मारण्यासाठी नसून आम्हाला उत्तम शिक्षण देण्यासाठी आहे ! त्यांना सुशिक्षित, सुसंस्कृत करण्यासाठी आहे.

त्यासाठी कित्येक शिपायांच्या तुकड्या अमेरिकेने केवळ शिक्षणासाठीच ठेवल्या होत्या. त्यांचा पगार देखील अमेरिकेकडून भागविला जाई. तद्नंतर सारे शिपायी शिक्षक बनले आणि फिलिपाईन्समध्ये शाळांची संख्या भराभर वाढू लागली. हळू हळू शिक्षण घेणारांची संख्या देखील वाढू लागली. कदाचित् शिपायांच्या भीतीने सुद्धा

अशिक्षित आई–बाप आपल्या मुलांना शाळेमध्ये घालू लागले असतील असेहि वाटते !

अर्थात् शिक्षण न देण्यामध्ये स्पॅनिशांचा जो हेतु होता तसाच, म्हणजे त्याच जातीचा उद्देश शिक्षण देण्यामध्ये अमेरिकेचा होता असे म्हणणे भाग आहे.

आता अमेरिकेचे या पाठीमागचे हेतु काय होते याचा विचार करू. एक म्हणजे शिक्षण सुरू करून देशामध्ये आपल्या सद्‌हेतूचे प्रदर्शन करावे आणि अडाणी व अर्धवट लोकांना बंडापासून परावृत्त करावे. दुसरा हेतु शिक्षण घेतलेल्या फिलिपिनोज तरुणांना सरकारी नोकरीच्या जाळ्यात अडकवून अमेरिकन राज्यकर्त्यांविरुद्ध कारवाई करण्याची तरुण रक्तातील शक्ति वेगळ्याच दिशेने वळवून ठेवायची.

पुढे तर अमेरिकन राज्यकर्त्यांनी या देशात मोफत शिक्षणाचाहि कायदा पास केला. त्याचे कारण देशात शिक्षणाचे उत्तम वातावरण निर्माण व्हावे. सर्व तरुण-वर्ग शाळा-कॉलेजात बंदिस्त व्हावा. आणि राजकारणात स्थैर्य निर्माण व्हावे हा त्यामागे हेतु होता. तसेच अमेरिकन शिक्षक हा नुसता भाडोत्री शिक्षक नसे. तसेच फिलिपिनोजना शिक्षण देताना तो येथील तरुणांच्या मनावर नेहमी खालीलप्रमाणे गोष्टी बिंबवीत असे. अमेरिकन देश, त्यांची संस्कृति, त्यांचे शील, विद्येतील त्या देशाचे श्रेष्ठत्व वगैरे.

शिक्षणात दिवसेंदिवस फिलिपाईन्सची प्रगतीच होत गेली. १९२५ साली देशात हायस्कूलचे शिक्षण घेणारी ७५००० मुले होती. तसेच सामान्य शिक्षण घेणारी ४५००० मुले होती. धंदेशिक्षणाच्या शाळांची संख्या ३१८ होती व २४००० मुले त्या शाळांतून शिक्षण घेत होती. हायस्कूलमध्ये शिक्षण घेण्याचे ज्याचे वय आहे अशी मुले शाळेत किती आहेत याची टक्केवारी प्रसिद्ध झाली होती. त्यामध्ये अमेरिकेत २७, जपानात ८, इंग्लंडात ४, स्वीडन येथे १.५ स्पेन १ आणि फिलिपाईन्समध्ये ८ अशी सरासरी टक्केवारी आहे. यावरून देखील त्यावेळी फिलिपाईन्समध्ये थोड्या काळात शिक्षणक्षेत्रात किती प्रगति झाली होती, याचा अंदाज काढता येतो.

शिवाय शिक्षण देण्यापाठीमागचे अमेरिकेचे ध्येयहि उदार होते ही गोष्ट देखील कबूल केलीच पाहिजे. आपला शिक्षणाविषयीचा दृष्टिकोण मांडताना अमेरिकन राज्यकर्ते म्हणतातः सामान्य जनतेला लिहिता वाचता येणे, व्यावहारिक गणित येणे, आपल्या देशाचा व जगाचा भूगोल ठाऊक असणे, आरोग्याचे सामान्य नियम माहीत असणे व त्यांचा देशातील मृत्युसंख्या कमी करण्याकडे उपयोग करता येणे, देशबांधवाशी व इतर देशातील लोकांशी वागताना सभ्यपणा व सद्वर्तन अंगी असणे, शारीरिक शिक्षणामुळे आधुनिक सुधारलेल्या काळातील जबाबदारी उचलता येणे, नागरिकत्वाची कर्तव्ये व हक्क माहीत असणे, उद्योगधंद्याविषयी आवड व आदर उत्पन्न होणे या सर्व गोष्टी शिक्षण देण्यापाठीमागे अभिप्रेत आहेत.

अर्थात् या दृष्टीने देशात सुरू केलेल्या शिक्षणकार्याचा फिलिपाईन्सला फार उपयोग झाला ही गोष्ट नाकारता येत नाही.

याचा फायदा फिलिपाईन्समधील मुसलमान जमातीने मात्र घेतला नाही. त्यांना वाटे की, आपण आपल्या मुलांना इंग्रजी शिक्षण दिले तर आपला इस्लामी धर्म नष्ट होईल. या एकाच कारणामुळे ही जमात सतत अमेरिकन लोकांच्या इंग्रजी शिक्षणाविरुद्ध होती असे दिसून येते. अर्थात् हा विरोध सतत तीव्र स्वरूपात राहू शकला नाही. कारण तिथेहि परत स्पर्धेची भावना असतेच. देशातील इतर नागरिकांपेक्षा आपण मागे पडू अशी भीति विचारी मुस्लिमांच्या मनात जसजशी उत्पन्न होत गेली, तसतसा त्यांचा हा विरोधहि बोथट होऊ लागला.

अमेरिकन साम्राज्याखालील ही विशिष्ट बावीस वर्षे शिक्षणात अद्भुत क्रांति करणारी ठरली असा इतिहासाचा दावा आहे आणि तो खराहि आहे. फिलिपाईन्समधील शिक्षणाची ही मदार एवढ्यावरच थांबली नाही, तर येथून दर वर्षी उच्च शिक्षणासाठी सुमारे १२५ ते १५० विद्यार्थी अमेरिकेला जात. त्या विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा आणि अमेरिकेतील वास्तव्याचा खर्च अमेरिकन सरकार सोशीत असे.

शिक्षण घेऊन परत आलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अधिकारानुसार सरकारी नोकऱ्या दिल्या जात. शिवाय शास्त्रीय, तांत्रिक, व्यापार-विषयक, कलाविषयक शिक्षणासाठी देखील येथील विद्यार्थी अमेरिकेला पाठविले जात.

या देशाची आजची जी प्रगति झालेली आपल्याला दिसते तीमध्ये तेथील स्वदेशबांधवांची बुद्धिमत्ता, स्वदेशनिष्ठा, कष्टाळूपणा हे सारे गुण जमेला धरून देखील असे म्हणणे भाग आहे की, त्यामध्ये फार मोठा वाटा अमेरिकेच्या या देशातील शिक्षणविषयक चळवळीचा आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे.

देशाला खरे स्वातंत्र्य मिळाले असे केव्हा म्हणता येते ? जेव्हा तेथील लोकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडून येते तेव्हा ! फिलिपिनोजनी आपले सारे पवित्रे या दृष्टीने टाकले होते असे दिसून येते. जरी या लोकांना अमेरिकेने अजून संपूर्ण स्वातंत्र्य बहाल केलेले नव्हते, तरी जेवढे काही हाती आले होते त्याचा उपयोग जनतेची सांपत्तिक स्थिति सुधारण्याकडे त्यांनी केला होता असे दिसून येते. आपल्या भारतात मात्र संपूर्ण स्वातंत्र्य मिळून एकोणीस वर्षे झाली तरीहि अजून देखील सर्वसामान्य लोकांचे जीवनमान सुधारलेले दिसत नाही. स्वतंत्र झालेल्या देशातील या लोकांना अजूनहि जीवनातील प्राथमिक गरजा भागविण्यासाठीच जिवाचा भयंकर आटापिटा करावा लागतो. बुद्धिजीवी वर्गाला देखील केवळ खाणेपिणे आणि कपडालत्ता व निवारा यासाठीच सारे जीवन खर्ची घालावे लागते. म्हणजे जनावरांचे जीवन ( खाणे, पिणे आणि झोपणे ) आणि सर्वसामान्य लोकांचे जीवन यामध्ये तुलनाच करावयाची झाली तर भारतातील जनावरांचे जीवन माणसांच्या जीवनापेक्षा बरेच सुकर आहे असे दिसून येते ! या बाबतीत फिलिपिनोज लोकांचा १९१७ पासूनचा इतिहास भारतीय राज्यकर्त्यांनी अनुकरण करण्याच्या दृष्टीने अभ्यासण्यासारखा आहे !

फिलिपिनोजनी लोककल्याणार्थ केलेल्या काही योजनाचे उदाहरण येथे देता येण्याजोगे आहे! उदाहरणार्थ या लोकांनी एक 'राष्ट्रीय उद्योगप्रवर्तक मंडळ' स्थापन केले होते. या मंडळाला देशात वाटेल तो धंदा सुरू करता येत असे. म्हणजे समजा देशातील साखर कारखानदार आपल्या उत्पादनावर भरमसाठ नफा घेऊन जनतेला नाडू लागले आहेत असे लक्षात येताच हे 'राष्ट्रीय उद्योग प्रवर्तक मंडळ' लगेच साखरेच्या उत्पादनाचा धंदा स्वत: सुरू करीत असे. मात्र यापूर्वी त्या साखर उत्पादकांना हे मंडळ समज देत असे. त्यावर बहुतेक हे उत्पादक ताळ्यावर येत असत. न आले तर मात्र तो धंदा सुरू करून जनतेचे हित साधीत असत. या उपाययोजनेमुळे फिलिपाईन्समधील नफेबाजीची प्रवृत्ति मुळातच खच्ची करण्यात आली. उत्पादनात तोल निर्माण झाला आणि लोकांचे जीवनहि सुखी झाले.

असे राज्य अमेरिकेच्या मार्गदर्शनाखाली म्हणा, फिलिपिनोज करीत होते. संपूर्ण स्वातंत्र्याच्या दिशेने त्यांची घाटचाल सर्व आघाड्यांवरून चालली होती. अशा स्थितीत दुसऱ्या जागतिक युद्धाचे शिंग फुंकले गेले. युद्धामुळे निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या आपत्ती फिलिपाईन्समध्येहि निर्माण झाल्या आणि स्वतंत्र सार्वभौम स्वातंत्र्याची स्वप्ने पाहणारा हा देश जपान्यांच्या आक्रमणाला बळी पडला. ८ डिसेंबर १९४१ हा दिवस. पर्ल हार्बरवर हल्ला होण्यापूर्वीचे फक्त काही तास अगोदर जपान्यांनी फिलिपाईन्सवर आसुरी आक्रमण केले. या अनपेक्षित आक्रमणाला तोंड देणे अत्यंत कठीण असे दिव्य होते. तकेच नव्हे तर काही काळ का होईना, आक्रमण थोपवून धरणे देखील अवघड होते.

तेव्हा राजकीय कारणासाठी असे ठरले की, फिलिपाईन्सचे अध्यक्ष क्वीझॉन, उपाध्यक्ष ओस्मेना आणि इतर महत्त्वाचे अधिकारी यांनी तातडीने फिलिपाईन्स सोडावे आणि आपले निर्वासित सरकार अमेरिकेत स्थापन करावे! १९४१ ते १९४४ च्या काळात पुन्हा स्वातंत्र्यविषयक अनेक उठाव देशामध्ये झाले. तिकडे वॉशिंग्टन येथे

निर्वासित सरकार मुत्सद्देगिरीच्या सर्व पातळ्यांवरून फिलिपाईन्सच्या स्वातंत्र्याविषयी पवित्रे टाकीतच होते.

नंतर जनरल मॅक्‌आॅर्थरच्या सुप्रसिद्ध उक्तीनुसार 'मी पुन्हा परत येईन.' त्याने आपले अभिवचन पूर्ण केले. ऑक्टोबर १९४४ मध्ये अमेरिकन सैन्य लीटे (*Leyte*) येथे उतरले. त्यांच्या बरोबर अध्यक्ष सर्जियो ओस्मेना होते. मध्यंतरीच्या काळात मॅन्युएल क्वीझॉन (अध्यक्ष) यांचा मृत्यु झाला होता आणि त्यांची जागा ओस्मेना यांनी घेतली होती.

आता फिलिपाईन्सच्या सरकारला शासनविषयक सर्व अधिकार प्राप्त झालेले होते. जपान्यांचे आक्रमण फिलिपाईन्सने निपटून काढल्यानंतर पुन्हा आणखी अनेक कठीण प्रश्नांना तोंड देण्याचे काम त्यांच्यावर येऊन ठेपले. ते म्हणजे मध्यंतरीच्या युद्धकाळात फिलिपाईन्सला जबरदस्त हानि सहन करावी लागलेली होती. देशाची आर्थिक बाजू जवळ जवळ कोलमडून पडलेली होती. अमेरिकेच्या साह्याने या सर्व परिस्थितीची पाहणी करून तिच्यावर परिणामकारक उपाय योजण्यासाठी एक समिति नेमली गेली. ७ डिसेंबर १९४१ पासून १ ऑक्टोबर १९४७ च्या दरम्यान झालेल्या, देशातील सर्व प्रकारच्या हानीची पाहणी करून या समितीला आपला अहवाल सादर करावयाचा होता. तो अहवाल सादर केला गेला आणि त्यानुसार कार्यवाही सुरू झाली.

फिलिपाईन्स हा देश, त्याचा आतापर्यंत दिलेला इतिहास आणि त्या इतिहासात झालेली स्वातंत्र्ययुद्धे करत करत स्वतंत्र झाला आहे. आज फिलिपाईन्स देश हा स्वतंत्र, अमेरिकेच्या वसाहतवादापासून मुक्त झालेला असून तेथे घटनात्मक लोकसत्ताक राज्यपद्धतीने कारभार चाललेला आहे. तरीहि आज तिथली परिस्थिति पाहिली तर फार समाधान व्हावे अशी ती नाही. याचे कारण कोणत्याहि वसाहतीतून मुक्त झालेल्या देशाला ज्या आर्थिक संकटाना, तुटपुंज्या साधनसामुग्रीनिशी तोंड द्यावे लागते, तसे तोंड फिलिपाईन्सला द्यावे

लागत आहे. शिवाय देशात लोकसत्ताक राज्यपद्धति असल्याने प्रगती-मध्ये जी दिरंगाई आणि शिथिलता येते ती येथे टाळता येत नाही. तीन शतकापासून परक्याच्या दास्याखाली राहिल्यामुळे लोकांची परिस्थिति कधीच सुधारू शकलेली नाही. शेतकरीवर्ग नाडला गेलेला आहे, कारखानदारी परक्याच्या नेतृत्वाखाली आणि भांडवलाखाली असल्यामुळे देशातील पैसा बाहेर जाण्याव्यतिरिक्त त्या कारखान-दारीचा इतर काहीहि फायदा झालेला नाही. शिवाय या देशाची भौगोलिक स्थितीहि एकमुखी विकासाला अनुकूल नसल्यामुळे विका-साच्या एका विशिष्ट पल्ल्यापलिकडे या देशाला जगाच्या बाजारात आपल्या व्यक्तित्वाचा प्रभाव कितपत पाडता यईल याची शंका वाटते.

फिलिपाईन्सच्या स्वातंत्र्यानंतरच्या वीस–बावीस वर्षांच्या अनुभवानंतरचा हा आढावा आहे. आग्नेय आशियातील या चिमुकल्या बेटमय देशाचा यापुढील राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहास कसा काय घडतो हे पाहावयाचे आहे.

● ● ●

# ४. मलाया

## ( म ले शि या )

१९४८ साली मलायात झालेल्या खळबळीने प्रथम जगाचे लक्ष मलायाकडे वेधले. ही रस्सीखेच एकीकडून मलाया–ब्रिटिश आणि दुसरीकडून मलाया-कम्युनिस्ट अशी झाली. आग्नेय आशियातील मलायाचे स्थानच असे आहे की, त्यावर पाश्चिमात्यांप्रमाणेच पौर्वात्य कम्युनिस्टांचाही सत्तास्पर्धेच्या संदर्भात डोळा राहावा ! या देशाचे क्षेत्रफळ अवघे एक्कावन्न हजार चौरस मैल आहे. आणि त्या वेळची त्याची लोकसंख्यादेखील साठ लाखांच्या वर नव्हती.

येथील लोकसंख्या, या देशाचे क्षेत्रफळ आणि आग्नेय आशियातील त्याचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेता, इतकेच नव्हे तर जगाचे अगदी सहजतेने लक्ष वेधून घेईल एवढे जस्त आणि रबर यांचे या

देशात होणारे उत्पादन पाहता या चिमुकल्या देशाने जगातील प्रमुख शक्तींचे लक्ष आपल्याकडे वेधून घ्यावे ही गोष्ट अगदी साहजिकच आहे!

ब्रिटिशांनी आपली सत्ता भारतातून आणि ब्रह्मदेशातून गुंडाळली, सिलोनला स्वायत्ततेचा दर्जा दिला, त्या वेळी मलायामध्ये मात्र त्यांनी आपली सत्ता अबाधित ठेविली होती. याचेही एकमेव कारण असे होते की, ब्रिटिश साम्राज्य कोसळू लागलेले असता आणि वरील देशांतून त्या साम्राज्याला निकराचा विरोध होत असता, केवळ आपल्या शक्तींना आव्हान देण्याची ताकद नाही या एकाच सबबीवर चिमुकल्या मलायावर ब्रिटिशांनी आपली पकड कायम ठेविली होती. शिवाय आपल्या पडत्या काळात मलायातील जस्त आणि रबर त्यांना आर्थिक हातभार लावीत होते!

परंतु ब्रिटिशांची ही लगट आता मलायातील काही स्वाभिमानी आणि स्पष्टवक्त्या मलायन जनतेला मुळीच मान्य होण्यासारखी नव्हती. या लोकांनी या वेळी पूर्वी कधी केली नव्हती इतक्या स्पष्ट आणि निग्रही स्वरात मलायाच्या आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्याची मागणी केली.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी मलायाचे शासन दहा वेगवेगळ्या विभागात विस्कटून पडलेले होते. त्यामध्ये अनेक विभाग निरनिराळ्या चालीरीतींना अनुसरूनही पडलेले होते. याचे कारण या देशात जे लोक राहतात त्यांमध्ये मलायन, चिनी आणि भारतीय जातींच्या लोकांचे प्रमाण अधिक आहे. शिवाय ब्रिटिशांच्या जुन्याच आणि आपल्या पूर्ण परिचयाच्या झालेल्या नीतीनुसारच त्यांनी मलायाचे अनेक विभाग केलेले होते. त्यांमध्ये आर्थिक, राजकीय आणि जातीय दृष्टिकोन अर्थातच प्रमुख होता. शिवाय शासनामध्ये ब्रिटिशांचे प्रमाण जसे अधिक होते तसेच उद्योगधंद्याच्या क्षेत्रातही सर्रास त्यांचाच वावर अधिक होता. मलायाचे खालच्या वर्गातील नागरिक एक तर शेती करीत होते आणि दुसरा धंदा मच्छीमारीचा करीत होते. अर्थात मलायाच्या स्वातंत्र्यात, त्याच्या जलदगती प्रगतीत, आपलाही काही

वाटा आहे, कर्तव्य आहे याची सुतराम जाणीव या अज्ञ वर्गाला नव्हती. इतकेच नव्हे तर देशाला लागणाऱ्या उत्पादनापेक्षा अधिक उत्पादन करून त्याचा बाहेरच्या देशांशी व्यापार करता येतो, त्यापासून देशाला परकीय चलन मिळते आणि देशाच्या भरभराटीला, त्याची अंतर्गत शक्ती वाढण्याला आणि पर्यायाने स्वातंत्र्यप्राप्तीलादेखील यापासून मदत होते याची या बिचाऱ्या गरीब जनतेला जाणीवच नव्हती !

१९४२ मध्ये जपानने या देशावर वरील सर्व प्रकारच्या कमजोरीचा फायदा घेऊन आक्रमण केले आणि या लोकांचे जीवन ताब्यात घेतले. आणि अशा रीतीने त्या साली ब्रिटिश वरिष्ठांची जागा जपानी वरिष्ठांनी घेतल्यामुळे या देशात विशेष काहीच उलथापालथ झाली नाही ! मलायाचा अशा रीतीने ताबा घेतल्यानंतर जपानने या देशाला संपूर्णपणे आपली वसाहत बनवून टाकली. जपान्यांची मजल एवढ्यावरच थांबली नाही तर, 'तुम्हांला कधी काळी आम्ही स्वातंत्र्य देऊ' असे आश्वासनदेखील त्या राज्यकर्त्यांनी येथील देशवासियांना दिले नाही. जपानला मलाया हा देश आर्थिक दृष्टीने स्वयंपूर्ण करावयाचा होता आणि संरक्षणक्षमतेच्या दृष्टीने आपल्या लष्कराचे ते एक केंद्र व्हावे अशी त्यांची मनीषा होती.

मलायामध्ये जे सुलतान होते त्यांनी ब्रिटिशसत्तेप्रमाणेच जपानचीदेखील सत्ता शिरसावंद्य मानली. अर्थात अशी सत्ता मानीत असता त्यांच्या मानहानीचे प्रकार काही कमी झाले नाहीत. तरी पण लाचारी वृत्तीने त्यांनी याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. या वेळी पुष्कळसे हिंदी लोकदेखील मलायातून जपानी लष्करात सामील झाले. त्यामध्ये त्यावेळी भारतीय नेतृत्वात आघाडीवर असलेले सुभाषचंद्र बोस देखील होते. ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी देशाबाहेर जाऊन स्वातंत्र्यसमर पेटविण्याची आकांक्षा बाळगिली होती !

नंतर जपानच्या शरणागतीनंतर ब्रिटिशांच्या लष्करी शासनाने जवळ जवळ सहा महिने युद्धपूर्व कायदेकानूंच्या साह्याने राज्याची व्यवस्था सांभाळण्याचा प्रयत्न केला. पहिली गोष्ट त्यांनी ही केली की देशातील जपानी चलन बेकायदेशीर ठरविले. या पवित्र्यात त्यांना

फार अल्प यश मिळाले. रबर आणि जस्ताचा कोलमडत असलेला भाव जरा सुधारला.

मात्र ब्रिटिशांना मलायामध्ये राजकीय असंतोष पसरत आहे किंवा जपानी अंमलानंतर देशातील मलायी आणि चिनी नागरिकांमध्ये ऐक्याच्या भावनेला तडा गेलेला आहे याची कल्पना आली नाही. याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे ब्रिटिश राज्यकर्त्यांना या देशात निर्माण झालेल्या अन्नधान्याच्या तुटवडयाची आणि त्यामुळे निर्माण होऊ पाहणाऱ्या भीषण परिस्थितीची कल्पना आलेली नव्हती! त्यांच्यापुढे जी योजना होती ती फक्त मलायाच्या भविष्यकाळाविषयीची होती. या देशातील राज्यव्यवस्था सुटसुटीत कशी बनविता येईल आणि सर्वच आग्नेय आशियातील अल्पसंख्यांकांना जास्तीत जास्त राजकीय स्वातंत्र्य कसे देता येईल, या विषयींचाच विचार त्यांच्या मनात होता !

ही साध्ये हस्तगत करण्यासाठी त्यांनी प्रथम (*Malayan Union*) नावाच्या संस्थेची स्थापना केली. या शक्तीच्या जोरावर मलायातील सुलतानांच्या हातातील सत्ता काढून ती त्यांनी ब्रिटिश राजमुकुटाच्या सुपूर्द केली. नंतर नागरिकत्वाचे नियम करताना त्यांनी खालीलप्रमाणे योजना आखली. ती अशी की, जे नागरिक स्थायिक होण्यासाठी काही विशिष्ट नियमांचे पालन करतील आणि जे मलायालाच आपली मातृभूमी समजून आपल्या सर्व निष्ठा या देशाच्या चरणी वाहतील त्यांनाच या देशाचे नागरिक म्हणून राहता येईल !

राज्यकारभारामध्ये सुटसुटीतपणा आणण्याच्या बहुतेक योजनांवर मलायन लोकांचे एकमत झालेले होते. परंतु भविष्यकाळात आखली जाणारी 'संघ'विषयक योजना मात्र कोणालाही नको होती. १९४५ सालातील 'मॅक्मिचेलच्या तह योजने'नुसार देशातील सुलतानांकडून उरलीसुरली सर्व सत्ता हस्तगत करण्यात आली होती. त्यामुळे तो वर्ग अत्यंत असंतुष्ट होता. या सुलतानांच्या रूपाने मलायात एक विरोधी शक्ती निर्माण झालेली होती. दुसरी ब्रिटिशाची कूट नीति म्हणजे मलायाच्या मुख्य भूमीपासून सिंगापूर वेगळे काढणे

ग्रं. क्र. १७२२५

ही होती. असे करण्यामुळे देशातील ऐक्यभावनेला तडा जाणार होता आणि त्या दुबळेपणाचा फायदा अर्थातच राज्यकर्त्यांच्या पदरात पडल्याशिवाय राहणार नव्हता !

या देशातील हिंदी नागरिक विशेषत: अशिक्षित होते, आणि कुलीचा व्यवसाय करीत होते. रबराच्या मळ्यातून बहुधा यांचा भरणा झालेला होता. हे सर्व नागरिक राजकीय दृष्टीने अगदीच अचेतन होते. येथे या वेळी एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे ती म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यासाठी बद्धपरिकर झालेले नेताजी सुभाषचंद्र बोस भारत सोडून बाहेर पडलेले होते. त्यांचे वास्तव्य प्रथम मलाया-सिंगापूर या ठिकाणीच होते आणि तेथे त्यांनी स्वातंत्र्यविषयक राजकीय चैतन्य निर्माण केलेले होते. अर्थात् त्याचा परिणाम मलायातील हिंदी लोकांवर होऊन त्यांची मन:स्थिती द्विधा झालेली होती. स्वातंत्र्य भावना त्यांच्या अंत:करणात पेटलेली होतीच, परंतु ही स्वातंत्र्यभावना कोणत्या देशाविषयी होती ? मलाया का भारत ? अर्थात हिंदी लोकांच्या अशा द्विधा मन:स्थितीचा कोणत्याच देशाला फायदा होण्यासारखा नव्हता. मलायाला तर नव्हताच नव्हता. कारण कितीहि झाले तरी या हिंदी लोकांच्या भावना आणि निष्ठा भारत देशाशीच निगडित होत्या. त्याचे कारण असे की त्यांच्या मनामध्ये देशभक्तीची भावना जागृत झाली ती नेताजी या हिंदी पुढाऱ्याच्या आगमनामुळे ! यापूर्वी मलायाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न अनेक वेळा निर्माण झालेला होता, तेव्हा या लोकांची भावना उफाळून आलेली नव्हती.

अर्थात् यात त्या नागरिकांना दोष देण्यात काही अर्थ नव्हता. कारण आपली जात आणि आपला देश याविषयीची विशिष्ट परंपरागत भावना माणसाच्या रक्तातच भिनलेली आहे. विशाल दृष्टिकोनातून जीवनाचा विचार करण्याची सवय जशी वाढत जाईल तसा हळूहळू वरील वर्तनात फरक पडेल हे निश्चित. शिवाय मलायातील हिंदी लोकांची त्या वेळची मानसिक अवस्था तरी कशी होती ? मी वर निवेदन केले आहेच की त्यांचा दर्जा कुलीचा होता ! अर्थात्

त्यांच्या मनात यापेक्षा निराळ्या भावना निर्माण होणे हेच एक आश्चर्य समजले गेले असते! पंडित नेहरूंनी मात्र त्यावेळी मलायातील हिंदी लोकांना आपल्या निष्ठा व्यभिचारी असू नयेत याची जाणीव दिलेली होती. नंतर नेताजींचा दुर्दैवी अंत झाला आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी भारताबाहेर सजविले गेलेले हे रोप वाळून गेले. पुन्हा मलायातील या हिंदी लोकांच्या जीवनात निराशा पसरली आणि मी वर म्हटले त्याप्रमाणे त्यांचे राजकीय जीवन चैतन्यशून्य बनले!

मात्र या निमित्ताने मलायामध्ये जी स्वातंत्र्यविषयक आंदोलने झाली, जे संप झाले, जीवनमान सुधारण्याविषयी आणि अधिक स्वायत्तता मिळविण्याविषयी जी भावना निर्माण झाली, तिचा फायदा देशातील चिनी लोकांनी उठविला. त्यांनी देशात दोन जबरदस्त कामगारसंघटना निर्माण केल्या आणि देशातील कामगारांना जहाल कामगार नेते निर्माण करून दिले!

आर्थिक आणि राजकीय दोन्ही क्षेत्रात ब्रिटिशांच्या लष्करी शासनाला, दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात मलायामध्ये जीवदान मिळाले नाही. सारी जागतिक परिस्थितीच बदलली होती आणि या बदललेल्या परिस्थितीकडे कानाडोळा करून लष्करी राजवट चालविणे केवळ अशक्य होऊन बसले होते. म्हणून १ एप्रिल १९४६ मध्ये या लष्करी शासनाची जागा मुलकी शासनाने घेतली. या शासनापुढे मलायातील कितीतरी महत्त्वाचे प्रश्न उभे होते. चहुकडे अशांतता पसरली होती, वाढलेल्या आणि सतत वाढत जाणाऱ्या किंमतीचा प्रश्न, कामगारांचा प्रश्न, हा प्रश्न मलायन कम्युनिस्ट पार्टीने अत्यंत तीव्र करून ठेवलेला होता. शिवाय खुद्द मलायातील नागरिकांची राज्यकारभारात आपल्याला स्थान देण्याबद्दलची वाढती मागणी. ही मागणी जीवनातील प्रत्येक क्षेत्रातून वर येऊ लागलेली होती. आणि राजकीय प्रश्न तर क्षणाक्षणाला तीव्र स्वरूप धारण करीत होता.

१९४६ सालात ब्रिटिशांमध्ये आणि युनायटेड मलाय नॅशनल ऑर्गनायझेशन (*U. M. N. O.*) यांच्यामध्ये गुप्तपणे वाटाघाटी चालू

होत्या. ही संघटना १९४६ च्या मार्चमध्येच अस्तित्वात आलेली होती आणि मलायातील पुराणमतवादी व वरच्या वर्गातील नागरिकांचे ती प्रतिनिधित्व करीत होती. तिचा नेता डाटो ओन बिन जाफर (*Dato Onn Bin Jafaar*) हा जोहोरचा पंतप्रधान होता. (*Malayan Union*) या संघटनेची प्रतिस्पर्धी म्हणून ही वरील संघटना निर्माण झालेली होती. डिसेंबर १९४६ मध्ये मलायाचे संघराज्य निर्माण होईल अशी लक्षणे दिसू लागलेली होती. मलायातील नऊ राज्यांना घटनात्मक राज्यपद्धतीचे शासन मिळेल हे जसे खरे होते तसेच संघराज्यापूर्वीचे त्या त्या राज्याचे काही हक्क त्यांना गमवावेहि लागणार होते. पिनांग आणि मल्लाका हे जसे संघराज्यात सामील होणार होते तसेच सिंगापूर हे त्यापासून अलिप्त राहणार होते. सिंगापूर हे ब्रिटिशांची वसाहत म्हणूनच राहणार होते आणि स्वतंत्र बंदर म्हणून त्याचे महत्त्व अबाधित राहणार होते. या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली गेली होती. त्या समितीने संघराज्याच्या टीकाकारांनी निर्माण केलेल्या प्रश्नांवर काळजीपूर्वक विचार करून त्यातून तोड काढावयाची होती आणि आपल्या उपयुक्त शिफारशी सादर करावयाच्या होत्या. हे सर्व काम फेब्रुवारी १९४८ मध्ये पूर्ण झालें आणि त्याच साली मलायाचे संघराज्य अस्तित्वात आले.

ब्रिटिशांनी मलाया हस्तगत करण्याचे एक मोठे कारण म्हणजे चिनी आणि मलायन लोकांमध्ये जस्ताच्या खाणींच्या मालकीवरून जे युद्ध झाले ते होय. या युद्धात ब्रिटिशांनी भाग घेऊन चिन्यांचे पारिपत्य केले आणि आपला पगडा मलायावर बसविला. याचा उत्तम फायदा घेऊन ब्रिटिशांनी मलायाला आपली वसाहत बनविले. मात्र असे करताना त्यांनी त्याला अंतर्गत स्वायत्तता दिली होती. परंतु येथें वसाहतीचे राज्य स्थापण्यात ब्रिटिशांना म्हणावे असे यश आले नाही. तरी पण ही राजवट चांगलीच चालली होती. नेहमीप्रमाणे इंग्रज रहिवाशांनी तेथे उपदेशकाचे आणि नंतर शासकांचे काम करण्यास सुरुवात केली होती. मलायातील प्रत्येक प्रांतात अशी इंग्रज माणसे

विखुरली गेली होती. येथील इंग्रज शास्त्यांनी प्रत्येक प्रांतात शासनाची संपूर्ण जबाबदारी आपल्यावरच पडली आहे असे समजून बिनधोक राज्यकारभार हाकण्यास सुरुवात केली, तसेच असे करीत असताना देशात त्यांनी भरमसाठ नवनवीन सुधारणा सुचविल्या. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या किमयेने इंग्रजांचे हे राज्यशकट नकाशावरून हळूहळू फिक्कट होऊ लागले होते.

ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली जोपर्यंत मलाया होता तोपर्यंत सिंगापूरचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण होते. राजकीय, औद्योगिक आणि बौद्धिक दृष्टीने तसेच बहुरंगी आणि स्वयंपूर्ण शहर म्हणून त्याचे स्थान अद्वितीय होते. मात्र १९४१ च्या शेवटी या सिंगापूरमध्ये एकाएकी बदल घडून आला, तो जपानच्या अचानक हल्ल्यामुळे. १५ फेब्रुवारी १९४२ रोजी जपानने हे छोटेसे स्वयंपूर्ण बेट ताब्यात घेतले. आणि तेव्हापासून ते एक लष्करी केंद्र बनले. १९४५ च्या सप्टेंबर मध्ये ब्रिटिशांनी जेव्हा ही वसाहत पुन्हा हस्तगत केली तेव्हा पहिल्या प्रथम त्यांच्या लक्षात जर कोणती गोष्ट आली असेल तर ती म्हणजे मलायाची आर्थिक स्थिती ! दुसऱ्या महायुद्धाचा दणका बसून मलायाची आर्थिक बाजू पार ढासळली होती. ब्रिटिशांच्या आगमनाने लोकांना खूप बरे वाटले. परंतु ही गोष्टहि तितकीच खरी आहे की, या लोकांना, ब्रिटिशांनी येथे कायम राहावे ही गोष्ट नको होती !

त्या वेळी ब्रिटिशांसमोर केवळ मलायाच्या आर्थिक स्थैर्याचाच प्रश्न नव्हता तर आणखी दोन मुख्य राजकीय प्रश्नहि त्यांच्यासमोर होते. पहिला प्रश्न मलायाच्या स्वातंत्र्याच्या मागणीचा होता. मलायाच्या संघराज्यातील नागरिक आणि सिंगापूरचे नागरिक यांची नवीन पद्धतीच्या स्वयंशासित सरकारची मागणी होती. त्यांच्या या मागणीची प्रेरणा त्यांना इंडोनेशिया आणि इतर आग्नेय भागातील स्वतंत्र देशांकडून मिळाली होती. दुसरा प्रश्न मलाया कम्युनिस्ट पार्टीचा होता. ही संघटना चीनच्या आशीर्वादाने निर्माण झालेली असून, तिने येथील ब्रिटिश राज्यकर्त्यांना जबरदस्त आव्हान दिलेले होते !

मलायाला नवीन प्रकारची राज्यपद्धती देण्याची घोषणा ब्रिटिशांनी ऑक्टोबर १९४५ मध्ये केली. जानेवारी १९४६ मध्ये बऱ्याच अंशाने त्या राज्यपद्धतीचे त्यांनी समर्थन केले आणि मार्च १९४६ मध्ये या नवीन राज्यपद्धतीच्या सरकारची त्यांनी घोषणा केली. या राज्यपद्धतीच्या निर्मितीमध्ये त्यांचा एक अंतस्थ हेतू होता. तो म्हणजे सिंगापूरला मलायाच्या मुख्य भूमीपासून वेगळे काढून कायमची ब्रिटिश वसाहत म्हणून ठेवणे आणि उरलेल्या मलायाचे त्यात पिनांग आणि मल्लाका सामील करून त्याची मलाया युनियन म्हणून घोषणा करणे.

या नवीन योजनेत तेथील परंपरागत राज्यकर्त्यांनी आपले राज्यकारभारविषयक हक्क सोडून द्यावयाचे होते. आणि त्यांचा दर्जा केवळ नवीन प्रस्थापित सरकारला धर्मविषयक आणि रुढीविषयक बाबींमध्ये सल्ला देण्याइतपतच त्यांचे नवीन राज्याशी संबंध राहावयाचे होते. तसेच हे नवीन सरकार संपूर्णपणे पुन: संघटित व्हावयाचे होते. या सरकारचे केंद्रस्थान ब्रिटिश गव्हर्नर आणि त्याचा नोकरवर्ग राहणार होते. वेगवेगळ्या जातींच्या लोकांना समान राजकीय हक्क मिळणार होते, हळूहळू प्रांत आणि स्वायत्त राज्ये यांच्यातील शासनविषयक कायद्यांचे एकसूत्रीकरण करून नंतर देशाच्या शासनाचा दर्जा नियुक्तीकडून निवडणुकीकडे नेला जाणार होता.

ही योजना अत्यंत सुसंगत होती. ती लहरीपणाच्या राज्यपद्धतीकडून सुसंगत, सुसंस्कृत अशा लोकशाही राज्यपद्धतीकडे जाणारी होती. परंतु मलायन नागरिकांना ही योजना पसंत पडली नाही. या बाबतीत त्यांचे म्हणणे असे होते की, ही राज्यपद्धती लहरी आहे. सिंगापूरला मुख्य भूमीपासून वेगळे काढल्यामुळे देशातील विविध थरांत आणि निरनिराळ्या राजकीय संघटनांत असंतोष पसरलेला होता. देशातील कम्युनिस्ट पक्षाने तर ब्रिटिश सरकारवर 'साम्राज्यवादी राज्यपद्धतीचा हा कट आहे.' असा आरोप केला होता. अगोदर फोडा मग झोडा आणि नंतर राज्य करा ही साम्राज्यवाद्यांची नीती येथेहि उदयास आलेली होती.

वरील राज्यपद्धतीची योजना मलायातील नागरिकांनी आणि

निरनिराळ्या राजकीय पक्षांनीच केवळ झिडकारली नाही तर उदारमतवादी ब्रिटिश कार्यकर्ते, नावाजलेले ब्रिटिश मुत्सद्दी आणि प्रत्यक्ष कारभारात असलेले समजुतदार ब्रिटिश अधिकारी यांनीदेखील ती योजना अव्यवहार्य ठरविली! शेवटी ब्रिटिश राज्यकर्त्यांनीच ती योजना घाईघाईने मागे घेतली. या बाबतीत मग त्यांनी देशातील निरनिराळ्या पक्षांशी विचार-विनिमय केल्याचे सोंग केले आणि तडजोड केली! त्यांना जी योजना अगदी शेवटची वाटत होती परंतु मलायन नागरिकांना ती अपरिहार्य वाटत होती तीच योजना शेवटी अस्तित्वात आली. ही योजना म्हणजे स्वराज्याला संमती देणे. मलायाचे पूर्वीच्या राजसत्तेचे हक्क कायम ठेवण्याचे ठरले आणि उभयतांच्या सम्मतीने मलाया आणि सिंगापूर यांचे परस्परसंबंध मोघम ठेवण्यात आले.

२१ जानेवारी १९४८ रोजी मलाया युनियनने संघराज्याकडे आपले पाऊल वळविले. त्यानंतरच्या काळात ब्रिटिश राज्यकर्ते आणि मलायन राष्ट्रवादी यांच्यांतील समझोत्यानंतर ३१ ऑगस्ट १९५७ रोजी मलाया हे स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास आले.

मलायातील राजकारणाचे नवे पर्व सरकार आणि कम्युनिस्ट यांच्या झगडचापासून सुरू झाले. सिंगापूरांतून या झगडयाला सुरुवात झाली. मार्च १९४८ च्या निवडणुकांनंतर सिंगापूर लेबर पार्टी नावाची संघटना श्री. एम्. ए. मजीद यांच्या अध्यक्षतेखाली सुरू करण्याविषयीच्या वादग्रस्त वाटाघाटी सुरू झाल्या. ही संघटना निर्माण करण्याच्या मुळाशी सिंगापूर फेडरेशनच्या ट्रेड युनियनला शह देणे हा हेतू होता. या वाटाघाटी अनेक महिने धुमसत राहिल्या. शेवटी सप्टेंबरमध्ये त्यांचा परिणाम दिसून येऊ लागला. तेव्हा मजीद यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीचा एक सभासद फान्सिस थॉमस नावाचा इंग्रज शिक्षक होता. ही देशातील डाव्या बिगर कम्युनिस्टांच्या संघटनेची जणू सुरुवात होती.

२८ नोव्हेंबर १९४८ रोजी नवीन सिंगापूर लेबर पार्टीने आपली घटना बनविली. तिचे उद्देश खालीलप्रमाणे होते.

सिंगापूरमध्ये 'पोलिटिकल लेबर पार्टीची संघटना करणे, इतर राजकीय संघटनांशी सलोख्याचे नाते ठेऊन सहकार्य वाढविणे.

आपल्या संघटनेची जी तत्त्वे असतील त्यांना प्रत्यक्षात आणण्यासाठी झटणे.

कामगारांच्या सर्व प्रकारच्या प्रश्नांना सहानुभूतीने तोंड देणे, त्यांचे न्याय्य हक्क सुरक्षित ठेवणे, कारखाने, उत्पादन आणि कामगार यांच्यांत सुसंवाद राखणे.

सर्वसाधारणपणे नागरिकांच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी झटणे, कार्यक्रम आखणे आणि तो प्रत्यक्ष अमलात आणणे.

या देशातील आणि देशाबाहेरील कामगार व सामाजिक चळवळीची योग्य दिशा ठरवून दोन्ही चळवळींचे आपसात नाते ठरवून कार्य करणे. या चळवळीच्या मुळाशी जगातील कामगार–विश्वाचे जीवनमान सुधारणे हा हेतू राहील.

तसेच कामगारांच्या हिताकडे प्रामुख्याने लक्ष देऊन कायदेकानून करणे.

प्रसिद्धी खात्याची रचना आणि अस्तित्व वरील सर्व ईप्सितांना साहाय्यभूत होईल असे ठेवणे.

या संघटनेचे सभासदत्व एकवीस वर्षांवरील व्यक्तीसाठी खुले ठेवलेले होते. सामुदायिक सभासदत्वाची तेथे सोय नव्हती. सभासदवर्गणी महिन्याला ५० सेंट अशी होती. या संघटनेचा अध्यक्ष म्हणून एम्. ए. मजीद यांची निवड झाली होती. आणि फ्रान्सिस थॉमस हे उपाध्यक्षांपैकी एक होते. या संघटनेच्या सरचिटणीस पदाची जागा भट्टाचार्य नावाच्या एका भारतीयाला मिळालेली होती. हे गृहस्थ सिंगापूरला जून १९४८ मध्ये आलेले होते. फ्रान्सिस थॉमस हे इंग्रज गृहस्थ सोडले तर संघटनेतील बाकी सर्व अधिकारी हिंदुस्थानी होते.

या घटनेची सर्व सूत्रे आणि उद्देश 'ब्रिटिश लेबर पार्टीच्या' धर्तीवरच बनविलेली होती ही गोष्ट उघड होती. यामध्ये असाहि

एक राजकीय उद्देश असणे शक्य होते, तो म्हणजे ब्रिटिशांच्या धर्तीवरच जर आपल्या देशाची घटना बनविली तर मग ब्रिटिशांना विरोध करण्याचे कारणच उरणार नाही किंवा कारण सापडणार नाही.

सिंगापूर येथील म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीचा या पार्टीने जो जाहीरनामा तयार केला होता तो देखील असाच उदारमतवादी दृष्टिकोनाचा होता. या निवडणुका २ एप्रिल १९४९ रोजी झाल्या. त्यांची पंचसूत्री अशी :

१. निवारा. (अ) जी घरे रिकामी असतील ती सर्व ताब्यात घेणे. (ब) ज्या सहकारी संस्था नफा मिळवीत नाहीत, परंतु नागरिकांच्या विकासाचे काम करतात त्यांच्या कचेऱ्यांसाठी निधि उभारणे.

२. सिंगापूरची 'ट्रॅक्शन कंपनी' ही म्युनिसिपालिटीच्या मालकीची करणे.

३. प्रौढांसाठी तांत्रिक शिक्षणाचे संध्याकाळचे वर्ग चालू करणे. ज्यामुळे देशाचे उत्पादन वाढण्यास मदत होणार होती.

४. म्युनिसिपालिटीकडून नागरिकांना उत्तम सेवा मिळण्याची हमी घेणे. विशेषतः कामगारांच्या वस्तीत सुधारणा घडवून आणणे, रस्त्यावरील दिवे, स्वच्छता आणि आरोग्यविषयक मदत यांकडे लक्ष पुरविणे. तसेच करमणूकविषयक बाबींमध्ये सुधारणा घडवून आणणे.

५. मतदारांवरील जायदादविषयक अट काढून टाकणे.

या पार्टीचे मत असे होते की कामगारांना संपूर्ण सोशॅलिझमची आवश्यकता किंवा निकट भासलेली नाही. उदाहरणार्थ १८ जागांसाठी १६ प्रोग्रेसिव्ह, ५ कामगार, आणि ७ स्वतंत्र पक्षाचे उमेदवार उभे होते. त्यातून १३ प्रोग्रेसिव्ह, ४ स्वतंत्र आणि १ कामगार असे उमेदवार निवडून आले.

१९४९ च्या ऑक्टोबरमध्ये पार्टीमध्ये महत्त्वाचा बदल घडून

आला. लिम् यी हॉक हे जे कायदेमंडळाचे सभासद होते त्यांनी प्रोग्रेसिव्ह पार्टीचा राजीनामा दिला आणि ते लेबर पार्टीला येऊन मिळाले. दुसऱ्याच वर्षी ते पार्टीचे चेअरमन म्हणून नियुक्त झाले. फ्रान्सिस थॉमस हे पूर्वीचे चेअरमन होते; तसेच पीटर वुलियम्स यांची चिटणीस म्हणून नियुक्ती झाली. याच वेळी लेबर पार्टीच्या सभासदांची संख्या चार आकड्यांवर पोचली होती. आणि १९५१ च्या निवडणुकांमध्ये लेबर पार्टीने कायदेमंडळातील दोन जागा जिंकल्या.

सिंगापूरचे हेच उदाहरण मलायाच्या संघराज्यानेहि आपल्या समोर ठेवले होते. अशीच एक लेबर पार्टी पेनांग (*Penang*) येथे मे १९५१ साली अस्तित्वात आली, मलाक्का येथे जुलैमध्ये आणि सेलेंगोर (*Selangor*) येथे डिसेंबरमध्ये अस्तित्वात आली.

तशीच (*IMP*) इंडिपेंडेंट मलाया पार्टी सप्टेंबर १९५१ साली स्थापन झाली. तिची पहिली सभा कौलालंपूर येथे झाली आणि हान चेंग-लॉक यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. हान याचे *IMP* चा अध्यक्ष होणे म्हणजे जातीय वादाला मूठमाती मिळणे असे समीकरण त्याच्या नियुक्तीच्या निमित्ताने मांडले गेले होते. परंतु बाकीच्या अनेक संघटना देशात अशा होत्या की ज्या फक्त जातीय वादातूनच देशाच्या राजकारणाचा विचार करू शकत होत्या. त्यामुळे देशामध्ये शुद्ध स्वरूपाची राष्ट्रीय चळवळ चांगल्या तऱ्हेने रुजूच शकत नव्हती. २६ जून १९५२ रोजी कौलालंपूर येथे ‘ पॅन मलायन लेबर पार्टी ’ नावाची आणखी एक संघटना निर्माण झाली. हिच्या निर्मितीमध्ये मुहम्मद सोपी, या ‘ सिलेंगॉर लेबर पार्टीच्या ’ चिटणिसाचा बराच भाग होता. परंतु त्याहीपेक्षा ‘ सिंगापूर लेबर पार्टी ’ या संघटनेकडून तिला खरी प्रेरणा मिळालेली होती. या वेळपावेतो ‘ सिंगापूर लेबर पार्टीची ’ सभासद संख्या ५००० वर गेलेली होती. या संघटनेने आपले पाच सभासदांचे एक मंडळ पाठविले होते. त्यामध्ये या संघटनेचा चिटणीसहि होता. शिवाय पेनांग आणि पेराक लेबर पार्टीचे प्रतिनिधित्वहि हे मंडळ करीत होते! या नवीन ‘ पॅन मलायन लेबर पार्टी ’ चे ( *PMLP* ) चेअरमन आणि चिटणीस सिंगापूरमधूनच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमा
अनुक्रम ...९२६... दि.

निवडले गेले होते. मुहम्मद सोपी याला चेअरमन आणि ली मोक सँग याची चिटणीसपदी नियुक्ती झाली होती. उस्मान सिरू याची व्हाईस चेअरमन म्हणून नेमणूक झाली होती हा गृहस्थ मलायन होता. तसेच बालकृष्णन या भारतीय तरुणाला खजिनदार म्हणून नेमले गेले होते. अशा रीतीने या संघटनेचे आधिकारी एक चिनी, एक हिंदुस्थानी आणि दोन मलायन असे असल्यामुळे जातीय वादाचा या संघटनेवर कोणी आरोप करण्याचे कारण उरलेले नव्हते.

वरील घटनेवरून एक गोष्ट आपल्या निश्चितपणे लक्षात येईल की भारतातील सत्ताधारी काँग्रेसपक्ष अधिकारपदावर आणि काँग्रेस संघटनेमध्ये ज्या ज्या व्यक्तींची नियुक्ती करते ती नियुक्ती देशातील जातींचे बलाबल लक्षात घेऊनच करते. देशातील अनेक कोत्या विचार-सरणीच्या लोकांना आणि बहुसंख्य सामान्य नागरिकांना काँग्रेसचे हे धोरण पसंत पडत नाही, तरी पण देशाच्या हिताच्या दृष्टीने, परि-स्थितीकडे दुर्लक्ष करता येत नाही. देशादेशातील राजकीय शक्तींचा तोल जसा राखावा लागतो तसाच देशातील निरनिराळ्या नागरी जीवनाचा तोलदेखील राजकीय संघटनांना राखावाच लागतो. तेथे अतिविषारी जातीय दृष्टीकोन ठेवून जसे चालत नाही तसेच अति विशाल आणि अतिउदार मानवतावादी दृष्टीकोन ठेवूनहि चालत नाही. व्यवहारी दृष्टिकोन घेत घेतच अंतिम ईप्सित साधावयाचे असते. तीच धडपड छोटयाशा मलायामध्ये देखील दिसून येते. असो.

या कौलालंपूर येथे भरलेल्या सभेसाठी ७१ सभासद आणि निरीक्षक मिळून उपस्थित होते. हे निरीक्षक २२ व्यापारी संघांतर्फे आलेले होते. सकृत्दर्शनी जरी ( *PMLP* ) मध्ये व्यापारी संघटनांना राजकारणात भाग घेण्यास मनाई होती तरी पण बरेच जण या राजकारणात प्रत्यक्ष भाग घेत होते. (*PMLP*) संघटना ही कामगारांच्या हितासाठीच प्रामुख्याने बद्धपरिकर झालेली होती. तिच्या सभासदत्वाच्या कलमामध्येच मुळी एक कलम असे होते : सर्व काम-गार आणि समाजवादी संघटना, ज्यांची उभारणी लोकशाही तत्त्वा-वर झालेली आहे आणि ज्यांना पार्टीची घटना मान्य आहे अशा सर्व

संस्थांना पार्टीचे सभासदत्व मिळू शकते. दुसरी विशेष गोष्ट अशी होती की या पार्टीचे सभासदत्व व्यक्तीला मिळू शकत नव्हते.

कार्यकारी समितीवर पार्टीचे निवडून आलेले सभासद आधिकारी म्हणून नियुक्त केले जात, तसेच या *PMLP* चे सभासद झालेल्या इतर संघटनातून प्रत्येकी एक प्रतितिधि कार्यकारी समितीवर घेतला जात असे. या कार्यकारी समितीने घेतलेले निर्णय, अध्यक्ष्याच्यावर इतर घटक संघटनांनी मान्य केले असतील तरच ते कायमचे नाम्य केले जातील असा नियम केलेला होता.

या पार्टीचा प्रमुख राष्ट्रीय कार्यक्रम असा होता :

१. संयुक्त मलायाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी निकराचे प्रयत्न करणे.

२. निवडणुकांची व्यवस्था करणे. मतदानासाठी २१ वर्षांवरील नागरिकांना मतदानाचा हक्क मिळवून देणे.

३. देशातील युवकांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी कायदे करणे आणि शिक्षण विषयक धोरण निश्चित करणे.

४. मलायन लोकांना मुलकी नोकरदार म्हणून नेमणुका करण्यात याव्यात आणि पब्लिक सर्व्हिस कमिशनची निर्मिती करण्यात यावी यासाठी मागणी करणे.

५. सामाजिक हक्कांच्या संरक्षणासाठी झटणे आणि समाज सुधारकांच्या सेवेमध्ये सुधारणा करणे.

६. कारखानदारीत सुधारणा करणे, देशाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने कामगार-वर्ग, कारखानदार आणि निर्यातीचे धोरण यांमध्ये सुसंवाद निर्माण करणे.

७. जमीन सुधारण्याच्या दृष्टीने, शेतीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने आणि शेतकरी वर्गाचे हित डोळ्यांपुढे ठेऊन कसेल त्याची जमीन हा दृष्टिकोन अमलात आणण्याचा प्रयत्न करणे. शेतकऱ्यांना कर्ज देणे आणि सहकारी संस्थांची निर्मिती करणे.

८. आवश्यक त्या धान्य निर्मितीसाठी शेतकऱ्यांना द्रव्यसाह्य देणे, आणि राहण्यासाठी घरबांधणीच्या चळवळीला मदत करून राहणीमान सुधारणे.

९. करआकारणी ही ज्याच्या त्याच्या मगदूरीनुसार सुसह्य होईल अशीच करणे.

१०. राष्ट्रीय संरक्षण संघटनेची त्वरित उभारणी करणे आणि देश रक्षणाच्या दृष्टीने तिच्यामध्ये सुधारणा करणे.

या कार्यक्रमाबरोबरच *PMLP*चा दृष्टिकोन हा काय होता हे जसे लक्षात येते तसेच तिचे देशातील निरनिराळ्या राजकीय संघटनांशी कसे संबंध होते यावरहि प्रकाश पडतो. उदाहरणार्थ, या *PMLP*ने केलेले काही ठराव पाहिले तर वर मी काय म्हणतो याची प्रचीती येण्यास हरकत नाही.

१. या संघटनेला अशी जाणीव आहे की, ही कुठल्याहि एका राजकीय पार्टीचे सरकार प्रस्थापित होऊ शकत नाही. शिवाय लेबर पार्टी ही काही या देशातील, देशाच्या राजकीय नि आर्थिक स्वातंत्र्यासाठी झटणारी एकमेव पार्टी नाही. उलट देशात राजकीय चळवळ तसेच स्वातंत्र्याची चळवळ घडवून आणणाऱ्या इतर अनेक संघटनांपैकी ती केवळ एक आहे. म्हणून *PMLP* ही संघटना देशातील स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या इतर संघटनांशी सहकार्य करू इच्छिते. यासाठीच ही संघटना स्वतंत्र मलायासाठी घटना तयार करण्यासाठी अशा सर्व संघटनांना 'मलाया नॅशनल कांग्रेसमध्ये' एकत्र येण्यासाठी आवाहन करीत आहे. कारण असे झाले तरच मलायाची घटना मलायातील सर्व थरांतील लोकांची घटना होणार आहे.

९ जुलै १९५३ साली *PMLP* ची पहिली वार्षिक परिषद कौलालंपूर येथे भरली. सोपी हा चेअरमन म्हणून पुन्हा निवडून आला. तसेच या संघटनेतील इतर वरिष्ठ आधिकारीदेखील पुन्हा निवडून आले. फक्त उस्मान सिरू याच्याऐवजी पीटर विल्यम्स याची व्हाईस चेअरमन म्हणून निवड झाली. हा पीटर विल्यम

सिंगापूरच्या लेबर पार्टीचा एक सभासद होता. या परिषदेने मलायाच्या स्वातंत्र्याच्या कार्यक्रमाची आखणी आणि उद्‌घोष केला. तो असा : मलायाच्या सर्वसत्ताक, स्वतंत्र आणि लोकसत्ताक राज्याच्या ( ज्यात सिंगापूरहि समाविष्ट आहे ) निर्मितीसाठी तीन टप्प्यांचा कार्यक्रम ठरविण्यात येत आहे. पहिला टप्पा १९५४ ते १९५७, दुसरा १९५८ ते १९६० आणि तिसरा १९६१ ते १९६४ असा राहील. सकृतदर्शनी हा कार्यक्रम काही आकर्षक वाटत नाही, परंतु देशातील परिस्थितीचा सर्वांगीण विचार केल्यास, त्यात लपलेल्या सर्व अडचणींचा आढावा घेतल्यास आणि केवळ नुसतेच मलायाचे संघराज्य नव्हे तर हे संघराज्य सिंगापूरसकट अस्तित्वात आणावयाचे आहे याचा विचार केल्यास हा कार्यक्रम व त्यासाठी घातलेली मुदत निश्चितच योग्य आणि शहाणपणाची होती असेच म्हटले पाहिजे.

हा *PMLP* चा स्वातंत्र्यविषयक कार्यक्रम १३ सप्टेंबर रोजी कौलालंपूर येथे झालेल्या या संघनेच्या दुसऱ्या परिषदेत मंजूर करण्यात आला.

या पार्टीच्या कार्यक्रमांचा शेवटचा यशस्वी भाग म्हणजे १६ सप्टेंबर १९६३ रोजी मलायाचे स्वतंत्र मलेशियाचे संघराज्य म्हणून घोषणा झाली. मलाया हे नाव बदलून त्याचे नाव मलेशिया असे ठेवण्यात आले आणि या संघराज्यात सिंगापूर, उत्तर बोर्नियो किंवा साबा, सारावाक व मलायातील सर्व राज्यांचा संघ असे एकत्र केले गेले आहेत. या स्वतंत्र मलेशियाची राजधानी कौलालंपूर या शहरात करण्यात आली. स्वतंत्र मलेशियाचे पहिले पंतप्रधान म्हणून टुंकू अब्दुल रेहेमान यांची निवड झाली. टुंकू अब्दुल रेहेमान यांनी मलेशियाच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या कामी अत्यंत परिश्रम घेतलेले आहेत. जगातील इतर कुठल्याहि देशांपेक्षा मलायाचे स्वातंत्र्य प्रस्थापित करणे आणि ब्रिटिशांच्या तावडीतून त्याची मुक्तता करणे हे काम अत्यंत कठीण होते. त्यासाठी मलायाचा भूगोल, मलायाचा इतिहास, मलायाची संस्कृती, मलायातील नागरिक, मलाया-

तील धर्म, जाती, शिक्षण, रूढी या सर्वांचा खोल अभ्यास केल्याशिवाय या देशाची आस्मिता नीट लक्षात येणार नाही. आणि या सर्व विविधतेतून एकता निर्माण करणे, इतकेच नव्हे तर त्या एकतेमध्ये किती शक्ती आहे, किती योग्यता आहे याची प्रचीती जगाला आणून देणे हे काम सामान्य नव्हते.

मलायातील सर्व राजकीय चळवळींचा इतिहास पाहिला, निरनिराळ्या राजकीय संघटनांचा अभ्यास केला, शिवाय या निरनिराळ्या राजकीय संघटनांनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी आपसात भावनात्मक ऐक्य कसे निर्माण केले याचा सूक्ष्म अभ्यास केला तरच मलेशियाचे स्वतंत्र लोकसत्ताक संघराज्य कसे अस्तित्वात आले याची कल्पना येऊ शकेल आणि ही कल्पना आली म्हणजेच टुंकू अब्दुल रेहेमान यांची योग्यत पटू शकेल. मलाया, सिंगापूर व वोर्नियो किंवा कालिमतानमधील साबा आणि सारावाक हे देश एकत्र आणावयाचे म्हणजे सामान्य गोष्ट नव्हती. शिवाय या एकत्रीकरणाच्या योजनेला ब्रिटिशांची संमति मिळविणे आवश्यक होते. ब्रिटिशांची राजनीती कशी आहे याविषयी आता आपल्याला तरी नव्याने काही सांगण्याची आवश्यकता नाही. भारतीयांची ती पूर्ण पूर्ण परिचयाची झालेली आहे.

मलायातील नागरिकांना आणि राजकीय पुढाऱ्यांना या साऱ्या दिव्यातूनच जावयाचे होते. आणि नेता म्हणून टुंकू अब्दुल रेहेमान यांच्यावर ही जबाबदारी मोठी होती. मलेशियाचे स्वतंत्र्य संघराज्य स्थापन करताना मलेशियातील सर्व लोकांची तशी तीव्र इच्छा आहे याबद्दल ब्रिटिशांची खात्री पटविणे आवश्यक होते.

अर्थात अगोदर तेथील लोकांमध्ये अशा प्रकारची भावना निर्माण करणे ही पहिली गोष्ट होती. ती तेथील राजकीय लोकनेत्यांनी केली. साबा, सारावाक आणि सिंगापूर आदि देशांत पूर्वीपासूनच स्वातंत्र्याप्रीत्यर्थ प्रयत्न चालूच होते. ब्रिटिशांच्या जोखडापेक्षा मलेशियाच्या संघराज्यात मर्यादित का होईना स्वातंत्र्याचा उपभोग आपल्याला निश्चितपणे घेता येईल आणि हा स्वातंत्र्योपभोग निश्चितपणे मोलाचा आहे अशी भावना या देशाच्या लोकांत नेत्यांनी

निर्माण केली. आणि तिचे पर्यवसान म्हणजेच या देशातील लोकांनी मलेशियाच्या संघराज्यात सामील होण्याला आपली संमती दर्शविली. आणि अशा रीतीने मलेशियाच्या स्वतंत्र सार्वभौम संघराज्याची स्थापना झाली.

मलाया संघराज्य, सिंगापूर, साबा आणि सारावाक या सर्वांचे मिळून क्षेत्रफळ १,२८,५६२ चौरस मैल आहे. आणि मलेशिया संघराज्याची लोकसंख्या १,१४,०५,३३६ आहे. ही आकडेवारी १९६२ सालच्या खानेसुमारीनुसार आहे.

येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, मलेशियाच्या स्वातंत्र्यविषयक चळवळीकडे त्यांचे शेजारी देश आपुलकीच्या अगर मित्रभावनेने तर पाहात नव्हतेच, उलट मलायाला स्वातंत्र्य मिळू नये, मलेशियाचे संघराज्य अस्तित्वात येऊ नये अशा तऱ्हेचे प्रयत्न आणि कारवाया इंडोनेशिया आणि फिलिपाईन्स या देशांतून चालू होत्या. इंडोनेशिया आणि फिलिपाईन्स हे मलेशियाच्या आग्नेय आणि पूर्वेकडचे शेजारी देश. या देशांनी मलेशियामध्ये अंतर्गत कारवाया करून आपापसात फूट पाडण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण त्याला जेव्हा घवघवीत यश मिळेना तेव्हा 'मलेशियाच्या संघराज्याला आमचा सक्त विरोध आहे.' अशी सरळ घोषणाच त्यांनी केली. इंडोनोशियाने तर मलायाच्या पश्चिम किनाऱ्यावर आणि सारावाक-मध्ये आपले काही सैनिक पाठवून तेथील अल्पसंख्यांकास बंडाची फूस देण्यासही कमी केले नाही. याचा परिणाम एकच झाला, तो म्हणजे मलेशियाचे संघराज्य अस्तित्वात येऊनहि आग्नेय आशियात तणा-तणीचे वातावरण धुमसतच राहिले.

शेवटी याचे पर्यवसान ८ ऑगस्ट १९६५ रोजी सिंगापूर, मले-शिया संघराज्यातून फुटून निघाल्याची खळबळजनक बातमी जगाला वाचायला मिळाली. दि. ५ ऑगस्ट रोजी मलेशियाचे पंतप्रधान टुंकू अब्दुल रेहेमान आणि सिंगापूरचे मुख्य मंत्री ली कुआन यू यांच्यामध्ये सिंगापूर मलेशियाच्या संघराज्यातून फुटून निघण्यासंबंधी एक गुप्त करार झाल्याच्या बातमीचा देखील वर्तमानपत्रातून स्फोट झाला होता.

अर्थात यासाठी संघराज्याच्या घटनेत तसा बदल करणे प्रथम आवश्यक होते. त्याप्रमाणे ९ ऑगस्ट रोजी संघराज्याच्या विधान सभेपुढे घटना दुरुस्तीचे विधेयक मांडले गेले, ते विधेयक १२६ विरुद्ध १ अशा प्रचंड बहुमताने मंजूर झाले. त्यानंतर लगेच सिंगापूर स्वतंत्र झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली.

मात्र याचा परिणाम इंग्लंड, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलँड या देशांवर लगेच झाला. तेथील राजकीय गोटातून काळजी आणि आश्चर्य व्यक्त करण्यात आले. कारण अतिपूर्वेकडील संरक्षण व्यवस्थेच्या दृष्टीने सिंगापूरला विशिष्ट महत्व आहे. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलँड हे देश जवळ असल्यामुळे या संरक्षण व्यवस्थेशी त्यांचा निकडचा संबंध येतो. म्हणून पुन्हा आशियातील सत्तासमतोलाच्या दृष्टीने सिंगापूरच्या फुटून निघण्याच्या कृतीकडे खोलवर पाहिले जाते.

सिंगापूर मलेशियाच्या संघराज्यातून फुटून निघण्याच्या मुळाशी फार क्षुल्लक अथवा घरगुती कारणे घडलेली नाहीत ही गोष्ट स्पष्ट आहे. आपणाला ही गोष्ट माहीतच आहे की आज जगात फक्त दोनच प्रकारचे प्रभावी राजकीय पक्ष आहेत. एक कम्युनिस्ट पक्ष आणि दुसरा पवित्र लोकशाहीचा बुरखा घेऊन वावरणारा साम्राज्यवादी पक्ष. दोन्ही पक्षांच्या शक्तींचे ध्येय एकच आहे, ते म्हणजे जगाच्या जास्तीत जास्त भागावर आपली सत्ता प्रस्थापित करणे. आपापल्या तत्त्वज्ञानाची हत्यारे घेऊन हे दोन पक्ष सदोदित जणू समरांगणावरच उभे असतात. जेथे तत्त्वज्ञानाचा प्रभाव तोकडा पडतो तेथे मुत्सद्देगिरी वापरली जाते आणि जेथे मुत्सद्देगिरीहि कमी पडते तेथे शस्त्रे वापरली जातात. याचे वर्षानुवर्षे चालत आलेले, परंतु आजहि ताजे असलेले उदाहरण म्हणजे व्हिएतनाम आणि अगदी अलीकडे फलकावर आलेले दुसरे उदाहरण म्हणजे अरब–इस्त्रायल लढा. या लढ्याला फक्त एकटे इस्राएल अथवा केवळ अरब राष्ट्रेच जबाबदार नाहीत तर या लढ्यातील प्रमुख भाग म्हणजेच मी वर उल्लेखिलेल्या या दोन आसुरी शक्ति होत. आज जगात या दोन आसुरी शक्तींच्या

इच्छेनेच युद्धे सुरू केली जातात, खेळली जातात आणि थांबविली जातात.


एकदा ही पार्श्वभूमी समजली म्हणजे मग मलेशिया संघ–राज्यातून सिंगापूर का फुटून निघाले याचे उत्तर काढणे सोपे जाते. याच्या मुळाशी कम्युनिस्ट होते. उलट मलायाचे मलेशियाचे संघ-राज्य होण्यालाच या कम्युनिस्ट पार्टीचा विरोध होता. कम्युनिस्ट धार्जिणे–इंडोनेशियाचे माजी अध्यक्ष डॉ. सुकार्नो यांनी तर 'मले–शियाला चिरडा' अशी मूठ आवळून आवईच ठोकलेली होती. ब्रुनेई, उ. बोर्नियो, साबा–सारावाक आणि सिंगापूर येथील कम्युनिस्ट मले-शिया संघराज्याच्या विरुद्ध कारवाया करीतच होते. आर्थात याचे कारण उघड तितकेच सहज पटण्यासारखे आहे. ते असे की, हे छोटे छोटे देश (किंवा वसाहती) राजकीय उद्दिष्टाने एकत्र आले तर त्यांच्यात एकी निर्माण होईल. त्या एकीतून मग अटळ शक्ति निर्माण होईल आणि या शक्तीच्या साह्याने देशातील आर्थिक, सामाजिक शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्रात प्रगती होईल. आणि एक समर्थ लोक-शाही देश म्हणून मलेशिया आग्नेय आशियात उभा राहील. तसे झाले म्हणजे मग कम्युनिस्टांचे क्षेत्रच नाहीसे होईल. आणि आग्नेय आशियात आपले पाय रोवण्याची महत्त्वाकांक्षा धुळीला मिळेल !

म्हणूनच सिंगापूर येथील कम्युनिस्ट पार्टीने जिवाचे रान करून सिंगापूरच्या पिपल्स पार्टीला शह देण्याची योजना आखली. या योज-नेला क्वचित प्रसंगी उघड तर कधी कधी लपूनछपून इंडोनेशिया-तील कम्युनिस्टांनी साथ दिली. आणि त्याचे पर्यवसान शेवटी सिंगा-पूर फुटून निघण्यात आले. सिंगापूर फुटून निघाल्यानंतर लगेच सिंगापूरशी व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याची तत्परता इंडोनेशि-याने दाखविली. असे करण्यात इंडोनेशियाने फारच उतावळेपणा दाखविला असे म्हणावे लागेल, असल्या प्रकारच्या उतावळेपणाचा प्रत्यक्ष परिणाम १९६५ मध्ये स्वत: इंडोनेशियालाच भोगावा लाग-लेला आहे. इतकेच नव्हे तर कम्युनिस्टांशी केलेल्या लगटीचे प्राय-श्चित खुद्द डॉ. सुकार्नोला घ्यावे लागलेले आहेच ! सिंगापूरच्या

मुख्य प्रधानांनी, सिंगापूरचे व्यापारी संबंध मलेशियाबरोबरच जास्त जवळचे राहतील असे जाहीर केले.

आज तरी मलेशिया इंडोनेशियापेक्षाहि अधिक भरभराटीला आलेले आग्नेय आशियातील लोकशाही संघराज्य आहे. कम्युनिस्टांच्या आहारी ते गेलेले नाही आणि साम्राज्यवाद्यांच्या तावडीतहि ते सापडलेले नाही. आग्नेय आशियात आपलाहि एक चिमुकला दीप घेऊन प्रकाश देत उभ्या राहिलेल्या या संघराज्याचे उद्या काय होणार आहे हे कुणी सांगावे ?

● ● ●




मलेशिया - सिंगापूर

# समारोप

पहिले जागतिक महायुद्ध झाले त्यापूर्वी आशिया थंड होता. आशियात त्या काळी काही ठिकाणी शाही राज्ययंत्रणा होती तर काही ठिकाणी साम्राज्यशाही होती. पण स्वातंत्र्य मात्र कोठेहि नव्हते. आशियात सारे काही शांत शांत होते. ज्या ठिकाणी साम्राज्यवाद्यांच्या वसाहती होत्या, त्या ठिकाणी देखील नागरिक शांततेने जीवन जगत होते. मात्र जेव्हा या साम्राज्यवाद्यांपुढे आशियातील निरनिराळ्या देशांमध्ये प्रगति करण्याचा प्रश्न आला—कारण बाजारपेठा, कच्च्या मालाची निर्यात, भांडवल गुंतवणूक या गोष्टी केल्याशिवाय साम्राज्यवाद्यांना देखील स्वतःची प्रगति कुठे साधता येत होती?—तेव्हा त्यांना या देशात राष्ट्रवादाच्या भावनेला जन्म द्यावाच लागला!

पुढे मी वर सांगितलेल्या गोष्टींसाठी रस्तेबांधणी, दळणवळणाची साधने–मोटार, आगगाडी, विमाने–पोस्ट, तारायंत्रे वगैरेंच्या सोयी देशात करणे आवश्यकच होते. ही साधने आशियातील देशात जसजशी वाढत गेली तसतसे लोक एकमेकांच्या अधिक जवळ येऊ लागले. असे होत असतांना त्यांचे अज्ञान जसे उघडे पडू लागले तसेच ज्ञानाशीहि त्यांचा परिचय होऊ लागला, त्यातच बाहेरचे धर्मोपदेशक देशात येऊ लागले आणि ज्ञानाचा प्रसार करू लागले. त्याचाहि परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. नवीन नवीन कल्पना स्फुरण्यास याच काळात सुरुवात झाली.

नंतर साम्राज्यवाद्यांनी कित्येक ठिकाणी स्वतःचेच भांडवल आणि स्वतःचेच माणूसबळ वापरून मोठमोठे कारखाने सुरू केले. परंतु सर्वच ठिकाणी त्यांना केवळ स्वतःचीच मिरास ठेवणे शक्य झाले नाही. बऱ्याच कारखानदारीत त्यांना मुल्की लोकांचाहि समावेश करावा लागला. त्यामुळे दोन गोष्टी झाल्या. पहिली, अविकसित आशिया खंडात उद्योगधंदे, कारखानदारी आणि इतर अनेक द्रव्यार्जनाची साधने निर्माण झाली आणि दुसरी गोष्ट म्हणजे आशिया खंडातील लोकजीवन हळूहळू आपला दृष्टिकोन बदलू लागले. याच चक्रातून मोठमोठाल्या शहरांचाहि जन्म झाला.

हे लोकजीवन हळू हळू बदलू लागल्याचे मी जे म्हटले, त्यातील सूक्ष्म बदलहि ध्यानात घेतला पाहिजे. तो म्हणजे या जीवनातून एक मध्यमवर्ग नावाचा लोकवर्ग निर्माण झाला. तसेच दुसरा कामगारवर्ग निर्माण झाला. आणि या दोन वर्गांच्या सहकार्यातून आणि जीवनविकासाच्या गरजेतून राष्ट्रवादाच्या चळवळीला सुरुवात झाली. नंतर सुशिक्षित लोकांना आपल्या कर्तबगारीला साजेसे कार्यक्षेत्र परकीयांच्या अंम्मलाखाली मिळेनासे झाले. त्यामुळे असंतोष वाढत गेला आणि या असंतोषाला वाचा फोडणाऱ्या चळवळी जन्म घेऊ लागल्या. आपल्या देशांमध्ये आपल्याला राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्य असावे अशी अभिलाषा कर्तबगार मनामध्ये

निर्माण होऊ लागली. आणि परकीय सत्तेविरुद्ध असंतोषाच्या ज्वाला भडकू लागल्या.

पहिल्या महायुद्धाच्या शेवटी हा राष्ट्रवाद प्रचंड प्रमाणात वर उसळून आला. विशेषत: चीनमध्ये क्रांतीचे एक निराळेच पर्व सुरू झाले. तसेच हिंदुस्थानात, विशेषत: महात्मा गांधींच्या नेतृत्वात देश स्वातंत्र्यविषयक भावनेने भारावून गेला होता. यावेळी गांधींना नुकतेच नेतृत्व मिळाले होते. ही असंतोषाची लाट अनेक प्रकाराने व्यक्त होत होती. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाच्या मधल्या काळात साम्राज्यवाद्यांची बैठक पार हादरून गेलेली होती. याच वेळी आशियात एकीकड राष्ट्रवाद आणि दुसरीकडे साम्यवाद अशी दोन राजकीय तत्त्वज्ञाने जोम धरू लागली होती.

दुसऱ्या महायुद्धाच्या थोडे पूर्वी आणि प्रत्यक्ष दुसऱ्या महायुद्धाच्या काळात देखील आग्नेय आशियातील वसाहतींनी उदा. ब्रह्मदेश, सयाम, फिलिपाइन्स आणि मलाया तसेच हिंदुस्थानने देखील दोन नवीन गोष्टी पाहिल्या. पहिली म्हणजे जपानची प्रगती! जपान हा पूर्वेकडचा देश. आग्नेय आशियातील साम्राज्यवाद्यांच्या जोखडाखाली पारतंत्र्याचे दु:ख भोगणाऱ्या वसाहतींना हा देश अगदी जवळचा होता. या पूर्वेकडच्या चिमुकल्या शेजारी देशांत केवढी प्रचंड औद्योगिक वैज्ञानिक आणि शैक्षणिक क्रांति झालेली होती. पाश्चात्यांशी धडक घेण्याइतकी त्याची लष्करी शक्तीहि वाढलेली होती. हे होऊ शकते! पूर्वेकडील देश देखील स्वतंत्र होऊ शकतात, प्रबळ होऊ शकतात, स्वयंपूर्ण होऊ शकतात असा नवा विश्वास जपानने या देशांच्या नागरिकांमध्ये निर्माण केला. आणि दुसरी हिटलरच्या नेतृत्वाखाली नाझी जर्मनीची घोडदौड! फ्रान्स, इंग्लंड, रशिया आणि अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्रांना आपल्या लष्करी आयुधांनी तडाखे देत सुटलेला नाझी जर्मनी, काही काळ का होईना, जगातील सर्वच परतंत्र देशांचे दैवत आणि स्फूर्तिस्थान होऊन राहिला होता ही गोष्ट नाकबूल करता येणार नाही!

आग्नेय आशियातील परतंत्र देशांनी या दोन देशांपासून. स्फूर्ति घेतली असे म्हटले पाहिजे. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की, ज्या जपानच्या प्रचंड प्रगतीने आग्नेय आशियातील या परतंत्र देशांनी स्फूर्ति घेतली होती, त्याच जपानविरुद्ध हे देश आपल्या स्वातंत्र्याच्या लढ्यात उभे राहिले ही गोष्ट कितीहि आश्चर्यकारक असली तरी वस्तुस्थिति निदर्शक आहे ! चीनचे आणि जपानचे तर वैरच होते. १९३७ साली झालेल्या चीन-जपान युद्धाच्या संदर्भात ही गोष्ट लक्षात भरते. परंतु मलाया, इंडोचायना, फिलिपाईन्स आणि ब्रह्मदेश, येथे जपानविरुद्ध प्रचंड चळवळी झाल्याचा इतिहास आहे. याचे कारण जपान जरी पूर्वेकडील आपला एक प्रबळ शेजारी म्हणून प्रिय असला तरी या शेजाऱ्याचे अंतःकरण निर्मळ नव्हते ! त्याच्या मनातहि साम्राज्य होते आणि त्याची पावलेहि त्याच रोखाने पडू लागलेली होती. म्हणून एकीकडे या देशांनी त्याच्यापासून स्वातंत्र्याची स्फूर्ति घेतलेली असली तरी दुसरीकडे जेव्हा हे धूड आपल्याच प्राणावर बेतले तेव्हा त्याच्याशी दोन हात करण्यासहि या छोट्या देशांनी मागेपुढे पाहिले नाही !

ही एक गोष्ट. दुसरी मी वर म्हटल्याप्रमाणे या नवोदित देशांमध्ये जेव्हा स्वातंत्र्यविषयक जागृति होऊ लागलेली होती त्याच वेळी राष्ट्रवाद आणि साम्यवाद यांचाहि उदय या देशांमध्ये होऊ लागलेला होता. म्हणजे असे की, राष्ट्रवाद आणि साम्यवाद यांचाहि झगडा याच वेळी तेथे चालू होता. प्रथम मलाया आणि इंडोचायनामध्ये साम्यवादाने आपला प्रभाव वाढविण्यास सुरुवात केली. गोरिल्ला युद्ध ज्याला म्हणतात ते युद्ध तेथे या साम्यवादी नेतृत्वाने जपान्यांविरुद्ध सुरू केले. तसेच फिलिपाईन्समध्ये देखील जपान्यांविरुद्ध झगडा देण्यात साम्यवादी पक्षच आघाडीवर होता. त्याचप्रमाणे आणि त्याच हेतूने ब्रह्मदेशामध्ये देखील त्याच्या हालचाली होत होत्या. त्याच वेळी हिंदुस्थानमध्येदेखील साम्यवाद होता परंतु काँग्रेस पक्षापुढे त्याचा त्यावेळी मुळीच पाडाव लागण्यासारखा नव्हता !

तुलनेच्या दृष्टीने पाहता इंडोनेशियामध्ये तो कमजोर होता आणि सयाममध्ये तर तो असून नसल्यासारखाच होता.

यावरून असे दिसते की, साम्यवादापेक्षा राष्ट्रवादाचेच विशेष आकर्षण आणि प्रभाव या दक्षिण आणि आग्नेय आशियातील स्वातंत्र्योत्सुक नागरिकांवर अधिक पडलेला होता. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या जगाची छबी आपण पाहिली तर तिच्यात देखील साम्यवादापेक्षा राष्ट्रवादाने प्रभावित झालेली राष्ट्रेच आपल्याला अधिक दिसतील !

मात्र याच वेळी आणि याच दृष्टिकोनातून निरीक्षण करीत पुढे पुढे गेलो की, एक नवीनच चित्र डोळ्यांपुढे येऊ लागते. हे चित्र अमेरिका आणि रशिया या देशांचे आणि त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानातील प्रभावाचे आहे. पुढे पुढे तर या दोन प्रबळ शक्तींनी साऱ्या जगाची वाटणी दोनच भागात केल्याचे दिसते. प्रत्यक्ष दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रशियाचे सारे लक्ष जरी केवळ युरोपच्या आघाड्यांवर केंद्रित झालेले असले आणि अमेरिका आपले लष्करी आणि राजकीय कार्य चीन आणि फिलिपाईन्समध्ये करण्यात गुंतलेली असली तरी, जर्मनी आणि जपानच्या शरणागतीनंतर रशिया आणि अमेरिका यांचे लक्ष आशियावरच पूर्णांशाने केंद्रित झालेले दिसते.

वरील सर्व इतिहासाचे आणि घटनांचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, वसाहतवादाच्या जोखडातून मुक्त झालेल्या आशियातील देशांना रशियापेक्षा अमेरिकाच अधिक जवळची वाटू लागली होती. म्हणजे ढोबळ मानाने बोलावयाचे झाल्यास साम्यवादापेक्षा लोकशाहीचे गोंडस पांघरूण असलेली लोकशाहीच तेथे जवळची वाटू लागलेली होती.

जपानचा संपूर्ण पाडाव होईपर्यंत आशियावर दुसऱ्या महायुद्धाचा खराखुरा काय परिणाम झालेला आहे याची पूर्ण जाणीव होऊ शकलेली नव्हती. आणि त्यामुळे आशियातील या भागावर खरेखुरे कोणते राजकीय तत्त्वज्ञान आपला पगडा बसवील हेहि ठामपणे सांगता येण्यासारखे नव्हते !

फिलिपाइन्स १९४६ च्या मध्यावर स्वतंत्र झाले, भारत आणि पाकिस्तान ऑगस्ट १९४७ मध्ये स्वतंत्र झाली, ब्रह्मदेश १९४८ सालाच्या सुरवातीला स्वतंत्र झाला. आणि तसे पाहू गेले तर वरील तिन्ही–चारी देशातील हे सत्तांतर शांततेनेच पार पडले असे म्हणावे लागेल. तसे इंडोनेशिया किंवा इंडोचायना यांचे झाले नाही. इंडोनेशियामध्ये तर डच आणि इंडोनेशियन यांच्यामध्ये अनेक वेळा लष्करी कारवाया झालेल्या आहेत. शेवटी शेवटी १९४९ मध्ये नेदरलॅन्डस्‌ने इंडोनेशियाचे स्वातंत्र्य मान्य केले. इंडोचायनामध्ये तर हो चि मिन्ह यांच्या व्हिएटमिन्ह आणि फ्रेंचामध्ये सतत लष्करी कारवाया चालू असत. या विषयीची सविस्तर माहिती माझ्या ‘जगापुढील प्रश्नचिन्हे’ या पुस्तकात आलेली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानचे आशियातील साम्राज्य कोलमडले. त्याचा परिणाम असा झाला की, आग्नेय आशियातील जुनाट वसाहतवादाला अनंत तडे गेले.

वर एके ठिकाणी मी जे म्हटले की, फिलिपाइन्स, ब्रह्मदेश आणि भारत–पाक यांनी शांततेच्या मार्गांनीच स्वातंत्र्य मिळविले. परंतु अधिक खोल आणि आर्थिक दृष्टिकोनातून विचार करता, असे दिसते की, स्वातंत्र्यप्राप्तीची वाटचाल करीत असताना नवीन धोकेहि निर्माण झाले आणि त्यांना तोंड देणे या देशांना भाग पडले. उदाहरणार्थ भारताचे स्वातंत्र्य हे विभाजनाशिवाय अस्तित्वात आले नाही ! आणि या विभाजनामुळे या उपखंडाचे राजकीय ऐक्य तर भंग पावलेच, परंतु आर्थिक घडी देखील पार विसकटून गेली. लाखो निर्वासितांच्या लोंढ्यांना दोन्ही देशांना तोंड द्यावे लागले. तसेच हिंदु–मुसलमान–शीख यांच्यातील स्नेहभावाला प्रचंड तडे गेले. तसेच इंडोनेशियाचे स्वातंत्र्य देखील डच–इंडोनेशियन युद्धात अनेक जीवांच्या आहुती पडल्यानंतर आणि इंडोनेशियाची आर्थिक घडी विस्कळीत झाल्यानंतर पदरात पडले. तसेच कोरियाचेहि झाले !

दुसऱ्या महायुद्धानंतर आशियातील या देशांनी स्वातंत्र्य मिळविले. त्यापैकी चार देशांच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा इतिहास या पुस्तकात दिलेला आहे. या पूर्वीच्या, म्हणजे ‘जगापुढील प्रश्नचिन्हे’ या माझ्या

पुस्तकात व्हिएतनाम, तिबेट, कोरिया आणि इंडोनेशिया या चार देशांच्या राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक माहितीबरोबरच आशियातील पूर्व भागातील वसाहतवादाचे स्वरूप स्पष्ट करण्याचाहि प्रयत्न केलेला आहे.

अति पूर्वेकडील या देशांनी आता स्वातंत्र्य तर मिळविले आहेच पण त्याहिपेक्षा एका परीने कठीण गोष्ट, ती म्हणजे देशोन्नति–या देशांना आता साधावयाची आहे. आशियातील राज्यकर्त्यांची आणि नागरिकांची आजची ती प्रतिज्ञाच असावयाला पाहिजे आहे. आणि हें काम स्वातंत्र्य मिळविण्याइतके सोपे खास नाही. कारण येथे ज्या शत्रूशी सामना असतो तो बाहेरचा नसतो, आतलाच असतो. देशातील दारिद्रय, अज्ञान, शेतीची दुर्दशा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव हे ते प्रमुख परंतु प्रबळ शत्रू होत. एवढेच नव्हे तर, ज्या राज्यकर्त्यांना आणि नागरिकांना मिळून या शत्रूशी सामना द्यावयाचा आहे त्या राज्यकर्त्या आणि नागरिकांमध्ये आतले शत्रूहि आहेत ! ते म्हणजे, लाचलुचपतीची प्रवृत्ति, चारित्र्याचा अभाव आणि घाम गाळून कष्ट करण्याविषयीची उदासीनता हे ते मनुष्यमात्राच्या आतले शत्रू आहेत.

तसेच कमी काम करून अधिक द्रव्यप्राप्ती व्हावी अशी मनामध्ये निर्माण झालेली आत्मघातकी तितकीच देशघातकी अभिलाशा. थोडेसे संकट आले की इतर राष्ट्रांच्या मदतीवर विसंबून राहण्याची किंवा मदतीची अपेक्षा मनात बाळगण्याची वृत्ति. तशी वृत्ति जेव्हा एखाद्या देशाच्या नागरिकांमध्ये निर्माण होते तेव्हा त्या देशाचा भविष्यकाळ धुक्यात हरवून जातो.

आपल्या देशाचेच उदाहरण यासाठी घेता येईल. आपण राजकीय दृष्टीने आणि भौगोलिक दृष्टीने स्वतंत्र झालो खरे पण आर्थिक दृष्टीने आणि आत्मविकासाच्या दृष्टीने आपली प्रगति होत नाही. याचे कारण राज्यकर्त्यात आणि नागरिकांमध्ये वरील दोष भरपूर प्रमाणात आहेत. अन्नाची तूट भासली की अमेरिकेकडे हात पसरावयाचे, शस्त्रास्त्रांसाठी रशिया व इंग्लंड यांच्याकडे याचना करा-

वयाची. सहकार्याच्या आणि सहभावनेच्या व जग जवळ येत आहे तेव्हा अशी एकमेकाला एकमेकाची मदत लागणारच व ती घेण्यात काही चूक नाही अशी वृत्ति एकदा दृढमूल झाली की मग भविष्य-काळ आपल्या हातात कसा राहणार?

नव्यानेच स्वतंत्र झालेला आशिया खंड हे युद्ध कसे जिंकतो यावरच त्याचे खरेखुरे भविष्य अवलंबून आहे.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ... वि० ...
क्रमांक ... नों० दि० ...
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 90226

REFBK-0017225

REFBK-0017225